




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## राष्ट्रवादीच्या विलीनकरणाबाबत भाजपला विचारावे लागेल -भुजबळ

**नाशिक/प्रतिनिधी :** दिवंगत नेते तथा माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थी कलशाचे विविध जिल्ह्यात दर्शन घेउन त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला येथेही मंत्री छगन भुजबळ यांच्या कुटुंबीयांकडून अजित पवारांना आदरांजली वाहण्यात आली. तत्पूर्वी छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून विविध प्रश्नांवर भाष्य केलं. त्यामध्ये, दोन राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनकरणाच्या मुद्द्यावरुन छगन भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली. दोघे ठाकरे जसे एकत्र आले तसे पवार एकत्र यावे. परंतु, अशा काही चर्चा झाल्या नाहीत असे मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले. माझ्याशी कधीही हे बोलले नाही, कल्पनाही नाही, असे भुजबळ यांनी म्हटले. तसेच, विलीनीकरणाबाबत भाजपला विचारावं लागेल, असेही त्यांनी म्हटले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाबाबत जे काही करायचे ते आम्हाला भाजपसोबत राहून करायचे आहे. असं काही करायचे असले तर त्याबाबत आम्हाला भाजपला विचारावे लागेल. कोणाला घ्यायचे, कोणाला नाही घ्यायचे याबाबत भाजपचे जे काही ज्येष्ठ मंडळी आहेत, त्यांनाही विचारावं लागेल. काय बोलणं झाले हे किंवा बोलणे झाले असेल, काय बोलणे झाले हे माझ्यासहीत कोणालाही माहीत नाही, असे छगन भुजबळ यांनी म्हटले.

मुख्यमंत्र्यांना तर विचारावेच लागेल ना, ज्यांच्याबरोबर आपण सरकारमध्ये आहोत त्यांना तर विचारावे लागेल ना, अशा शब्दात छगन भुजबळ यांनी आपली परखड भूमिका मांडली. जर सरकारमधून बाहेर पडायचे असेल, ऱ्क्रह्र बरोबर जायचं असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. मात्र, ‘ ➪(पान २ वर)

# चिनी सैन्य चार टँकसह भारतात घुसले

### ☐ राहुल गांधींच्या दाव्याने संसदेत गदारोळ ☐ राजनाथ, शाह यांनी दिले ओपन चॅलेन्ज

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सध्या लोकसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. दरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना डोकलामचा मुद्दा उपस्थित केला. यानंतर संसदेत मोठा गदारोळ सुरू झाला. राहुल गांधी यांनी डोकलामसंदर्भात भाष्य करताच, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तीव्र आक्षेप घेतला आणि राष्ट्रपतींच्या अभिभाषणात या मुद्दाचा कसलाही उल्लेख नाही, असे म्हणाले. राहुल गांधींनी संसदेत डोकलाम आणि चीनचा उल्लेख केल्यानंतर, राजनाथ सिंह यांनी त्यांच्या विधानाला विरोध करण्यास सुरु वात केली.

राहुल गांधी माजी लष्करप्रमुख नरवणे यांच्या न प्रकाशित झालेल्या पुस्तकाचा हवाला देत, त्यातील चीन आणि डोकलामसंदर्भातील विधानांचा उल्लेख करू इच्छित होते. मात्र, राजनाथ सिंह यांनी यावर आक्षेप घेतला आणि राहुल गांधी ज्या पुस्तकाचा उल्लेख करत



आहेत, ते कधीच प्रकाशित झाले नाही. राहुल यांचा संदर्भ चुकीचा आहे, असे सांगितले. यावर, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधींना रोखले आणि जे पुस्तक अद्याप प्रकाशितच झालेले नाही, त्यावर संसदेत चर्चा केली जाउ शकत नाही, असे स्पष्ट केले.

**गृहमंत्री अमित शाह यांचा आक्षेप**

यानतंर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही राहुल गांधींवर आक्षेप घेतला आणि हे पुस्तक प्रकाशित झाले आहे की नाही, हे राहुल गांधी ➪(पान २ वर)

## ‘मी तुमचा सल्लागार नाही...!’

### लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला भडकले

सध्या संसदेचे अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरू आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर, धन्यवाद प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांचा उल्लेख करत, डोकलाममध्ये चिनी टँकचा उल्लेख केला आणि लोकसभेत एकच गदारोळ सुरू झाला. दरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधींच्या त्या विधानावर तीव्र आक्षेप घेतला. यानंतर, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नियम ३४९ चा हवाला देत राहुल गांधींना रोखले.



लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, ‘जे पुस्तकच प्रकाशितच झालेले नाही, त्याचा संदर्भ विरोधीपक्ष नेते सभागृहात देउ शकत नाहीत.‘ मात्र, यानंतरही राहुल गांधी वारंवार जनरल नरवणे यांच्या पुस्तकाचा उल्लेख करतच होते. दरम्यान गदारोळ एवढा वाढला की, राहुल गांधी म्हणाले, ‘मग आपणच सांगा, मी काय बोलायला हवे?‘ यावर अध्यक्ष म्हणाले, ‘मी काही आपला सल्लागार नाही. मूळ विषयावर बोलावे.‘ ➪(पान २ वर)

## रोहित शेट्टीच्या घरावर गोळीबार; आरोपीचे अकोला कनेक्शन

**अकोला / प्रतिनिधी-** दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी घेणारी एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली. लॉरेन्स बिश्नोई टोळीतील शुभम लोणकर या सदस्याने या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली. शुभम लोणकर आरजू बिश्नोई तो त्याच्या पोस्टमध्ये लिहित, मुंबईतील दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घरावर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी घेतली.

याआधी राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची आणि आता रोहीत शेट्टीच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारणारा शुभम लोणकर. शुभम लोणकर हा मूळ अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील नेव्होरी गावाचा रहिवासी आहे. या आधीही शुभम लोणकर याच्यावर अकोला पोलिसांनी कारवाई करत तब्बल ३ पिस्टलसह काही जिवंत काडतूस त्याच्याकडून जप्त केल्या होत्या. लॉरेन्स बिश्नोई आणि त्याचा लहान भाउ अनमोल बिश्नोई यांच्या संपर्कात असणा-या शुभम लोणकरला बंदुकीच्या तस्करी प्रकरणात अकोला पोलिसांनी गजाआड केले होते. शुभम हा बंदूक तस्करीचा मुख्य सूत्रधार होते.



अकोट पोलिसांनी त्याच्याकडून बंदूक खरेदी करणा-या तिघांना बेड्या ठोकल्या होत्या. तो गेल्या अनेक दिवसांपासून पुण्यातील वार्जे शहरात रहायचा, त्यानंतर तो फरार होता. त्यावेळी शुभमला पुण्यातून अटक झाली होती त्यानंतर त्याची जमिनावर सुटका झाली होती. शुभम लोणकर आणि लारेन्स बिश्नोई या दोघांच्या संभाषणाचं काल रेकार्डिंग पोलिसांकडे आहे. शुभम आणि बिश्नोई यांच्या संभाषणाचे व्हिडिओ रेकार्डिंग सुद्धा समोर आले होते. शुभमचे नेटवर्क दुबई आणि इतर आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांपर्यंत पसरले आहे. त्यांचं अकोल्यातील नेव्होरी गांवात घर असून ➪(पान २ वर)

## शेख हसीना यांना 10 वर्षांचा तुरुंगवास

**ढाका/वृत्तसंस्था :** बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. ढाका येथील एका विशेष न्यायालयाने पूर्बाचल प्लाट घोटाळा प्रकरणात शेख हसीना यांना १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.



विशेष म्हणजे, या घोटाळ्यात केवळ हसीनाच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांनाही दणका बसला असून, त्यांची भाची आणि ब्रिटिश खासदार ट्यूलिप सिद्दीक यांना ४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे. हा संपूर्ण खटला पूर्बाचल न्यू टाउन प्रोजेक्टमधील भूखंड वाटपाशी संबंधित आहे. भ्रष्टाचारविरोधी आयोगाने ➪(पान २ वर)

## मुली दरिद्री मुलांच्या मागे : इंदूरीकर महाराज

**अकोला / प्रतिनिधी-** तरुणांसह शेतक-यांच्या पोरांना प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराजांनी एक तळमळीचं आवाहन केलं आहे. पोरांनो, मोर्चे आणि दंगलीच्या भानगडीत पडू नका, तुमचा वापर फक्त यूज आणि थ्रो साठी होतोय असे इंदुरीकर महाराज म्हणाले. आज प्रत्येक कामामध्ये पोलिस व्हेरिफिकेशन आवश्यक आहे, अशा दंगलीत तुम्ही दिसला तर त्यासाठी १० वर्षांची शिक्षा आहे असेही इंदुरीकर महाराज म्हणाले.

इंदुरीकर महाराज म्हणाले की, मुलगी हुशार मुलावर कधीही प्रेम करत नाही, ती कधीही चांगल्या मुलाच्या नादी लागत नाही. मुलगी ही दरिद्री मुलाच्याच नादाला लागते, त्याच्यावरच प्रेम व्यक्त करते. विहिरीवरच्या मोटारी चोरणारे, गाड्यांचे पार्ट चोरतो अशा मुलांच्या मागे मुली लागतात. एखादी मुलगी दरिद्री मुलाबरोबर पळून गेली तर ती आयुष्यात कधीही सुखी होत नाही. तिने सुखी असल्याचे सांगावे, मी तिच्या घरी सहा महिने भांडी घासतो. जिने आई-बापाची मान खाली केली ती मुलगी आयुष्यात कधीही सुखी होत नाही.बारावी आणि दहावीची परीक्षा तोंडावर आल्या आहेत. मुले काहीच अभ्यास करेनात. राज्यातील सर्व शाळांत परीक्षा काळात मोबाईलवर बंदी घालावी अशी मागणी इंदुरीकर महाराजांनी केली आहे. ➪(पान २ वर)



## 14 वर्षीय मुलीवर तीन अल्पवयीन मुलांकडून सामूहिक बलात्कार

**सावनेर (नागपूर) :** नात्याला काळिमा फासणारी आणि माणुसकीला लाजवणारी एक घृणास्पद घटना सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या सरोदी टोला (तेलगाव कामठी) येथे उघडकीस आली आहे. अवघ्या १४ वर्षांच्या मुलीवर तिच्याच दूरच्या नातेवाईक असलेल्या तीन अल्पवयीन मुलांनी वारंवार अत्याचार केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि तिन्ही आरोपी एकाच गावातील रहिवासी असून एकमेकांचे दूरचे नातेवाईक आहेत. या नराधमांनी केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडितेचे अश्लील व्हिडिओ देखील बनवले. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देउन तिला वारंवार ब्लॅकमेल करण्यात आले आणि तिचे शारीरिक शोषण करण्यात आले.



***पोलिसांची कारवाई आणि गुन्हे दाखल***

पीडितेने धीर धरून सावनेर पोलिसांत धाव घेतली, घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२) (१), ६५(१), ७०(२), ३५१(४) आणि सह पोक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ६६ (e) व ६७ (ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामीण नागपूरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ➪(पान २ वर)

## आठवड्यातील मंगळवारची कॅबिनेट बैठक रद्द

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार 9 फेब्रुवारीला मंत्रालयात उपस्थित राहणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने राष्ट्रवादीसह राज्याच्या राजकारणातही मोठा बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांतही या दुर्घटनेचा आणि अजित पवारांच्या नसण्याचा परिणाम होईल, अशी चर्चा स्थानिक स्तरावर होत आहे.





दुसरीकडे पवार कुटुंबीय देखील दुःखातून सावरत राजकीय पाउले टाकत आहेत. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा यांनी आज साता-याच्या कराडमधील प्रीतीसंगम येथे जाउन यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच, अजित पवारांसमवेत विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या सुरक्षा रक्षक विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेउन सांत्वन केले. त्यामुळे, आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंत्रालयात कधी जाणार याची माहिती समोर आली आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गेल्या काही दिवसांपूर्वी दुर्दैवी अपघाती निधन झाले, अजित पवार यांच्यावर शोकाकुल वातावरणात बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आल्यानंतर त्यांचे अस्थिकलश संपूर्ण राज्यभरात कार्यकर्त्यांच्या दर्शनासाठी पाठवण्यात आले आहेत.

त्यानुसार, आज राज्यातील विविध जिल्ह्यात अजित पवारांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेउन श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी, अनेक ठिकाणी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते भावुक झाल्याचं पाहायला ➪(पान २ वर)

## एअर इंडियाच्या विमानाचा मोठा अपघात टळला !

### ऐन उड्डाणाआधीच रोखली गेले विमान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** याची गांभीर्याने दखल घेत, नागरी विमानवाहतूक संचालनालयाने एअर इंडियाच्या ताफ्यातील सर्व विमानांचे फ्यूल स्विचची तपासण्याचे निर्देश दिले होते. यानंतर, खबरदारी म्हणून सर्व विमानांची तपासणी करण्यात आली असून इतर कोणत्याही विमानात बिघाड आढळून आला नाही, असे एअर इंडियाने स्पष्ट केले. एअर इंडियाच्या बोइंग ७८७-८ विमानात पुन्हा एकदा मोठा तांत्रिक बिघाड झाल्याचे समोर आले आहे. लंडनहून बंगळुरूला येणा-या विमानातील ’फ्यूल कंट्रोल स्विच’मध्ये बिघाड झाल्यचे सोमवारी निदर्शनास आले. ज्यामुळे ➪(पान २ वर)



## बंगालची जाणीवपूर्वक बदनामी

### ◆ दिल्लीत पोहोचताच ममता बॅनर्जी कडाडल्या ◆

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिल्लीत पाउल ठेवताच केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांवर जोरदार निशाणा साधला आहे. चाणक्यपुरी येथील बंग भवन येथे जाउन त्या बंगालमधून आलेल्या लोकांची भेट घेणार आहेत आणि दिल्ली पोलिसांकडून त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची माहिती घेणार आहेत. बंगालला जाणीवपूर्वक बदनाम केले जात असून केंद्रीय यंत्रणा भाजपाच्या इशा-यावर काम करत आहेत असा थेट आरोप ममतांनी केला. जेव्हा केंद्रीय गृहमंत्री पश्चिम बंगालमध्ये येतात, तेव्हा राज्य सरकार त्यांचे स्वागत रेड कार्पेट टाकून करते. मात्र जेव्हा बंगालचे लोक किंवा त्यांचे लोकप्रतिनिधी दिल्लीत येतात, तेव्हा त्यांना ब्लॅक कार्पेटसारखी वागणूक दिली जाते असे ➪(पान २ वर)








## भाऊ परतला! ७ वर्षापासून पाकिस्तानात होता कैद

**नागपूर/प्रतिनिधी :** ‘दादा, तू घरी ये...‘ हा टाहो आहे त्या बहिणीचा जिने गेल्या ५ वर्षांपासून आपल्या भावाला शत्रूराष्ट्राच्या तावडीतून सोडवण्यासाठी आकाशपाताळ एक केले होते. मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्याचा रहिवासी असलेला प्रसन्नजीत रंगारी अखेर ७ वर्षांनंतर पाकिस्तानच्या तुरुंगातून सुटून भारतात परतला आहे. ज्या भावाला घरच्यांनी मृत मानले होते, तो जिवंत असल्याचे कळताच बहिणीने मंत्र्यांपासून अधिका-यांपर्यंत सर्वांचे उंबरठे झिजवले आणि अखेर ३१ जानेवारीला हा अभिमन्यू मायदेशात परतला.

**वडिलांच्या निधनाच्या दिवशीच आले होते पत्र!**

प्रसन्नजीत हा अभ्यासात अत्यंत हुशार होता. वडिलांनी कर्ज काढून त्याला जबलपूरमधून बी. फार्मसीचे शिक्षण दिले होते. मात्र, २०११ मध्ये नोंदणी झाल्यानंतर त्याची मानसिक स्थिती बिघडली आणि तो अचानक बेपत्ता झाला. घरच्यांनी खूप शोध घेतला, पण तो न सापडल्याने सर्वांनी आशा सोडली होती. दरम्यान, १ ऑक्टोबर २०१९ रोजी त्याला पाकिस्तानच्या बाटापूरमधून ताब्यात घेण्यात आले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ज्या दिवशी प्रसन्नजीतच्या व्हेरिफिकेशनची कागदपत्रे घरी पोहोचली, त्याच दिवशी त्याच्या वडिलांचे निधन झाले. आपल्या मुलाला डोळे भरून पाहण्याची त्यांची इच्छा अधुरीच राहिली.

### बहिणीने ५ वर्षे झिजवलेले मंत्रालयाचे ऊंबरठे

**खोट्या नावाने पाकिस्तानात होता कैद-** प्रसन्नजीत पाकिस्तानच्या तुरुंगात सुनील अदे या नावाने बंद होता. त्याच्यावर कोणतेही गंभीर आरोप सिद्ध झाले नव्हते, तरीही त्याला ७ वर्षे तुरुंगात काढावी लागली. ३१ जानेवारी रोजी अटारी-वाघा बार्डरवर बीएसएफच्या स्वाधीन करण्यात आलेल्या ७ भारतीय कैद्यांमध्ये प्रसन्नजीतचा समावेश होता. अमृतसरच्या पोलीस ठाण्यातून जेव्हा संघमित्राचा आपल्या भावाशी फोनवर संवाद झाला, तेव्हा दोघांनाही अश्रू अनावर झाले.



‘माझ्याकडे तिकिटाचे पैसे नाहीत, तूच मला न्यायला ये,‘ असे भावाने म्हणताच संघमित्राने तातडीने त्याला आणण्याची सोय केली.

**संघमित्राची ५ वर्षांची झुंज यशस्वी**

प्रसन्नजीतची बहीण संघमित्रा गेल्या ५ वर्षांपासून भावाच्या सुटकेसाठी लढा देत होती. त्याने तुरुंगातून लिहिलेली पत्रे आणि त्याची माहिती मिळवण्यासाठी तिने अनेक नेत्यांचे दरवाजे ठोठावले. ‘वडील आज आपल्यात नाहीत, पण आईला तिचा मुलगा परत मिळणार याचे समाधान आहे,‘ अशा भावना तिने व्यक्त केल्या. सध्या प्रसन्नजीत अमृतसरच्या रेड क्रास भवनमध्ये सुरक्षित असून, त्याचे मेहुणे त्याला आणण्यासाठी रवाना झाले आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# भूमी अभिलेख कार्यालयामार्फत तालुकास्तरावर जनता दरबार होणार

अमरावती/प्रतिनिधीः-

अमरावती जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख हे जिल्ह्यातील विविध तालुक्यांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान नागरिकांची जमीन मोजणी, नगर भूमापन, एकत्रिकरण याबाबत समस्या सोडविणार आहेत. तसेच या कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबंधित दिवशी उपस्थित राहतील.

या जाहीर वेळापत्रकानुसार, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते १:३० या वेळेत चांदुर रेल्वे आणि दुपारी ३ ते ६ या वेळेत तिवसा उपअधीक्षक कार्यालयात ते भेट देतील. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता नांदगांव खंडेश्वर आणि दुपारी ३ वाजता धामणगांव रेल्वे येथे दौरा नियोजित आहे. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते २ या वेळेत अमरावती मुख्यालय आणि दुपारी ३ ते ६ दरम्यान भातकुली उपअधीक्षक कार्यालयात आढावा घेतला जाईल.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, १२ फेब्रुवारी रोजी सकाळी मोर्शी आणि दुपारी वरूड येथे, तर १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता चांदुर बाजार आणि दुपारी ३ वाजता अचलपूर येथे जिल्हा अधीक्षक उपस्थित राहतील. १६ फेब्रुवारी रोजी दर्यापूर सकाळी १० वाजता आणि अंजनगांव येथे दुपारी ३ वाजता नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येईल. दौऱ्याचा समारोप २० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत चिखलदरा आणि २३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत धारणी उपअधीक्षक कार्यालयातील भेटीने होईल. जनतेच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख महेंद्रकुमार शिंदे यांनी केले आहे.

पान १ व १० वरून

## राष्ट्रवादीच्या विलीनकरणाबाबत

असा विचार दादांनी केला असेल हे कदापिही आम्हाला वाटत नाही, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले. आम्ही उपमुख्यमंत्?यांची निवड केली, आता त्यांचे नेतृत्व आहे. त्यांच्या नेतृत्वात चर्चा होतील ना, आजच व्हायला पाहिजे, उद्याच व्हायला पाहिजे असे काही नाही. राजकारणाच्या गोष्टी कधी होतात, कधी नाही होतात, असे म्हणत सुनेत्रा पवार यांच्यासोबत यासंदर्भात चर्चा होईल,असे भुजबळ यांनी सूचवले.

सुनेत्राताईंना याची काही माहिती होती का?

शशिकांत शिंदेंनी अजित दादांची शपथ घेउन विलीनीकरणाची चर्चा झाल्याचं सांगितलं. त्यावर, बरं! झालं असेल, परंतु आता परिस्थिती बदलली, नेते बदलले आहेत. सुनेत्राताईंना घरात याची काही माहिती होती का? असा सवाल छगन भुजबळ यांनी उपस्थित केला. तसेच, आता त्यांच्या नेतृत्वात बाकी नेते देखील चर्चा करतील. शेवटी हा निर्णय सामुदायिक रीतीने घ्यावा लागेल. तसेच, त्या निर्णयाच्या पाठीमागे भाजपला सुद्धा उभे राहणे आवश्यक आहे, असे मत छगन भुजबळ यांनी मांडले. दरम्यान, येवल्यात अजित पवार यांचा अस्थीकलश घेउन भुजबळ कुटुंबीय आले असून समीर आणि पंकज भुजबळ यांनी अस्थी कलश अजित पवारांच्या प्रतिमेसमोर ठेवला आहे. अस्थीचे दर्शन घेतल्यानंतर रामकुंडात अस्थी विसर्जन केले जाणार आहे.

## चिनी सैन्य चार टॅंकसह

यांनी सांगावे, असे म्हणाले. यावर, सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करू नका आणि अनावश्यक भाष्यही करू नका असे राजनाथ सिंह म्हणाले. राहुल गांधी म्हणाले, उनका स्रोत प्रामाणिक आहे आणि यात (एक प्रकाशित मासिक) माजी आर्मी जनरल (एमएम नरवणे) यांच्या अप्रकाशित पुस्तकाचे कोट आहेत. एमएम नरवणे यांच्या रिपोर्टचा हवाला देत राहुल गांधी म्हणाले, चिनी सैन्याचे टॅंक भारतीय सीमेजवळ आले आणि चिनी सैन्याने भारतीय हद्दीत प्रवेश केला. चार चिनी टॅंक भारतीय सीमेत प्रवेश करत होते. चिनी सैन्याचे टॅंक कैलास पर्वतरांगावर चढत होते.

**सभागृह नियमांनुसार चालते-** विरोधकांवर निशाणा साधत राहूल म्हणाले हे लोक पुस्तकाला घाबरत आहेत. जर ते घाबरत नसतील तर त्यांनी मला ते वाचू द्यावे. यावर, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले सभागृह नियमांनुसार चालते.

## मी तुमचा सल्लागार नाही

'भारत-चीन संबंधांवर बोलण्यापासून कोणता नियम रोखतो?' -

दरम्यान, राहुल गांधी म्हणाले, 'भारत-चीन संबंधांवर बोलण्यापासून आपल्याला कोणता नियम रोखतो?' यावर अध्यक्ष म्हणाले, सध्याच्या विषयाशी याचा काहीही संबंध नाही. मात्र, यावर राहुल गांधी पुन्हा म्हणाले, आपल्याला म्हणायचे आहे की, राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचा परराष्ट्र धोरनाशी कसलाही संबंध नाही. यावर अध्यक्ष म्हणाले, आपण विषयावर बोलावे. यासंदर्भात आपल्याला अनेक वेळा नियम समजावण्यात आले आहेत.

अखिलेश यादव यांनी राहुल गांधींचे समर्थनार्थ केले -

यानंतर, राहुल गांधी यांनी एका मासिकातील लेखाचा उल्लेख करत पुन्हा तोच विषय उपस्थित केला. यानंतर, सत्ताधारी बाकांवरून पुन्हा जोरदार विरोध करण्यात आला. दरम्यान, सपा प्रमुख अखिलेश यादव यांनी राहुल गांधींचे समर्थनार्थ केले. 'चीनचा मुद्दा संवेदनशील असून एखादा सल्ला देशहिताचा असेल तर विरोधी पक्षनेत्यांना बोलू द्यायला हवे,' असे ते म्हणाले. यावर, केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, 'आम्ही येथे ऐकण्यासाठी बसलो आहोत. मात्र, ते अध्यक्षांच्या आदेशानंतरही पुन्हा तेच वाचत आहेत. सभागृह असे कसे चालू शकते?' यानंतरही सभागृहात बराचवेळ गदारोळ सुरू होता. अखेर सभापतींनी सभागृहाचे कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब केले होते. यानंतर जेव्हा पुन्हा कामकाज सुरू झाले. त्यानंतरही राहुल गांधी त्यांच्या म्हणण्यावर आग्रही होते. यावर पुन्हा गदारोळ होउन काम काज उद्यापर्यंत स्थगित करण्यात आले.

## आरोपीचे अकोला कनेक्शन

त्याच्या घराला अनेक दिवसांपासून कुलूप लागलं आहे.

या पोस्टमध्ये म्हटलं की आम्ही त्याला अनेक वेळा मेसेज केला आहे की आमच्या कामात हस्तक्षेप करणं थांबवा, पण तो समजत नाही. हा फक्त एक छोटासा ट्रेलर आहे. जर त्याला आमचा निरोप पुढे समजला नाही, तर त्याला त्याच्या घराबाहेर नाही तर त्याच्या बेडरुममध्ये, त्याच्या छातीत गोळ्या घातल्या जातील. हा संपूर्ण बालिवूड इंडस्ट्रीला इशारा आहे. पुढं लिहीत म्हटलंय की वेळेत सुधार, नाहीतर तुझे खूप हाल होतील. बाबा सिद्दीकीपेक्षाही वाईट हाल करु . आम्ही ज्यांना ज्यांना फोन केला आहे, वेळेत सुधारा, नाहीतर तुम्हाला लपण्याची जागा कमी पडेल. तू आणि आमचे सर्व शत्रू, तयार राहा. लवकरच भेटू..

## शेख हसीना यांना

आरोप केला होता की, शेख हसीना यांनी सत्तेचा गैरवापर करत आणि सरकारी अधिका-यांशी संगनमत करून नियमांना हरताळ फासला. या प्रकल्पातील सेक्टर २७ मधील डिप्लोमॅटिक झोनमध्ये स्वत:साठी आणि आपल्या नातेवाईकांसाठी प्रत्येकी १० कट्ठाचे ६ भूखंड बेकायदेशीरपणे लाटले होते. विशेष म्हणजे, हे सर्व सदस्य या भूखंडांसाठी पात्र नसतानाही त्यांना हे वाटप करण्यात आले होते.

***कुटुंबासह अधिका-यांवरही गाजली कु-हाड-***न्यायाधीश मोहम्मद रबीउल आलम यांनी या प्रकरणात केवळ हसीना यांनाच नाही, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला दोषी धरले आहे. हसीना यांची दुसरी भाची अजमीना सिद्दीक आणि पुतण्या राडवान मुजीब सिद्दीक ब?बी यांनाही ७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. यासोबतच १ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास अतिरिक्त सहा महिने कारावास भोगावा लागणार आहे. या घोटाळ्यात केवळ राजकीय नेतेच नाही, तर तत्कालीन बड्या अधिका-यांचाही समावेश होता. न्यायालयाने माजी गृहनिर्माण मंत्री शरीफ अहमद, माजी सचिव आणि राजुकच्या अनेक माजी अध्यक्षांसह एकूण ११ जणांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे.

***जलदगतीने चालला खटला-*** या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, अवघ्या १५ सुनावणींमध्ये हा खटला पूर्ण करण्यात आला. यामध्ये ३९ साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या, ज्यात भ्रष्टाचारविरोधी आयोगाचे अधिकारी आणि गृहनिर्माण मंत्रालयातील वरिष्ठ कर्मचा-यांचा समावेश होता. शेख हसीना यांच्यासाठी हा पहिलाच धक्का नाही. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्येही त्यांना भ्रष्टाचाराच्या चार वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये एकूण २६ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. आता या नवीन निकालामुळे हसीना आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या राजकीय भविष्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

## मुली दरिद्री मुलांच्या मागे

मी दीड वर्षे शेती करून पाहिली, काहीही खरं नाही. इतर काहीही करा, पण भाजी आणि किराणा वरच्यावर भरता येईल असे काहीतरी करा असं आवाहन इंदुरीकर महाराजांनी केले.

आजकाल शाळेतली पोरं रम्मी खेळून भिकारी झाले आहेत. पोरं अभ्यास करणारे नाही. अभ्यास हा विषय त्यांनी सोडून दिला. परीक्षा आली की खिडकीतून चिठ्ठी येते अशा शब्दात इंदुरीकर महाराजांनी टीका केली.

आजकाल पेनमध्ये कॅमेरे आहेत. टपरी पेटवाताना किंवा दंगलीत तुम्ही कुठे दिसले तर, १० वर्षांची शिक्षा आहे. कारण, आतापर्यंत दंगलीमध्ये गरिबांची पोरं आत गेली आहेत, मोठ्या श्रीमंतांची पोरं नाहीत आणि ते कधी जाउ देणारही नाहीत. ते तुमचा वापर फक्त युज अँड थ्रो म्हणून करणार, असेही कीर्तनकार इंदुरीकर महाराजांनी ठणकावून सांगितले आहे. आज कोणतंही काम करायला पोलिस व्हेरिफिकेशन दाखला लागतो. म्हणून सर्व पोरांच्या पाया पडतो, दंगलीच्या भानगडीत पडू नका, असंही इंदुरीकर महाराजांनी म्हटले आहे.

मी काहीही केलं तर लोक शिव्या देतात, मी फक्त सत्य बोलतो तरी लोक टीका करतात असे इंदुरीकर महाराज म्हणाले. ३१ वर्षे आयुष्य लोकांच्या शिव्या खाण्यात गेलंय, मग थोड्यासाठी कशाला बंद करायचं असं म्हणत यापुढेही आपण कीर्तन सुरू ठेवणार असल्याचं इंदुरीकर महाराजांनी म्हटले आहे.

## 14 वर्षीय मुलीवर तीन

सावनेरचे ठाणेदार उमेष पाटील पुढील तपास करत आहेत.आरोपींची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली. पोलिसांनी तिन्ही अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेउन सावनेर न्यायालयात हजर केले. मात्र, आरोपी अल्पवयीन असल्याने न्यायालयाने त्यांना नागपूर येथील बालसुधारगृहात पाठवण्याचे आदेश दिले आहेत. ही घटना समाजातील एका भीषण वास्तवाकडे बोट दाखवते. १४ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करणारे आरोपी केवळ 'अल्पवयीन' आहेत म्हणून कडक शिक्षेपासून वाचणार का? वारंवार होणारे असे गुन्हे आणि त्यांना मिळणारी मवाळ वागणूक यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढत आहे. अशा क्रूर गुन्ह्यांसाठी कायद्यात कठोर बदलांची गरज असून, तरच अशा प्रवृत्तींना चाप बसेल. अन्यथा, रोज अशा बातम्या वाचण्याची दुर्दैवी वेळ समाजावर येईल.

## आठवड्यातील मंगळवारची कॅबिनेट

मिळालं. दुसरीकडे बारामतीतही आज पवार कुटुंबीयांच्या सांत्वनसाठी राज्यभरातून कार्यकर्ते पदाधिकारी येत आहेत. त्यासाठी, सुनेत्रा पवार याही बारामतीत आहेत. उद्या मंत्रालयात होणारी मंत्रिमंडळ बैठक पुढे ढकलण्यात आली आहे, त्यामुळे या आठवड्यात मंत्रिमंडळ बैठक होणार नाही.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक दर मंगळवारी होत असते, मात्र उद्याची बैठक होणार नसल्याची माहिती आहे. अजित पवारांचे दुःखद निधन आणि राज्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्याची मंत्रिमंडळ बैठक होणार नाही. त्यामुळे, या बैठकीला नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहतील काय, या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. सुनेत्रा पवार पुढील दोन दिवस पुणे जिल्ह्यात दौरा करणार आहेत. तर, ९ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात उपस्थित होणार आहेत, अशी माहितीही सूत्रांकडून मिळाली. दरम्यान, आज बारामतीत पवार कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी अजितदादा प्रेमी, नागरिक आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे.

## बंगालची जाणीवपूर्वक बदनामी

म्हणत टीकास्त्र सोडले आहे. तसेच ममतांनी याला अपमानास्पद आणि पक्षपातीपणाचे लक्षण म्हटले असून हा मुद्दा केवळ सन्मानाचा नसून लोकशाही आणि समान वागणुकीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या अन्यायाविरुद्ध आणि छळाविरुद्ध आपण आवाज उठवणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र आणि दिल्ली प्रशासनाने बंगालच्या लोकांशी निष्पक्ष आणि समान वागणूक द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. बंगालमधून आलेल्या लोकांच्या हक्कांच्या आणि सुरक्षेच्या दृष्टीने ममतांचा हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मुख्यमंत्र्यांनी सुरक्षेच्या मुद्यावरूनही प्रश्न उपस्थित केले.

जर दिल्लीत एखादा स्फोट झाला, तर दिल्ली पोलिस कुठे असतात? जेव्हा मी स्वतः येथे येते, तेव्हा दिल्ली प्रशासन घाबरते. जर मला हवे असते, तर मी लाखो लोकांना येथे आणू शकले असते, पण मी केवळ अशा ५० लोकांना सोबत आणले आहे. ज्यांना एसआयआरमध्ये मृत दाखवण्यात आले होते.

## एअर इंडियाच्या विमानाचा

उड्डाण रोखण्यात आले. याची गांभीर्याने दखल घेत, नागरी विमानवाहतूक संचालनालयाने एअर इंडियाच्या ताफ्यातील सर्व विमानांचे फ्यूल स्विचची तपासण्याचे निर्देश दिले होते. यानंतर, खबरदारी म्हणून सर्व विमानांची तपासणी करण्यात आली असून इतर कोणत्याही विमानात बिघाड आढळून आला नाही, असे एअर इंडियाने स्पष्ट केले.

**एअर इंडियानं जारी केलं निवेदन** -यासंदर्भात, एअर इंडियाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'आमच्या एका पायलटने बोइंग ७८७-८ विमानातील फ्यूल कंट्रोल स्विचमध्ये संभाव्य बिघाड असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच आम्ही ते विमान तत्काळ ग्राउंड केले. उत्पादक कंपनीच्या (ग्रक्र) मदतीने त्याची सखोल तपासणी करण्यात येत आहे. प्रवासी आणि कर्मचा-यांची सुरक्षितता आमच्यासाठी सर्वोपरी आहे.'

## महापालिकेत महायुतीचा 'सव्वा-

महामंत्री उपेंद्र कोठेकर प्रामुख्याने उपस्थित होते.

महायुतीने अंतर्गत मतभेद टाळण्यासाठी अडीच वर्षांच्या कार्यकाळाची विभागणी केली आहे. पहिले सव्वा वर्ष: महापौरपदी श्रीचंद तेजवानी आणि उपमहापौरपदी सचिन भेंडे काम पाहतील.

दुसरे सव्वा वर्ष महापौरपदाची जबाबदारी आशिष अतकरे (भाजप) यांच्याकडे, तर उपमहापौरपद अजय जयस्वाल (युवा स्वाभिमान) यांच्याकडे सोपवले जाईल.

या निर्णयाद्वारे भाजपने शहरात 'सोशल इंजिनिअरिंग' साधण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे ११ नगरसेवकही महायुतीसोबत सत्तेत सहभागी होणार आहेत.

**राजकीय पेच आणि तडजोड-**निवडणुकीत श्रीचंद तेजवानी आणि आशिष अतकरे या दोघांनीही आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवारांचा पराभव केला होता. मात्र, महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी आता भाजपने त्याच युवा स्वाभिमान पक्षासोबत हातमिळवणी केली आहे.

**आता लक्ष स्थायी समितीकडे!-** महापौर आणि उपमहापौर पदाचा तिढा सुटल्यानंतर आता सर्वांच्या नजरा स्थायी समिती सभापती पदाकडे लागल्या आहेत. महायुतीमधील कोणत्या घटकाला हे महत्त्वाचे पद मिळते, याची उत्सुकता राजकीय वर्तुळात शिगेला पोहोचली आहे.

## एमडी तस्करी प्रकरणातील ४

वर कारागृहात पाठविण्यात आले आहे. इतर आरोपींचा शोध युद्ध स्तरावर घेतला जात आहे.माहितीनुसार नवसारी परिसरातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागील भागात एमडी ड्रग्सची डीलिंग होण्याची माहिती डीआरआयच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार रविवारी दुपारी पथकाने गुप्त माहितीच्या आधारे येथे कार्यवाही केली. येथून ४.९९ किलो एमडी पावडर १० कोटीचे जप्त करण्यात आले. यानंतर डी आर आयचे उपायुक्त गौरव मेश्राम शहरात ठाण मांडून बसले आहे. जीएसटी भवनातून फॉरेन्सिक प्रक्रिया व संशयींतांचे नेटवर्क उलगडण्यावर लक्ष दिले जात आहे. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे शहर पोलिसांना या कार्यवाही पासून दूरच ठेवण्यात आले होते. महिना भरापूर्वी वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे डीआरआयनं तब्बल १९८ किलो एमडी जप्त केलं होतं. त्या मोठ्या प्रकरणाच्या तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारावर अमरावती शहरात असणाऱ्या एमडीच्या वितरण साखळीचा माग काढण्यात आला. त्यातून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. डीआरआयच्या पथकानं ही कारवाई पूर्ण गोपनीयतेत पार पाडली. विशेष म्हणजे कारवाई पूर्ण होईपर्यंत स्थानिक गाडगे नगर पोलिसांनाही याची माहिती देण्यात आली नव्हती. अटक आरोपींकडून आणखीन माहिती काढण्याचे काम केले जात आहे. प्रकरणाशी जोडलेले आरोपी लवकरच पथकाच्या हाती लागतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शेकडो लाडक्या बहिणींची तहसील

असलेल्या लाडक्या बहिणींची नावाची यादी बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे पाठवली मात्र सदर यादीत हजारो महिलांची नावे सुद्धा आहे. पात्र किंवा अपात्र याचे कारण सुद्धा लाडक्या बहिणींना सांगण्यात येत नसून तात्काळ १५ दिवसांचे आत लाडकी बहीण योजनेचे पोर्टल सुरू करण्यात यावे. ई-केवायसी करणे सुद्धा सुरू करावे तसेच सदर ऑनलाईन पोर्टल वर त्रुटी दुरुस्तीचे पर्याय देण्यात यावे व प्रलंबित लाडक्या बहिणींचे हप्ते तात्काळ वाटप करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना तहसीलदर मार्फत सादर करण्यात आले. १५ दिवसांचा अल्टिमेट देण्यात आला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर, नगरध्यक्ष प्राप्ती मारोटकर, महिला बालकल्याण सभापती कांता लोमटे, नगरसेवक प्रिती इखार, माजी उपसभापती रेखा नागोलकर, अनिता भंडारे, शारदा सोनोने, जयश्री सुहागपुरे, अर्चना काळेकर, कुमुद जंगले, छाया दिघडे, संगीता गावंडे, माधुरी ढाकुलकर, स्वाती ठाकरे, सोनाली गावंडे, वनिता पुंड, शिवसेनेचे पंकज पिंपळकर, निलेश इखार, पवन पुसदकर, अक्षय काळे, अक्षय राणे,आकाश लोमटे, राष्ट्रवादी चे मो.साजिद इत्यादी उपस्थित होते.

१५ दिवसांत लाडक्या बाहिणीचे हप्ते जमा न झाल्यास तसेच लाडक्या बहिणीचे पोर्टल सुरु न झाल्यास लाडक्या बहिणींना घेऊन रास्ता रोको करू असा इशारा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी दिला.

## दिवंगत लोकनेते अजित पवार

यांच्यावर सोपविण्यात आली. त्याअनुषंगाने आज दिनांक २ फेब्रुवारी रोजी आ. सुलभाताई संजय खोडके यांच्या रेल्वेस्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे सर्व सहा जिल्ह्यांचे अस्थिकलश आणण्यात आले. यावेळी सर्व अस्थिकलशाचे विधिवत पूजन करून महाराष्ट्राचे दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तदनंतर आ.सुलभा खोडके व आमदार संजय खोडके यांनी प्रत्येक जिल्ह्याचा अस्थिकलश हा त्या -त्या जिल्ह्यातील प्रमुख मंडळी व प्रतिनिधीकडे सुपूर्द केला.

तसेच अमरावती जिल्ह्यासाठी अजितदादा पवार यांचा अस्थिकलश आमदार सुलभा खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे ठेवण्यात आला. जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस परिवार,सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते तसेच सर्व नागरिकांनी दादांच्या अस्थिकलशाचे दर्शन करून, पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी दादांचा अमरावतीमधील चाहता वर्ग शेकडोंच्या संख्येने उपस्थित होता. महाराष्ट्राच्या राजकारणातील अजातशत्रू लोकनेता दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने सर्व चाहतावर्ग शोकसागरात बुडाला असून दादांच्या स्मृतीचे स्मरण करून आज लाडक्या लोकनेत्याप्रतीची आपली शोकसंवेदना प्रकट केली. यावेळी अनेकांचे डोळे सुद्धा पाणावले होते. यावेळी सर्व शोकमग्न मंडळींनी आ. सुलभा खोडके व आ.संजय खोडके , यश खोडके यांची भेट घेऊन सांत्वन केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महासचिव (संघटन )आ.संजय खोडके यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सोबत असलेल्या आठवणींना उजाळा दिला. महाराष्ट्राने एक कोहिनुर हिरा गमावला असून एक शिस्तप्रिय, कर्मठ, कुशल प्रशासक, जनतेच्या प्रश्नांची जाण व भान बाळगून सर्वसमाजघटक व सर्वसमावेशक जनतेच्या कल्याणासाठी धडपडणारा एक कामाचा माणूस आपण गमावला असल्याची शोकसंवेदना आ. संजय खोडके व्यक्त केली. तसेच आज दादांच्या अस्थिकलशाचे सर्वांनी दर्शन घेतल्या नंतर मंगळवारी पहाटे पहाटेच्या सुमारास गुरुकुंज मोझरी येथील पवित्र कुंडात श्री. गुरुदेव मंडळाच्या परंपरेनुसार दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पवित्र अस्थिकलशाचे विधिवत विसर्जन करण्यात येणार असल्याचे सुद्धा आ.संजय खोडके यांनी यावेळी सांगितले.

**पाच जिल्ह्यात अस्थिकलश सुपूर्द-** दिवंगत उपमुख्यमंत्री - अजितदादा पवार यांचे अस्थिकलश मुंबई येथून रवाना करण्यात आल्या नंतर सोमवारी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास अमरावती येथील आ. सुलभा खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालयात पोहोचले. यावेळी आ. सुलभाताई खोडके व आ. संजय खोडके यांनी वर्धा जिल्ह्याचा अस्थिकलश माजी आमदार राजू तिमांडे, जिल्हा प्रमुख शरद शहारे, ॲड. सुधीर कोठारी, राणाजी नन्नावरे यांच्याकडे सुपूर्द केला. तसेच वाशीम जिल्ह्याचा अस्थिकलश घेऊन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांचे बंधू राम ठाकरे रवाना झाले. त्याचबरोबर बुलढाणा येथील अस्थिकलश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझर काझी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. अकोला जिल्ह्याचा अस्थिकलश घेऊन आ.अमोल मिटकरी यांचे स्वीय सहाय्यक स्वप्नील थोरात व शैलेश वानखडे हे सोबत घेऊन रवाना झाले. तर यवतमाळ जिल्ह्याचा अस्थिकलश आ.खोडके यांनी जिल्हाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांच्याकडे सुपूर्द केला. तर अमरावती जिल्ह्याचा अस्थिकलश जनसंपर्क कार्यालयात दुपारपासून ते रात्री उशिरापर्यंत सर्वांच्या दर्शनासाठी खुला ठेवण्यात आल्याने सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते, समाज संघटना तसेच नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

## एमडी ड्रग्सबाबत कारवाई करा

भारत' या टॅगलाईनला अनुसरून व्यापक जनजागृती करावी.

अंमली पदार्थामुळे समाजावर दुष्परिणाम होणार आहे. त्यामुळे पोलिसांनी संपर्क वाढवून सातत्याने कारवाई करावी. अमरावती येथील कारवाईच्या अनुषंगाने पोलिसांनी बंद घरे, फ्लॅट यांच्यावर निगराणी ठेऊन गोपनीय पोलिस यंत्रणा सतर्क करावी. आवश्यकता पडल्यास अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर तडीपारीची कारवाई प्रस्तावित करावी. तसेच अन्न व औषधी प्रशासन विभागाने रासायनिक कारखान्यांमध्ये अंमली पदार्थांचे उत्पादन होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रामख्याने औद्योगिक परिसरातील बंद कारखान्यात अंमली पदार्थांची निर्मिती होत असल्याचे काही ठिकाणी लक्षात आल्याने अशा परिसरावर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिल्या.

## डफरीनच्या डॉक्टरांवर

दाखल करण्यात आले होते. १३ जानेवारी रोजी त्यांच्या गर्भपात झाला. तिला लगेच विश्रांती ऐवजी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. १६ जानेवारीला प्रकृती ठीक नसतानाही तिला जबरदस्ती कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी ॲनस्थेशिया देण्यात आला. यानंतर तिची प्रकृती गंभीर झाली. मात्र रुग्णालयाने याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांना कुठलीही माहिती नाही दिली. प्रकृती अत्यंत चिंताजनक असताना १६ जानेवारी ते २३ जानेवारी दरम्यान ती मृत्यूशी झुंज देत होती आणि शेवटी तिचा मृत्यू झाला. याला डफरीन चे डॉक्टर जबाबदार आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून डॉक्टरांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी प्रहारने केली आहे. निवेदन देताना बंटी रामटेके, गोलू पाटील ,प्रशांत देशमुख ,अलका शहाणे, शुभांगी वाटाणे ,अलका डहाणे, रतनगिरी गोस्वामी, मनीष देशमुख ,शेषराव धुले, विक्रम जाधव, नंदू वानखडे, कुणाल खंडारे, भीमराव वानखडे आदि उपस्थित होते.

## राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य

संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान डॉ. संजय आदमने अध्यक्ष, पद्मश्री फाउंडेशन नागपूर, प्रमोद भोंगे ग्रामगीताचार्य, पुलगाव, शंकर मोहोड ग्रामगीताचार्य, वर्धा, राष्ट्रीय किर्तनकार अशोक भगत, ह.भ.प. विलास महाराज साबळे अध्यक्ष, दास टेकडी, डॉ. किरणताई खडसे व गुरू अर्चनाताई रापर्तीवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.कार्यक्रमास कौंडण्यपूर येथिल मठाधिपती रामानंद राजेश्वर, सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ, पद्मश्री पुरस्कारप्राप्त जनार्दनपंत बोथे , दामोदर पाटील, बाबाराव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रीय सॉफ्टबॉल शालेय

उत्कृष्ट कामगिरी करून राज्याचा नावलौकिक वाढवून क्रीडा रसिकांचा विश्वास सार्थकी लावला. बिहार,पंजाब व हरियाणा यांना पराभूत केल्यानंतर अंतिम सामन्यात दिल्लीचा पराभव करून महाराष्ट्र संघाने अजिंक्यपद प्राप्त केले . नागपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय मुलींच्या सॉफ्टबॉल स्पर्धेत मंजिरी ने सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मंजिरी ही श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील इयत्ता बारावीची विद्यार्थिनी आहे.

## प्रवाशांच्या हक्कासाठी गुरुकुंज

याबाबत वारंवार लेखी तक्रारी व मौखिक निवेदने देऊनही एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेचे नेते संजय देशमुख यांनी मोझरी एस.टी. स्टॅण्डवर उपोषणास सुरुवात केली. उपोषणाची दखल घेत महामंडळाचे विभाग नियंत्रक संदीप रायलवार व जयदीप घोडे यांनी उपोषण मंडपाला भेट देत प्रवाशांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका दर्शविली.

यावेळी अमरावती डेपो अंतर्गत अमरावती येथील पंचवटी चौक तसेच तिवसा येथील पंचवटी चौक येथे जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल, तसेच प्रत्येक एस.टी. चालकाच्या लॉगशीटवर मोझरी बायपासने बस न नेता मोझरी व तिवसा या थांब्यांवर बस थांबवून प्रवाशांना बसमध्ये चढू द्यावे, अशा लेखी सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. यासोबतच मोझरी बस स्टॅण्डवर दोन जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले.तथापि, आज उपोषण सुरू असल्यामुळेच अनेक बसेस मोझरी व तिवसा येथे थांबत आहेत. जोपर्यंत या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, अशी ठाम भूमिका प्रहार कार्यकर्त्यांनी घेतली आहे.

यावेळी सुरेंद्र देवगडे, कपिल उमप, इर्शाद बेग, योगेश लोखंडे, हेमंत तायडे, प्रेमानंद कांडलकर, अशोकराव लांजेवार, शरद खारोडे, श्याम काळकर, राजाभाऊ आंबेडकर, मोहन लोखंडे, विलास कांदळकर, मंगेश वानखडे, प्रशांत राऊत, नवीन कोचर, अमोल बेलसरे, मनोहर पुरी, नरेंद्र काकडे, अनिल मेश्राम, विवेक बेले आदी उपस्थित होते.

## थिलोरी ग्रामपंचायतची निष्क्रियता,

सरपंच, थिलोरी

दरवर्षी ग्रामपंचायत बाजाराच्या जागेचा लिलाव करते. त्यांच्यासाठी ग्रामपंचायतने पाच वर्षात कोणतीच उपाययोजना केल्या नाहीत. उपाययोजना केल्या असत्या तर ही वेळ आली नसती. **-संदेश वाकपांजर, ग्रामस्थ, थिलोरी**

गावात भरत असलेल्या बाजारात अचानक सांडपाणी आल्याने व्यापाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून याकडे ग्रामपंचायत मुद्दामपणे दुर्लक्ष करीत आहे. -अनिल होले, माजी सरपंच,थिलोरी

## जिल्ह्यात 'कुष्ठमुक्त सुरक्षित

डॉ. मनिषा निंबाळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. रिकुंजय केचे, डॉ. रसिका धर्मे व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. 'भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया' असे आवाहन करीत हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**रहेमानिया सोसायटी, अचलपूर सिटी द्वारा संचालित**
**रहेमानिया हायस्कुल अँड ज्युनियर कॉलेज / रहेमानिया गर्ल्स हायस्कुल / रहेमानिया प्रायमरी स्कुल**
अचलपूर सिटी, ता. अचलपूर, जि. अमरावती
(अल्पसंख्याक दर्जा प्राप्त अनुदानित शाळा)
**- पाहिजेत -**

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | माध्यम | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षण सेवक वर्ग ९ व १० | ०१ | बी.ए/बी.एस.सी बी.पी.एड. | उर्दु | अनुदानित |
| ०२ | शिक्षण सेवक वर्ग ६ ते ८ टी.ई.टी. पास पेपर-२ | ०२ | बी.ए./बी.एस.सी/ डि. एड/बी.एड. | उर्दु | अनुदानित |
| ०३ | शिक्षण सेवक वर्ग १ ते ५ करीता टी.ई.टी. पास पेपर- १ | ०२ | एच.एस.सी. डि.एड | उर्दु | अनुदानित |
| ०४ | ग्रंथपाल शिक्षण सेवक | ०१ | बी. लॅब | उर्दु | अनुदानित |

दिनांक २०/०२/२०२६ शुक्रवार रोजी मुळ प्रमाणपत्रासह स्वखर्चाने रहेमानीया हॉयस्कुल अचलपूर शहर ता. अचलपूर, जि. अमरावती चे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता मुलाखती करीता उपस्थित राहावे.

**सचिव,**
**रहेमानिया सोसायटी अचलपूर**

**अध्यक्ष**
**रहेमानिया सोसायटी अचलपूर**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अतिक्रमण हटाव कारवाईमुळे लहान व्यावसायिकांवर उपासमारीचे संकट

**वाशिम :** शहरातील सिव्हिल लाईन परिसरात देशमुख हॉस्पिटलपासून महिला बचत गट परिसरापर्यंत नुकतीच करण्यात आलेली अतिक्रमण हटाव कारवाई अनेक लहान व्यावसायिकांसाठी गंभीर आर्थिक संकट निर्माण करणारी ठरली आहे. या कारवाईत रस्त्यालगत व परिसरात व्यवसाय करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांचे गाडे, टपऱ्या व व्यवसाय हटविण्यात आल्याने अनेक कुटुंबांचे एकमेव उत्पन्नाचे साधन अचानक बंद झाले आहे.



## बाधितांच्या पुनर्वसनासाठी वज्रदेही महिला विकास संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

या पार्श्वभूमीवर वज्रदेही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्षा आरती ठोके यांच्या नेतृत्वाखाली बाधित लहान व्यावसायिकांच्या पुनर्वसन व सहाय्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात अतिक्रमण कारवाईमुळे होरपळणाऱ्या गरीब, कष्टकरी व महिला व्यावसायिकांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर लहान व्यवसाय हे केवळ रोजगाराचे साधन नसून अनेक कुटुंबांचा आर्थिक कणा होते. विशेषतः महिला बचत गटाशी संबंधित महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी हे व्यवसाय सुरू केले होते. मात्र अचानक झालेल्या कारवाईमुळे या महिलांसमोर उपासमारी, कर्जबाजारीपणा आणि आर्थिक असुरक्षिततेचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. 'शासनाचे नियम, कायदे व शहर सुशोभीकरणाची गरज आम्ही मान्य करतो; परंतु या प्रक्रियेत गरिबांच्या जगण्याचा प्रश्न दुर्लक्षित होऊ नये. सामाजिक न्याय आणि मानवतेच्या दृष्टीने बाधित कुटुंबांना संरक्षण मिळणे अत्यावश्यक आहे,' असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. वज्रदेही महिला विकास संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे पुढील महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत

बाधित लहान व्यावसायिकांना तातडीने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. त्यांचे सन्मानपूर्वक पुनर्वसन करण्यासाठी विशेष योजना राबवावी.

नुकसानग्रस्त कुटुंबांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. भविष्यात अशा कारवायांपूर्वी संबंधित व्यावसायिकांना पूर्वसूचना देऊन समन्वय साधावा. यावेळी आरती ठोके, चेतन इंगोले यांच्यासह वज्रदेही महिला विकास संघाचे अनेक कार्यकर्ते तसेच महिला बचत गटातील महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. उपस्थितांनी प्रशासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी व बाधित कुटुंबांचे जीवन पुन्हा उभे राहण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, अशी जोरदार मागणी केली. प्रशासनाकडून याबाबत सकारात्मक निर्णय होतो का, याकडे आता शहरातील सर्वसामान्य नागरिकांसह बाधित व्यावसायिकांचे लक्ष लागले आहे.

# स्व. सुभाष राठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राजस्थान महाविद्यालयात ४१० रक्तदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राजस्थान एज्युकेशन सोसायटीच्या वतीने, राजस्थान महाविद्यालय वाशीम व ॲड. रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. सुभाष राठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अतिशय उत्स्फूर्तपणे रक्तदात्यांनी ४१० रक्तदान करून स्व. सुभाष राठी यांना श्रद्धांजली अर्पण केली.



सदर रक्तदान शिबिराचे उद्घाटन सकाळी ८.०० वाजता स्व. सुभाष राठी यांच्या प्रतिमेचे पूजन व फीत कापून करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष, राजस्थान एज्युकेशन सोसायटीचे, अध्यक्ष ठाकूरदास मालाणी होते. त्यांनी याप्रसंगी वाशीम जिल्ह्यात सिकलसेलचे रुग्ण सद्य: स्थितीत मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे आपण करत असलेले रक्तदानांमुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळेल असे सांगून शिबिराला शुभेच्छा दिल्या. शिबिराचे उद्घाटक आ. किरण सरनाईक यांनी केले. रक्तदानापेक्षा कोणतेच दान मोठे नाही. त्यामुळे रक्तदान शिबिराचे आयोजक व रक्तदात्याचे अभिनंदन केले. राजस्थान एज्युकेशन सोसायटीच्या माजी अध्यक्षा तथा विद्यमान डायरेक्टर श्रीमती शीला राठी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्व. सुभाष राठी यांच्या स्मरणार्थ आयोजित रक्तदान शिबीर सामाजिक जाणवेतून केलेला उपक्रम असून फारच स्तुत्य आहे असे सांगितले. या भव्य रक्तदान शिबिरासाठी प्रमुख अतिथी म्हणून राजस्थान एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्यामसुंदर मुंदडा, अशोक इन्नानी, सचिव सुधीर राठी, सहसचिव ओमप्रकाश सोनी, आनंद राठी तथा सभासद हरीष राठी, प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर, प्राचार्य डॉ. प्रकाश दाभाडे आदि मान्यवर उपस्थित होते.

या भव्य रक्तदान शिबिरामध्ये झालेले रक्तदान गरजू व्यक्तींनाच मिळावे म्हणून वाशीम येथील शासकीय रुग्णालयाच्या ब्लड बँकेला देण्यात आले. त्यावेळी रक्त संकलनाकरीता डॉ. सतीश मेश्राम, शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अविनाश पुरी, डॉ. हरिदास मुंडे, डॉ. सचीन दंडे व इतर कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

# कुख्यात गुंड जयराज पांडे एक वर्षासाठी स्थानबद्ध

## एमपीडीए कायद्याअंतर्गत जिल्हादंडाधिकाऱ्यांचा आदेश

**अकोला :** शहरातील कायदा-सुव्यवस्थेला सातत्याने आव्हान देणारा कुख्यात गुंड जयराज सतिष पांडे (वय २८, रा. रघुवंशी मंगल कार्यालयाजवळ, नेकलेस रोड, रतनलाल प्लॉट) याला महाराष्ट्र प्रतिबंधक नजरकैद कायदा (एमपीडीए) अंतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांनी सोमवारी दि. २ फेब्रुवारी रोजी हा आदेश पारित केला.



जयराज पांडे याच्यावर जबरी चोरी, घातक शस्त्रांनी दुखापत करणे, घरफोडी, गैरनिरोध, शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने धमकी देणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, हद्दपार आदेशाचे उल्लंघन, गृहअतिक्रमण आदी गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्याच्यावर विविध कलमान्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. मात्र, या कारवाईचा त्याच्यावर कोणताही परिणाम झाला नसल्याचे निष्पन्न झाले.

त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कृत्यांमुळे नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याने, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी त्याला स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. सर्व कायदेशीर बाबींची तपासणी तसेच गोपनीय माहितीच्या आधारे जयराज पांडे हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्यानंतर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी एमपीडीए अंतर्गत कारवाईचा आदेश दिला.

आदेशानंतर तात्काळ शोध घेऊन जयराज पांडे याला अटक करण्यात आली असून त्यास अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके, तसेच सिव्हील लाईन पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक मालती कायटे, दिनेश पवार, शक्ती कांबळे, प्रदीप पवार, अक्षय तायडे, पवन शिरसाट यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे पार पाडली.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुन्हेगारी कृत्यांना अजिबात थारा दिला जाणार नाही. सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए व इतर कठोर कायद्यांतर्गत कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला आहे.

# धनगर अधिकारी-कर्मचारी संघटनेचा ५ वा वर्धापन दिन संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक संघटनांचे कार्यक्रम म्हणजे केवळ राजकीय भाषणे व गटबाजी, असा सर्वसाधारण समज असताना धनगर अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, अकोला जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित पाचवा वर्धापन दिन व हळदी-कुंकू समारंभाने हा समज पूर्णतः खोडून काढला. अण्णासाहेब रोकडे सभागृहात पार पडलेला हा कार्यक्रम विचारप्रवर्तक ठरत समाजाला सकारात्मक दिशा देणारा ठरला.

कार्यक्रमास महिला-पुरुषांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, अहिल्या स्तवन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात अकोला जिल्हाध्यक्ष व कार्यकारी अभियंता विनोद हंबर्डे यांनी संघटनेच्या पाच वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष सुधीर ढवळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्याध्यक्ष अनिलकुमार ढोले यांनी संघटनेची भूमिका, समाजातील एकता व अधिकारी-कर्मचाऱ्यांची सामाजिक जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला नाना पांडे, प्रविण लांडे, प्रविण भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच केशवराव पातोड, धिरज गादे, डॉ. राजेंद्र काटकर, प्रा. डॉ. अनिल तिरकर, मुकुंदराव भदे, मनोज पुंड व सचिव सचिन डाखोडे यांची विशेष उपस्थिती लाभली. महिला आघाडीच्या वतीने आयोजित हळदी-कुंकू समारंभात सुमारे ४०० भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. 'या कार्यक्रमात केवळ समाजकारण दिसले,' अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.



सूत्रसंचालन सौ. जयश्री सुरोशे व आशाताई कात्रे यांनी केले. मान्यवरांचे स्वागत शंकर जोगी यांनी केले, तर आभारप्रदर्शन सौ. कांचन वसतकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सचिन बंडगर, कैलास बचे व दीपक नागे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## केवायसीतील त्रुटी दूर करणार अंगणवाडी सेविका

**मालेगाव :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मालेगाव तालुक्यातील अनेक पात्र महिलांचे केवायसीतील त्रुटींमुळे हप्ते अडकले होते. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचे अनुदान न मिळाल्याने तालुक्यातील लाभार्थी महिलांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत होती. वारंवार शासकीय कार्यालयांचे फेरे मारूनही समस्या सुटत नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.

या गंभीर समस्येची दखल घेत शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आता केवायसीतील त्रुटी दुरुस्त करण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर सोपवण्यात आली आहे. मालेगाव तालुक्यातील अंगणवाडी सेविका लाभार्थी महिलांशी थेट संपर्क साधून घरोघरी जाऊन किंवा फोनद्वारे आवश्यक माहिती संकलित करणार आहेत.

# वाशीम मध्ये स्वयंम शिक्षण प्रयोग वतीने सखी प्रेरणा दिवस साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक एम्पायर हॉटेल येथे दि.१ फेब्रुवारी २६ रोजी स्वयंम शिक्षण प्रयोग वतीने संस्थेच्या संस्थापक प्रेमाताई गोपालंम यांचे जन्मदिवसाचे निमित्ताने सखी प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

प्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा कृषी अधिकारी अभिजित देवगिर, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, महीला बालविकास अधिकारी गजानन पडघन, जिल्हा उद्योग अधिकारी उमेश पायघन, मालेगाव ता.कृषी अधिकारी कैलास देवकर, साहीत्यीक मोहन सिरसाठ, कृषी सहायक महादेव सोळंके, समाजसेवक सुभाष नानवटे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, यशदा चे महाराष्ट्र प्रविण प्रशिक्षक प्रविण पट्टेबहादूर, पत्रकार निलेश सोमाणी, मोहन कांबळे, आत्माचे प्रथमेश उगले, यांची उपस्थिती होती.

सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांनी प्रेमाताई गोपालंम यांचे प्रतीमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर प्रमुख मार्गदर्शक म्हणून असलेले जिल्हा कृषी अधिकारी अभिजित देवगिर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेची माहिती देवून लाभ घेण्याचे आवाहन केले.तर महीला बालविकास अधिकारी गजानन पडघन यांनी आपल्या भाषणात मार्गदर्शन करताना सांगितले की, महीलांनी सेंद्रिय शेती प्रक्रियेत सहभागी होवून शेती केली पाहिजे.कारण शेतीचा शोधच महीलांनी लावला आहे.

# प्रगटदिन महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा आयोजन

■ प्रतिनिधी | मानोरा ■

येथून जवळच असलेल्या राहुल पार्क, सोमठाणा येथे श्री गजानन महाराज मंदिर संस्थांच्या वतीने श्रींच्या प्रगट दिन महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताह दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे .

श्री गजानन महाराज मंदिर राहुल पार्क सोमठाणा या ठिकाणी प्रगट दिन महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन दिनांक एक फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान सायंकाळी सहा ते नऊ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. ह भ प नरेश महाराज आळंदीकर यांच्या अमृतमय वाणीतून भागवत कथेचे वाचन होणार असून त्याला वादक रामरास महाराज ठाकरे, सावके महाराज, तबला परशराम महाराज ठाकरे, ऑर्गन उत्तम महाराज ठाकरे, मृदंग गजानन महाराज जमाले. यांची साथसंगत मिळणार आहे.



# दीर्घ सेवेला गौरवपूर्ण निरोप

## जि. प. उर्दू शाळेतील शिक्षिका तनवीर फिरदौस यांचा भावनिक सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा परिषद उर्दू वरिष्ठ प्राथमिक शाळा, खदान येथे कार्यरत असलेल्या शिक्षिका तनवीर फिरदौस अब्दुल अन्सार यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त शाळा परिसरात गौरवपूर्ण सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. दीर्घ सेवाकाळात शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

तनवीर फिरदौस बाजी यांनी १ जानेवारी १९९४ रोजी शिक्षकी सेवेला सुरुवात केली होती. २९ मे २०१८ पासून त्या याच शाळेत कार्यरत होत्या. जवळपास तीन दशकांच्या सेवेत त्यांनी निष्ठा, प्रामाणिकपणा व समर्पण भावनेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह नैतिक जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली. या सत्कार समारंभास माजी उपमहापौर व नगरसेवक रफीक सिद्दीकी, जावेद झकरिया तसेच सैयद वसीम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते तनवीर फिरदौस यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी त्यांच्या सेवाभावाचे मनःपूर्वक कौतुक करत पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य व सुखद भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास शाळेतील शिक्षकवृंद अब्दुल रशीद, फैसल अन्सारी, सलीम अहमद, तनवीर शहजाद खान, सोहेल हसन खान, मुदस्सिरुल्लाह खान, नझीमुद्दीन खातिब, गुलाम रसूल, सैयद इफ्तेखार अली, जावेदुर रहमान, मोहम्मद जुबैर, मोहम्मद नासिर व अजमत उल्लाह खान यांचा प्रामुख्याने समावेश होता.



# दासनवमी उत्सवास प्रारंभ; धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री समर्थ सेवा मंडळ वाशीम च्या वतीने २ ते १० फेब्रुवारी दरम्यान श्री करुणेश्वर मंदिर, गणेश पेठ वाशीम येथे दासमवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमीत्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार असून, या कार्यक्रमाचा शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता व सयंकाळी ७ ते ८ वाजता दरम्यान ग्रंथराज श्री दासबोध ग्रंथाचे सामुहिक पारायण उपासना, ४,५,६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजता दरम्यान उपासना, ७ फेब्रुवारी रोजी रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजता दरम्यान भक्ती संगीत, संदिप देशमुख आणि संच, वाशीम, ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजता दरम्यान उपासना, ९ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजता दरम्यान श्री समर्थ रामदास स्वामी या विषयावर राष्ट्रीय किर्तनकार चारुदत्त आफळे गुरुजी, पुणे यांचे सुश्राव्य किर्तन, १० फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजता दरम्यान संताचा महिमा या विषयावर पंकज महाराज देव यांचे प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डांबरीकरणाला अडीच वर्षातच भगदाड!

## सुकळी–पिंपळखुटा रस्त्यावर खड्डूयांचे साम्राज्य; अपघातांचा धोका वाढला

■ प्रतिनिधी | खेट्री ■

प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत पातूर तालुक्यातील सुकळी ते पिंपळखुटा या महत्त्वाच्या दळणवळणाच्या रस्त्याचे डांबरीकरण अवघ्या अडीच वर्षांपूर्वी करण्यात आले होते. मात्र, आज या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून संपूर्ण रस्ता खड्डेमय झाला आहे. ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांसह नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, रुग्णवाहिका तसेच अवजड वाहनांची वर्दळ असते. मात्र निकृष्ट दर्जाच्या डांबरीकरणामुळे रस्ता जैसे थे झाला असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे.



अनेक ठिकाणी खड्डयांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत.

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. डांबरीकरणात निकृष्ट साहित्याचा वापर झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. अडीच वर्षांतच नव्या रस्त्याची चाळणी होणे ही गंभीर बाब असून, याकडे प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### ६ कोटी २४ लाखांचा खर्च पाण्यात!

सुकळी–पिंपळखुटा रस्त्याच्या डांबरीकरणावर सुमारे ६ कोटी २४ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला. मात्र निकृष्ट कामामुळे अडीच वर्षांतच रस्त्याची चाळणी झाली असून सार्वजनिक निधी वाया गेल्याचे चित्र आहे. पाच वर्षांची दुरुस्ती हमी असतानाही दुरुस्ती न होणे आश्चर्यकारक आहे.

### विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेनुसार पाच वर्षांत खड्डे पडल्यास दुरुस्तीची जबाबदारी संबंधित विभागाची आहे. तरीही दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# ४५० फुटांवर पाण्याचा प्रचंड झरा!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जिल्हा परिषद ऊर्दु वरिष्ठ प्राथमिक शाळा, मालेगाव येथे विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न कायमचा सुटत गणेश अहिर (नगरसेवक) यांनी स्वतःच्या खर्चातून दिलेल्या बोअरवेलला अवघ्या ४५० फुटांवर भरपूर व मुबलक पाणी लागले. त्यामुळे शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांना आता वर्षानुवर्षे स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध होणार आहे.

दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी बोअरवेल शाळेच्या सेवेत दाखल करण्यात आला. बोअरवेल खोदकाम सुरू असताना शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शेख अबरार यांच्या हस्ते गणेश अहिर तसेच मो. जफर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पाणी लागल्यानंतर आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ६९ ■ मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# सावळ्या गोंधळावर अखेर कुऱ्हाड

## सीमा पाटील 'प्रायमरी ईओ'; भोसलेंवर कारवाई कधी?

**वर्धा जनमाध्यम-** शिक्षण विभागातील सावळा गोंधळ, बेशिस्त कारभार आणि नियमांची खुलेआम पायमल्ली अखेर उघड्यावर आली आहे. 'जनमाध्यम'ने सातत्याने उघड केलेल्या वृत्तमालिकेमुळे वर्धा जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पदावर अखेर बदलाचा आदेश काढण्यात आला आहे. सीमा विठ्ठल पाटील यांची नव्या 'प्रायमरी ईओ' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. 'जनमाध्यम'च्या भाषेत सांगायचे तर उशिरा का होईना, पण सत्याचा ठोसा बसलाच, शिक्षण विभागात सुरू असलेल्या सावळ्या गोंधळावर पडदा उचलणाऱ्या 'जनमाध्यम'च्या बातम्यांमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांची झोप उडाली. 'अर्जित रजेच्या नावाखाली मुख्यालयातून पलायन', 'प्रतिनियुक्तीसाठी नियमांना केराची टोपली', 'जि.प.मार्फत शिफारसच नाही,अशा गंभीर बाबी समोर आल्यावर मंत्रालयाला अखेर हस्तक्षेप करावा लागला.

सोमवार, २ फेब्रुवारी रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे उपसचिव मो. बा. ताशिलदार यांनी आदेश निर्गमित करत सीमा विठ्ठल पाटील यांना महाराष्ट्र शिक्षण सेवा गट 'अ'मध्ये पदोन्नती देत वर्धा येथील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) म्हणून नियुक्ती केली. आतापर्यंत उपशिक्षणाधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या पाटील आता प्राथमिक शिक्षणाचा कारभार हाती घेणार आहेत.

मात्र प्रश्न इथेच थांबत नाही. नवा ईओ आला, पण जुन्या गोंधळाचे काय फेब्रुवारी २०२४ मध्ये रुजू झालेल्या माधवी भोसले यांनी नियमांना धाब्यावर बसवत केलेल्या कारभारावर अद्याप कारवाई का नाही, हा प्रश्न उपस्थित होत आहे. तत्कालीन सीईओंनी कारणे दाखवा नोटीस देऊनही, उत्तर असमाधानकारक ठरवूनही, वरिष्ठांकडे अहवाल पाठवूनही भोसलेंवर शिस्तभंगाची कारवाई झाली नाही, हे कुणाच्या पाठीशी असलेले अभेद्य कवच

शिक्षण विभागातील हा प्रकार केवळ एका अधिकाऱ्यापुरता मर्यादित नाही, हा संपूर्ण व्यवस्थेचा बेशिस्त चेहरा आहे. नियम सर्वांसाठी की फक्त कागदापुरते असा प्रश्न आता जनतेतून विचारला जात आहे. सीमा पाटील यांची नियुक्ती म्हणजे पहिला पाऊल, पण दोषींवर ठोस कारवाई झाली नाही, तर हा बदलही कागदी ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

# लाडकी बहीणच्या नावाखाली बालकांचा घास हिरावला

## वर्ध्यात एकल-विधवा-परित्यक्तांच्या मुलांचा निधी दोन वर्षांपासून अडकला



**वर्धा । जनमाध्यम-** राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण योजना'ची ढाल पुढे करून प्रशासनाने गरिबांच्या लेकरांवरच अन्यायाचा कुऱ्हाड घातल्याचे संतापजनक वास्तव वर्धा जिल्ह्यात उघडकीस आले आहे.

एकल महिला, विधवा व परित्यक्ता महिलांच्या मुलांना मिळणारा बाल संगोपन योजनेचा निधी तब्बल दोन वर्षांपासून रोखून धरण्यात आला असून महिला-बालकल्याण यंत्रणा मुकदर्शक बनून बसली आहे.

२०२४ पासून 'लाडकी बहीण योजना' सुरू होताच या महिलांच्या मुलांचा संगोपन निधी अचानक बंद करण्यात आला. विशेष म्हणजे २०२४-२५ या कालावधीतील सर्व कागदपत्रे वेळेत नूतनीकरण करूनही आजतागायत एकही हप्ता खात्यावर जमा झालेला नाही. शिक्षण, पोषण, औषधोपचारासाठी हात पसरण्याची वेळ या महिलांवर आली आहे. ही योजना आमच्यासाठी नव्हे, तर आमच्या लेकरांच्या पोटासाठी आहे. मग दोन वर्षे आमच्या मुलांना उपाशी का ठेवले? असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला आहे. प्रशासकीय ढिसाळपणा आणि निर्णयहीनतेमुळे गरिबांच्या घरातील चूल थंड पडण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, वर्धा सोशल फोरमच्या माध्यमातून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. मात्र निवेदनांपुरतेच प्रश्न मार्गी लागणार असतील, तर गरिबांच्या लेकरांचे भवितव्य अंधारातच राहणार काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

तत्काळ प्रलंबित निधी अदा न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत या महिलांनी प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात रस्त्यावर उतरण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. गरीबांच्या लेकरांवर अन्याय करणाऱ्या यंत्रणेला कधी जाग येणार? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

# वीजचोरांना महावितरणचा तडाखेबंद शॉक

## ९ महिन्यांत वर्धा जिल्ह्यात ६१२ ठिकाणी वीजचोरी उघड; ७७ लाखांची चोरी, ९३.८५ लाखांची देयके ठोठावली

**वर्धा । जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात वीजचोरीविरोधात महावितरणने आक्रमक भूमिका घेत थेट कारवाईचा झंझावात उडवला आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या नऊ महिन्यांत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तब्बल ६१२ ठिकाणी थेट वीजचोरी उघडकीस आली. या कारवाईत ७७ लाख ३७ हजार रुपयांच्या ३ लाख ९० हजार ५२० युनिट्स वीजेची चोरी झाल्याचे स्पष्ट झाले असून, नियमानुसार देयके व दंड मिळून ९३.८५ लाख रुपयांची रक्कम संबंधित वीजचोरांकडून आकारण्यात आली आहे. या धडक कारवाईने वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

महावितरणच्या तांत्रिक पथकांनी या कालावधीत १,०४८ ग्राहकांच्या वीजयंत्रणांची तपासणी केली. त्यापैकी २९० जणांनी मुख्य वीजवाहिन्यांवर थेट 'आकडा' टाकून वीजचोरी केल्याचे उघड झाले. तर ३२२ ग्राहकांनी मीटरमध्ये तांत्रिक छेडछाड करत अत्यंत क्लुप्त्या वापरल्याचे आढळले. मीटर दुरून बंद करणे, मागील बाजूस सूक्ष्म छिद्रे पाडून



रोध निर्माण करणे, अंतर्गत सर्किटमध्ये फेरफार करून मीटर संथ करणे किंवा पूर्णपणे बंद पाडणे असे धक्कादायक प्रकार कारवाईदरम्यान समोर आले.

याशिवाय वीज ज्या कारणासाठी घेतली होती त्या व्यतिरिक्त इतर कारणासाठी अनधिकृत वापर करणाऱ्या १६ ग्राहकांवरही कारवाई करत २.२० लाख रुपयांची देयके ठोठावण्यात आली. महावितरणने स्पष्ट केले की वीजचोरीमुळे रोहित्रांवर अतिरिक्त भार पडून शॉर्टसर्किट, ट्रान्सफॉर्मर जळणे व वारंवार वीजखंडित होण्याचे प्रकार घडतात. याचा थेट फटका प्रामाणिक ग्राहकांना बसतो.

वीजचोरी रोखण्यासाठी ही मोहीम वरिष्ठ स्तरावरून थेट संनियंत्रणाखाली सुरू असून, पुढील काळात तपासणी आणखी तीव्र केली जाणार असल्याचा इशारा महावितरणने दिला आहे.

# तक्रारीआड कारस्थानः प्रॉपर्टी कार्ड नसताना भूमी अभिलेख बदलाचा प्रयत्न

## मनमोहन जैस्वाल यांचा नझुल सर्व्हेअरवर आरोप; मात्र वस्तुस्थिती वेगळीच?

## प्रशासनाची दिशाभूल करण्याचा डाव असल्याची चर्चा

**वर्धा । जनमाध्यम-** वर्ध्यातील नझुल जमिनीच्या प्रकरणात प्रशासनावर आरोपांची राळ उडवणारे मनमोहन जयनारायणजी जैस्वाल यांचे दावे आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. स्वतःच्या नावावर अद्याप वैध प्रॉपर्टी कार्ड नसताना भूमी अभिलेखात बदल घडवून आणण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केला जात असल्याची गंभीर चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू झाली आहे.नझुल सर्व्हेअर पंकज बी. गाडगे यांनी अहवाल सादर केला नाही, असा आरोप करत जैस्वाल यांनी थेट पालकमंत्र्यांकडे तक्रार दाखल केली असली, तरी मुळात अर्जच अपूर्ण व कागदपत्रे त्रुटीपूर्ण असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे अहवाल रखडण्याचे खरे कारण लपवून प्रशासनावर खापर फोडण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप पुढे येत आहे.प्रॉपर्टी कार्ड वडिलांचे नावे असून त्यावर इतर सदस्यांचे नाव आहे, तरी बदलाचा हट्ट

संबंधित मालमत्तेबाबत अर्जदाराच्या नावावर अधिकृत प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. अशा परिस्थितीत नझुल लीजचे नुतनीकरण किंवा फ्रीहोल्ड प्रक्रिया पुढे नेणे हे नियमबाह्य ठरते.

**प्रशासनावर दबाव आणण्याचा डाव?-** तक्रार, मात्र नियमांची पूर्तता न करता केवळ दबाव निर्माण करून भूमी अभिलेखात बदल करून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

भूमी अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास किंवा मालकी हक्काबाबत स्पष्टता नसल्यास अहवाल तात्काळ देणे शक्य नसते. मात्र या वस्तुस्थितीकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून जैस्वाल यांनी नझुल सर्व्हेअरवर हेतुपुरस्सर आरोप केल्याचे बोलले जात आहे.

कायद्याचा बडगा आणि ऊध चा इशारा या सगळ्यांचा वापर करून प्रशासनाला दबावात आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप आहे. नियमांच्या चौकटीत चालणाऱ्या प्रक्रियेला दिरंगाईचे लेबल लावून स्वतःच्या फायद्यासाठी अधिकाऱ्यांना बदनाम करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही काही अधिकारी खासगीत बोलत आहेत.

**उलट चौकशीची शक्यता**

या प्रकरणात एकतर्फी आरोपांऐवजी जैस्वाल यांच्या अर्जाची, कागदपत्रांची व उद्देशाचीही चौकशी व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# वीज बंद, पाणी ठप्प

## महावितरणच्या 'परमिट'चा फटका; वर्ध्याच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम

वर्धा जनमाध्यम : येळाकेळी येथील धाम नदीतून पाण्याची उचल करून वर्धा शहराला पिण्यायोग्य पाणीपुरवठा केला जातो. मात्र महावितरणकडून ३ व ६ फेब्रुवारी रोजी ११ केव्ही एक्सप्रेस उच्चदाब विद्युत वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. या कामासाठी महावितरणने परमिट दिल्याने संबंधित भागातील वीजपुरवठा सकाळी १० ते सायंकाळी ५ या कालावधीत बंद राहणार आहे.

वर्धा नगरपालिका प्रशासन येळाकेळी व पवनार येथील धाम नदीच्या पात्रातून पाणी उचलून त्यावर प्रक्रिया करते. त्यानंतर शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येतो. या



यंत्रणेद्वारे सुमारे १६ हजार कुटुंबांना पिण्याचे पाणी पुरवले जाते. मात्र ३ फेब्रुवारी रोजी येळाकेळी पंपिंग स्टेशन परिसरातील वीजपुरवठा तब्बल सात तास बंद राहणार असल्याने शहरातील निम्म्या भागात त्या दिवशी पाणीपुरवठा होणार नसल्याचे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

यामुळे ३ फेब्रुवारी रोजी गौरक्षण, भागटीपुरा, कृष्णनगर, दयालनगर, जाकीर हुसेन कॉलनी, स्टेशनफैल आदी प्रमुख परिसरातील नागरिकांना पाण्याविना राहावे लागणार आहे. या भागांचा ३ तारखेचा पाणीपुरवठा ४ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

महावितरणच्या दुरुस्ती कामामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होणार असल्या, तरी नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेवर परिणाम होऊ नये, यासाठी महावितरण व नगरपालिका प्रशासन यांच्यात समन्वय असणे आवश्यक असल्याचेही नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

# आकृतीबंध रखडला; महिला व बाल विकासच्या राजपत्रित अधिकाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**वर्धा जनमाध्यम** - महाराष्ट्र राज्य महिला व बाल विकास विभागाच्या राजपत्रित अधिकारी संघटनेने सादर केलेला आणि वित्त व नियोजन विभागाकडून शिफारस करण्यात आलेला सर्वसमावेशक आकृतीबंध तातडीने मंजूर करावा, या प्रमुख मागणीसह विविध एकूण दहा मागण्यांसाठी महिला व बाल विकास विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या पार्श्वभूमीवर २ फेब्रुवारी रोजी अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांना निवेदन सादर केले.

महिला व बाल विकास विभागात कार्यरत अधिकारी, कर्मचारी तसेच मानधन तत्त्वावरील कर्मचाऱ्यांचे सेवा व आस्थापना विषयक प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. विभागाच्या कामाचा व्याप वाढत असताना मनुष्यबळ, वेतन संरचना व पदोन्नतीबाबत निर्णय होत नसल्याने असंतोष वाढत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

निवेदनात वित्त व नियोजन विभागाने शिफारस केलेला सर्वसमावेशक आकृतीबंध तात्काळ लागू करावा, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला व बाल विकास विभागाची स्वतंत्र पदे निर्माण करावीत, जिल्हा परिविक्षा अधिकारी हे पद राजपत्रित अधिकारी गट 'ब' म्हणून घोषित करावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच पर्यवेक्षिका व मुख्य सेविका या संवर्गाचे एकत्रीकरण करून वेतनातील तफावत दूर करणे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचारी दर्जा देणे, ग्रॅज्युइटी व निवृत्तीवेतनासह सेवा अटी सुधाराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय विभागातील विविध योजनांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणा करणे, पदोन्नतीची प्रकरणे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे, चिल्ड्रन्स एड सोसायटीमधील शिक्षक व कर्मचारी यांना १२ व २४ वर्षांची वेतनश्रेणी मंजूर करणे, तसेच धोरणनिर्मितीत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढविण्याची मागणी निवेदनात नमूद करण्यात आली आहे.

या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. महिला व बाल विकास विभागातील असंतोष प्रशासनासाठी आव्हान ठरत असल्याचे चित्र आहे.

# विद्यार्थ्यांसाठी वाचनालये, पण स्वच्छतेचा विसरः नगरप्रशासनावर प्रश्न

## नगरसेवक डॉ. सुनील चावरे यांनी नगर प्रशासनाचे लक्ष वेधले

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा नगरपरिषद अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शहरी दलित वस्ती सुधार योजनेतून शहरातील विविध दलित वस्ती क्षेत्रांमध्ये वातानुकूलित वाचनालये सुरू करण्यात आली आहेत. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी या वाचनालयांचा दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी येतात. मात्र या वाचनालयांमध्ये शौचालय सुविधेचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

दररोज ८ ते १२ तास सलग अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना शौचालयासाठी आजूबाजूच्या घरांमध्ये विनंती करावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. ही बाब विद्यार्थ्यांच्या आरोग्य, स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर मानली जात आहे. विशेषत: विद्यार्थिनींसाठी ही स्थिती अधिक अडचणीची ठरत असून अभ्यासावरही त्याचा परिणाम होत आहे.

या मुद्द्यावर वर्धा नगरपरिषदेचे नगरसेवक डॉ. सुनील चरणसिंग चावरे यांनी नगर प्रशासनाचे लक्ष वेधले असून मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे. वातानुकूलित सुविधा देताना शौचालयासारखी मूलभूत सोय न करणे ही



प्रशासनाची त्रुटी असून, विद्यार्थ्यांच्या सन्मानाशी तडजोड होणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

शहरातील सर्व दलित वस्ती क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या वातानुकूलित वाचनालयांमध्ये पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र शौचालयांची तातडीने उभारणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या जनहिताच्या विषयावर नगर प्रशासनाने लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# जाम महामार्ग पोलिसांची सिनेस्टाईल कामगिरी

## कारसह ६० हजारांची रोकड पळविणारा जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून कारसह ६० हजार रुपयांची रोकड पळवून नेणाऱ्या आरोपीला जाम महामार्ग पोलिसांनी थरारक पाठलागानंतर आजंती शिवारात पकडले. २ फेब्रुवारी रोजी झालेल्या या कारवाईमुळे महामार्गावरील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.वरोरा तालुक्यातील खांबाडा शिवारातून एम.एच. ४६ झेड ९४१६ क्रमांकाची कार व त्यामधील ६० हजार रुपयांची रोकड चोरीस गेल्याची तक्रार प्रभाकर येरणे यांनी वरोरा पोलिस ठाण्यात दाखल केली होती. या घटनेची माहिती मिळताच जाम महामार्ग पोलिसांनी नाकाबंदी करत संशयित वाहनांचा शोध सुरू केला.२ फेब्रुवारी रोजी गस्तीवर असताना महामार्ग पोलिसांच्या पथकाला संशयित कार हैदराबादच्या दिशेने जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तात्काळ पाठलाग सुरू केला. काही अंतरापर्यंत कार आणि पोलिस वाहनांमध्ये ससेमिरा सुरू होता. अखेर आजंती शिवारात पोलिसांनी कार अडवून चालकास ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपीने आपले नाव प्रमोद अजाब मडावी (रा. पाटनबोरी, ता. केळापूर, जि. यवतमाळ) असे सांगितले. वाहन तपासणीदरम्यान कारवर दोन नंबर प्लेट आढळून आल्या. पुढील तपासात हीच कार खांबाडा येथून चोरीस गेलेली असल्याचे निष्पन्न झाले. कारमधील ६० हजार रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली.

आरोपीसह कार व रोकड पुढील कारवाईसाठी वरोरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे. जाम महामार्ग पोलिस केंद्राचे प्रमुख दिलीप थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रमोद धोटे, विकास काकडे, रंजीत फाले, चंद्रकांत जिवतोडे, सतीश नैताम, भूषण टोंग व आरती मसादे यांनी ही कारवाई केली.

महामार्गावरील गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची सतर्कता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.


## जाहीरनामा

अर्जदार **जगदीश अचलदास टावरी**, रा.भामटीपुरा, वर्धा यांनी अर्जामध्ये **जगदीश अचलदास टावरी** यांचा जन्म **जगदीश अचलदास टावरी** यांचा जन्म राहते घरी झालेला नामे **जगदीश अचलदास टावरी** या नावाने जन्माची नोंद वर्धा येथे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद घेण्याकरीता जन्म नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नुसार जन्म-मृत्यू नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

अर्जदार यांच्या जन्म/मृत्यू दिनांक ०२.०२.१९६८ रोजी मौजा वर्धा येथे झाला आहे असे अर्जदाराने अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी तालुका दंडाधिकारी, वर्धा उपरोक्त वाचा क.१ व २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तिचा जन्माबाबत/मृत्यूबाबत नोंद घेणेकामी आदेश देणेकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह तालुका दंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिध्दीपासून १५ दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

विहीत मुदतीत आक्षेप/हरकतीचा पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन प्रस्तावित जन्म मृत्यू नोदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात विचार केल्या जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**तहसीलदार, वर्धा**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार :- राजू नारायणराव डगावर हे मौजा - गिरोली तह. - धामणगाव आणि जिल्हा अमरावती भूमापन क्रमांक :- १८८ ,घर क्रमांक ७६ क्षेत्रफळ १७८.२२ स्क्वे.मीटर आखीव पत्रिकेप्रमाणे आणि नमुना ८ प्रमाणे १२६.७७ चौरस मीटर चे मालक आहेत .

**सदर प्लॉटची चतुःसीमा -**
**पूर्वेस :- ग्राम पंचायत रोड ,**
**पश्चिमेस :- भास्कर सुधाकर डगावर ह्यांचे घर,**
**उत्तरेस :- पांडुरंग डगावर ह्यांचे घर ,**
**दक्षिणेसः- ग्राम पंचायत रोड.**

सदर मालमत्ता हि राजू नारायणराव डगावर हे सादर मालमत्तेचे वारस हक्काने मालक आहे सदरचा उल्लेख आखीव पत्रिकेत नमूद आहे. माझे पक्षकार हे सदर मालमत्ता आपल्या पत्नीस नामे वनिता राजू डगवार हिला बक्षीस पत्राद्वारे हस्तांतरित करत आहे. माझ्या पक्षकाराने सदर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता Jana Small Finance Bank Limited येथे कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सदर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व जर कोणालाही सादर विक्रीपत्र मिळाल्यास ते त्यांनी सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**संपर्कः- ॲड आर.आर.तिवारी**
रामनगर, वर्धा.मो.९९२२४२६१६८

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर F2727549 वरील माझे JAGDISH TAORI असे नाव होते. माझ्या आधार आणि पॅन कार्ड वर JAGDISH ACHALDAS TAORI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात असे.
पत्ता - एस बी रोड, भामटीपुरा, वर्धा - ४४२००१

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर F2727549 वरील माझे पत्नीचे TAORI SHEETAL असे नाव होते. माझ्या आधार आणि पॅन कार्ड वर SHEETAL JAGDISH TAORI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात असे.
पत्ता - एस बी रोड, भामटीपुरा, वर्धा - ४४२००१

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर F2727549 वरील माझे आईचे TAORI GODHAWARIDEVI असे नाव होते. माझ्या आधार आणि पॅन कार्ड वर GODAVARI ACHALDAS TAORI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात असे.
पत्ता - एस बी रोड, भामटीपुरा, वर्धा - ४४२००१

# अजित पवारांचा मृत्यू संशयास्पद, उच्चस्तरीय चौकशी करा!

## भाजपच्या घोटाळयाच्या फाइलचा उल्लेख करत खा.राऊतांची राज्यसभेत मागणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबद्दल राष्ट्रवादीतल्याच काही लोकांनी शंकेचा सूर लावलेला असताना, शिवसेना(ठाकरे) खासदार संजय राउत यांनीही आज पत्रकार परिषदेत व राज्यसभेत अजित दादांच्या अपघाती निधनाबद्दल शंका व्यक्त करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. भाजपच्या घोटाळ्याची फाईल आपल्याकडे असून ती आपण उघड करणार असल्याचे वक्तव्य अजित पवार यांनी १५ जानेवारीला केले आणि त्यानंतर पुढील दहा दिवसांत त्यांचा विमान अपघात मृत्यू झाला, याकडे लक्ष वेधताना राउत यांनी घातपाताची शंका उपस्थित केली आहे.

**अजितदादांना पुन्हा शरद पवारांसोबत जायचे होते असा दावाही त्यांनी केला.**

रूपाली पाटील, अमोल मिटकरी यांच्यानंतर खासदार संजय राउत यांनीही अजित पवारांच्या अपघाती निधनाबाबत शंका व्यक्त केली आहे. राज्यसभेत व नवी दिल्ली येथे आपल्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधताना संजय राउत म्हणाले अजित पवार यांच्या पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी विमान अपघाताबाबत उपस्थित केलेले प्रश्न गंभीर स्वरुपाचे प्रश्न आहेत. अजित पवार यांच्यासारखा नेता विमानात बसताना त्यांच्यासोबत कुणीही प्रमुख व्यक्ती नाही, ओएसडी नाही. विमानाच्या मेंटेनन्सचे सर्टिफिकेट नाही. त्याच्यामुळे लोकांच्या मनात शंका येणे स्वाभाविक आहे. माझ्या मनातही पहिल्याच दिवशी शंका आली. ज्या दिवशी अजित पवारांनी सांगितले की, भाजपच्या घोटाळ्याची फाईल माझ्याकडे आहे आणि योग्यवेळी उघड करेन तेव्हाच मला चिंता वाटली होती. १९९५ च्या काळात सिंचन प्रकल्पाचे बजेट वाढवून भाजपने काही कोटी पक्ष निधीकडे कसे वळवले हे जेव्हा अजित पवार सांगत होते तेव्हा मी त्यांची ब?डी लँग्वेज बघत होतो. १५ जानेवारीला त्यांनी हे सांगितले आणि पुढच्या १० दिवसात त्यांच्या विमानाचा अपघात होउन, त्यांचा मृत्यू झाला. हा अपघात एक रहस्यमय आहे असे सांगतानाच या प्रकरणानंतर मला जस्टिस लोया यांची आठवण होत आहे. मी कुणावर आरोप करत नाही, पण या लोकांच्या मनातल्या शंका आहे असेही राउत म्हणाले.



**राष्ट्रवादी आता पवार-पाटलांचा पक्ष राहिला नाही-**दरम्यान, अजितदादांचा पक्ष हा आता पवार-पाटलांचा पक्ष राहिलेला नाही. तो गोयल, पटेल, पारेख, शहा, मोदी यांचा पक्ष होण्याची शक्यता आहे. अशा त--हेने महाराष्ट्रातील एक प्रादेशिक अस्मिता जपणारा पक्ष भाजपने गिळून टाकला. याबद्दल जर त्या पक्षातील मराठी आमदारांना, खासदारांना आनंद होत असेल तर त्यांनी स्वतःला मराठी समजू नये, असा टोलाही राउत यांनी लगावला.

अजित पवार स्वगृही परतणार होते

अजितदादांना पुन्हा शरद पवारांसोबत जायचे होते. त्यांनी भाजपमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. त्यांचे स्वगृही जाणे हा भाजपचा पराभव असून देशातील राजकारणाला कलाटणी देणारा तो निर्णय ठरला असता आणि भाजपची दहशत मोडून गेली असती, अशी टिका राउत यांनी केली. तसेच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेवर भाजपला सांगितल्याशिवाय अजितदादा अशी चर्चा करतील का, या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रश्नावर राउत म्हणाले, अजित पवार स्वतः त्या पक्षाचे नेते आणि प्रमुख होते. ते त्यांच्या मर्जीने भाजप बरोबर गेले. भाजप आपल्या महाराष्ट्राच्या विचारांचा पक्ष नाही हे लक्षात आल्यावर जर त्यांना आपल्या स्वगृही परत जायचे असेल, तर त्यासाठी फडणवीस यांच्याशी चर्चा करायची गरज काय? असा सवालही राउत यांनी उपस्थित केला.

**राउतांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयात जावे : बन**

खा. संजय राउत यांनी खुशाल ती कागदपत्रे घेउन आंतरराष्ट्रीय न्यायालय, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापर्यंत जावे आणि भाजपची चौकशी करावी असा खोचक सल्ला भाजपाचे माध्यमविभाग प्रमुख नवनाथ बन यांनी दिला आहे. जस्टिस लोया प्रकरणात कायमच संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही बन म्हणाले. अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा संशय निर्माण करणारा आहे. या अपघातामुळे मला जस्टिस लोया यांच्या मृत्यूची आठवण झाली असे वक्तव्य खा.संजय राउत यांनी केले आहे. त्याला नवनाथ बन यांनी प्रत्युत्तर दिले आहे. संजय राउत यांना जर ती कागदपत्रे सापडली तर त्यांनी ती घेउन आंतरराष्ट्रीय न्यायालय गाठावे, ट्रम्प यांच्याशी संपर्क साधावा आणि भाजपविरोधात काही पुरावा सापडला तर खुशाल कारवाई करावी असे नवनाथ बन म्हणाले. जस्टिस लोया मृत्यू प्रकरणात कधीच दूध का दूध पानी का पानी झाले आहे. पण या प्रकरणी कायम संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असतो. तसेच अजितदादांच्या अपघाताची चौकशी सुरू असून जर त्यात कोणी दोषी आढळले तर निश्चितच कारवाई होईल असेही बन म्हणाले.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी 7 फेब्रुवारीला मतदान

## उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कर्मचा-यांना भरपगारी सुट्टी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये शनिवार दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचा-यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.

यानुसार, निवडणूक होणा-या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणा-या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, उर्जा व कामगार विभागांतर्गत येणा-या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हाटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शापिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत. अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात



अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या - पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या - अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

# राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येउ नये म्हणून रचला कट; वडेट्टीवार यांचा गंभीर आरोप

**नागपूर/प्रतिनिधी-**आपल्या संस्कृतीनुसार दशक्रिया झाल्यावर घरातील सुरळीत कामकाज सुरू होते. पण राज्यातील राजकारण इतके सडके झाले आहे की कसलीही वाट न बघता शपथविधीचा कार्यक्रम करण्यात आला. यातूनच दोन्ही राष्ट्रवादीचे गट एकत्र येउ नये हा कट शिजला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात दोन्ही पक्ष विलीन होण्याबाबत चर्चा अंतिम टप्प्यात होती. आपल्या पक्षाबाबत त्यांनी भाजप किंवा मुख्यमंत्र्यांना सांगणे अपेक्षित होते का? त्यांच्या पक्षाचे निर्णय ते घेउ शकत नव्हते की त्यासाठी भाजपची परवानगी लागत होती? असा टोला वडेट्टीवार यांनी यावेळी लगावला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूपेक्षा दोन पक्षाच्या विलीनीकरण बाबत जास्त चर्चा झाली. यातून काही लोकांना आनंद झाला. आपल्या मोठ्या नेत्याचा मृत्यू झाल्यावर दोन चार दिवस ही नेते थांबू शकले नाही यातून राजकारणात नैतिकता आणि नीतिमत्ता राहिली नाही हे महाराष्ट्र बघत आहे, अशी टीकाही विजय वडेट्टीवार यांनी केली.अजित पवार यांच्या पक्षातील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल या नेत्यांना एनडीएसोबत राहण्याची अपरिहार्यता आहे. त्यांच्यावर विविध आरोप झाले आहेत. अशा वेळी शांत झोप लागावी यासाठी भाजपला



साथ देण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नाही यातूनच विधाने केली जात असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.अजित पवार यांच्या मृत्यूबाबत देखील विविध शंका उपस्थित केल्या जात असून, या प्रकरणी निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे याचा पुनरुच्चार वडेट्टीवार यांनी केला. विजय वडेट्टीवार म्हणाले की, उपमुख्यमंत्रिपद हे संवैधानिक पद नाही त्यामुळे हे सर्व काही तेराव्यानंतर सुद्धा होउ शकले असते. पण यामध्ये खूप काही शिजत आहे. अजित पवार यांची दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र याव्यात अशी इच्छा होती असे शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सांगितले, त्यांनी अजित पवार यांची शपथ सुद्धा घेतली. पण आता मला वाटते की राष्ट्रवादीचे पुढे काय होईल यावर आपण चर्चा न करता ते विधात्यावर सोडून द्यावे.

**गोयल यांनी अंदाज घेतला**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, शरद पवार यांच्या जवळचे लोकं विलीनीकरणाबद्दल ठासून सांगत आहेत. त्यावरुन आता यावर आम्ही बोलण्यापेक्षा दोन्ही पक्षातील लोकांना काय ते ठाउक आहेत. दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी एकत्र येउ नये हा कट कुठेतरी शिजला आणि त्यातून ही ठिणगी पडली असे मला वाटते. पियुष गोयल यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचे वक्तव्य केले आणि अंदाज घेउन पाहिला. निगेटिव्ह कमेंट आल्याने तो प्रस्ताव थांबवला. नाहीतर काय प्रफुल्ल पटेल होउन जातील असे सर्व नियोजन होते.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, अजित पवार यांच्या विमानाचा अपघाताबद्दल राज्यातील ८० टक्के लोक संशय व्यक्त करत आहेत. सोशल मिडीयावर आपण सर्व जण पाहतोय की लोके बोलत आहेत, हा अपघात नाही तर घातपात आहे. सहावी बाडी कुठे गेली? वेळेवर पायलट का बदलला गेला हा सुद्धा प्रश्न आहे. ज्या पायलटचे नाव पुढे आला होता तो जिवंत आहे. कारण तो वेळेवर पोहचू शकला नाही किंवा त्यांच्या ऐवजी कपूर नावाच्या दुस-या पायलेटला तिथे पाठवले. पण एक नक्की की दाल मे कुछ काला लगता है. याची चौकशी होणे गरजेचे आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचा कराड दौरा

## प्रीतिसंगमावर केले अभिवादन

**सातारा/ प्रतिनिधी-**महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शनिवारी शपथ घेतल्यानंतर तिस-याच दिवशी २ फेब्रुवारी रोजी (सोमवारी) सुनेत्रा पवार कराड दौ-यावर आल्या. दिवंगत अजितदादांसारखाच वक्तशीरपणा त्यांच्यात यावेळी पाहायला मिळाला. ज्येष्ठ नेते दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळी त्यांनी अभिवादन केले. परंतु, माध्यमांशी संवाद साधणे कटाक्षाने टाळले. त्यामुळे सुनेत्रा पवार यांचा पहिलाच दौरा निःशब्द ठरला. सोमवारी सकाळी साडे नउ वाजता त्या कराडमध्ये दाखल झाल्या. शासकीय विश्रामगृहात अर्धा तास थांबून बरोबर १० वाजता त्या प्रीतिसंगमावर पोहोचल्या. त्यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्यसभा खासदार नितीन पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी खासदार श्रीनिवास पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी मंत्री बाळासाहेब पाटील उपस्थित होते. ज्येष्ठ नेते दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळी अभिवादन केले.सुनेत्रा पवार कराड दौ-यावर येणार असल्याची बातमी वा-यासारखी पसरली होती. त्यामुळे त्यांना भेटण्यासाठी आबाला वृद्धांनी प्रीतीसंगम बागेत गर्दी केली होती. स्मृतिस्थळावरून परत जात असताना अनेक महिलांनी त्यांची भेट घेतली. महिलांना पाहून सुनेत्रा



पवार थांबल्या. सर्वांना त्या हात जोडून नमस्कार करत होत्या. त्यांच्या चेह-यावरील भाव अत्यंत गंभीर होते. प्रीतिसंगमावरून थेट त्या वेणूताई चव्हाण ट्रस्टकडे रवाना झाल्या.अजित दादांच्या पावलावर पाउल ठेवत सुनेत्रा पवार यशवंतराव चव्हाणयांच्या प्रीतीसंगमावर नतमस्तक झाल्या. दिवंगत अजित पवार नेहमीच प्रीतीसंगमाला भेट देत आले असून, त्यांच्या राजकीय जीवनात नेहमीच यशवंतराव चव्हानांच्या विचारधारांचं पालन करत आले आहेत.

**विदीप जाधवांच्या पत्नीचे केले सांत्वन-** उपमुख्यमंत्री अजित पवारांसह ५ जणांचा बारामती येथे २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातात मृत्यू झाला. यामध्ये साता-यातील तरडगावच्या विदीप जाधव यांनी देखील जीव गमावला होता. ते मुंबई पोलीस दलात कार्यरत होते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वैयत्तिक्र सुरक्षा अधिकारी म्हणून सेवा बजावत होते. दरम्यान, उपमुख्यमंत्री सूनेत्रा पवार यांनी विदीप जाधव यांच्या पत्नीची भेट घेतली. विदीप जाधव यांच्या पत्नी म्हणाल्या, शेवटपर्यंत माझ्याबरोबर राहणार असे त्यांनी सांगितले. माझे मिस्टर शेवटपर्यंत दादांबरोबर होते.त्यांनी कधीच दादांना अंतर दिले नाही आणि दादांनीही कधीच त्यांना अंतर दिले नाही. त्याचप्रमाणे वहिनीसोबत माझ्याबरोबर आयुष्यभर राहाणार आहेत. माझ्या मुलांकडे आणि माझ्या संपूर्ण कुटुंबाकडे त्याचे लक्ष राहिले. आता आमचे नाते घरच्यासारखे आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. माझे आणि त्यांचे दुःख सारखंच आहे, माझे सर्वस्व गेलंय, तसंच त्यांचंही गेलंय. तरीही त्या उभ्या आहेत, त्यांनी माझ्या डोक्यावरती हात ठेवलाय.

# मिरचीच्या नावाखाली राजस्थानात एमडी ड्रग्जची तस्करी

**जयपूर/वृत्तसंस्था :** जोधपूरहून हैदराबादला जाणा-या एका खासगी बसच्या पार्सलमध्ये एमडी ड्रग्ज आढळल्याने खळबळ उडाली आहे. मथानिया मिरचीच्या नावाखाली



ही तस्करी करण्यात येत होती. मिरचीला मधोमध फाडून त्यात चांदीच्या फ?इलमध्ये ड्रग्ज पुड्या भरल्या गेल्या होत्या. या प्रकरणाचा तपास नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) करत आहे. २८ जानेवारी रोजी जोधपूरहून हैदराबादकडे जाणा-या बसमध्ये एका व्यक्तीने मिरचीचे पार्सल पाठवले होते. बस हैदराबादला पोहोचल्यानंतर ड्रायव्हरला पार्सल संशयास्पद वाटले. त्याने मिरची कापून पाहिली असता आत फाइल पेपरमध्ये एमडी ड्रग्ज आणि स्नॅक्सचे छोटे तुकडे आढळले. ड्रायव्हरने याचा व्हिडिओही तयार केला.दरम्यान, एक व्यक्ती ते पार्सल घेण्यासाठी आला. ड्रायव्हरने त्याला मिरचीत ड्रग्ज असल्याचे सांगितले असता त्याने धमकावून, पार्सल आणण्यासाठी पैसे मिळाले आहेत असे सांगत ते घेउन पलायन केले. यानंतर ड्रायव्हरने हैदराबाद पोलिसांना याची माहिती दिली. या प्रकरणानंतर जोधपूर एनसीबीचे संचालक घनश्याम सोनी यांनी मिरचीमध्ये ड्रग्ज तस्करीचा व्हिडिओ जारी केला आहे. त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की अशा कोणत्याही संशयास्पद प्रकाराची माहिती तात्काळ एनसीबीच्या हेल्पलाइनवर किंवा इतर संबंधित एजन्सींना द्यावी. समाजाला व्यसनापासून वाचवण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# दुबईत अडकलेल्या भारतीय कामगारांच्या सुरक्षित परतीसाठी सरकारकडे विनंती

**रांची/वृत्तसंस्था :**झारखंडमधील विविध जिल्ह्यांतून दुबईला गेलेले १४ स्थलांतरित मजूर वेतन न मिळणे आणि अतिरिक्त काम करण्याचा दबाव यामुळे गंभीर अडचणीत सापडले आहेत. या मजुरांनी राज्य सरकारकडे सुरक्षित स्वदेश परतीची विनंती केली आहे. ही माहिती राज्य स्थलांतर नियंत्रण कक्षाच्या टीम लीडर शिखा लकड़ा यांनी दिली.अधिका-यांच्या माहितीनुसार, हे मजूर गिरिडीह, हजारीबाग आणि बोकारो जिल्ह्यांतील रहिवासी आहेत. मजुरांनी एक व्हिडीओ पाठवून आपली परिस्थिती मांडली असून, संबंधित खासगी कंपनीने तीन महिन्यांपासून वेतन दिले नसल्याचा आणि ओव्हरटाइम काम करण्यास जबरदस्ती केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यामुळे त्यांना राहण्याची आणि जेवणाचीही अडचण निर्माण झाली आहे. शिखा लकड़ा यांनी सांगितले की, अडकलेल्या मजुरांनी आपली व्यथा स्थलांतरित मजुरांच्या कल्याणासाठी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते सिकंदर अली यांना व्हिडीओच्या माध्यमातून पाठवली होती. या व्हिडीओत मजुरांनी सरकारकडे मदतीची आर्त मागणी केली आहे. राज्य स्थलांतर नियंत्रण कक्ष सध्या मजुरांशी संपर्क साधून त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करत आहे.अधिका-यांनी सांगितले की, पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भारतीय दूतावास आणि यूएई सरकारच्या अधिका-यांशी चर्चा सुरू करण्यात येईल, जेणेकरून मजुरांची सुरक्षित परतफेड सुनिश्चित करता येईल. या दिशेने आवश्यक पावले उचलण्याची तयारी राज्य सरकार करत आहे. सामाजिक कार्यकर्ते सिकंदर अली यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे ठोस कूटनीतिक पावले उचलण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, याआधीही परदेशात स्थलांतरित मजुरांच्या छळाच्या घटना समोर आल्या असून, मोठ्या प्रयत्नांनंतर त्यांना परत आणण्यात यश आले आहे. मात्र, उपजीविकेच्या मजबुरीमुळे मजूर पुन्हा पुन्हा परदेशात जाण्यास भाग पडत आहेत. दुबईत अडकलेल्या मजुरांमध्ये गिरिडीह (सरिया) येथील रोशन कुमार आणि अजय कुमार, गिरिडीह (बगोदर) येथील राजेश महतो आणि अजय कुमार, बोकारो (पेंक नारायणपूर) येथील दलेश्वर महतो, खेदाडीह येथील जागेश्वर महतो आणि फलेंद्र महतो, सिरैया येथील बैजनाथ महतो, दिलीप महतो, गंगाधर महतो आणि त्रिलोकी महतो, बसरिया येथील दीपक कुमार, गोरहर येथील रोहित महतो आणि सेवा महतो (सर्व हजारीबाग जिल्ह्यातील) यांचा समावेश आहे. माहितीनुसार, हे सर्व मजूर ऑक्टोबर २०२५ मध्ये एका खासगी कंपनीसाठी ट्रान्समिशन लाईन प्रकल्पावर काम करण्यासाठी दुबईला गेले होते. मजुरांचा आरोप आहे की, गेल्या तीन महिन्यांपासून त्यांना वेतन देण्यात आलेले नाही.

# एकाच दिवशी बुलडाणा जिल्ह्यात सात जण बेपत्ता

## पोलिसांकडून शोधमोहीम वेगात सुरु

**बुलडाणा /प्रतिनिधी-** एकीकडे मुंबईसारख्या झगमगत्या शहरातून १२ लहान मुले एकाच दिवशी अचानक बेपत्ता झाल्याची घटना ताजी असतानाच बुलढाणामधील मलकापूर शहरातून उच्चभ्रू परिवारातील तीन जण संशयास्पदरित्या बेपत्ता झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. बेपत्ता झालेल्यांमध्ये एकाच कुटुंबातील ३२ वर्षीय आई, ११ वर्षीय मुलगी आणि ८ वर्षीय मुलाचा समावेश आहे. याप्रकरणी पोलीस तक्रार करण्यात आली असून हे तिघे कुठे बेपत्ता झाले याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान या घटनेने खळबळ उडाली आहे.

मलकापूर शहरातील हनुमान नगर परिसरात एका उच्चभ्रू सोसायटीत पटेल कुटुंब राहतं. वसंत कुमार पटेल यांनी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार त्यांची पत्नी मित्तल पटेल, मुलगी सिया पटेल व मुलगा देवांश पटेल हे बाजारपेठेत गेले होते. मात्र बराच वेळ होउन देखील ते परत न आल्याने पटेल भयभीत झाले.त्यांनी तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलीस ठाण्यात रहस्यमय रित्या बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे.याप्रकरणी पोलिसांनी तातडीने शोध कार्य सुरु केले आहे. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून एकाच दिवसात पटेल परिवाराच्या सदस्यांसह एकूण सात जण बेपत्ता झाल्याच्या तक्रारी पोलिसांना विविध पोलीस स्थानकात प्राप्त झाल्या आहेत. अचानक बेपत्ता झाल्याच्या घटना समोर आल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये मोबाइलवरबंदी घाला

**अकोला / प्रतिनिधी-** बारावी आणि दहावीची परीक्षा तोंडावर आहे, मुले काहीच अभ्यास



करेना. त्यांचं लक्ष मोबाईलमध्ये आहे. परीक्षावेळी खिडकीतून चिठ्ठी घ्यायच्या आणि शिक्षकांना दम द्यायचा, आजच्या ४० टक्के मुलांची अशी परिस्थिती आहे. राज्यातील सर्व शाळांमध्ये नियमावली आणली पाहिजे. परीक्षा काळात मोबाईलवर बंदी घातली पाहिजे, अशी मागणी इंदुरीकर महाराजांनी केली.प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराजांनी तरुणांसह शेतक-यांच्या पोरांना एक तळमळीचे आवाहन केले आहे. पोरांनो मोर्चे आणि दंगलीच्या भानगडीत पडू नका, आजकाल लिहिणा-या पेनमध्ये कॅमेरा आहेत. टपरी पेटवातांना किंवा दंगलीत तुम्ही कुठे दिसले तर, १० वर्षांची शिक्षा आहे. कारण आतापर्यंत दंगलीमध्ये गरीबांचे पोर आत गेले, मोठ्यांचे गेले नाही, कधी जाउ देणारही नाहीत. ते तुमचा वापर फक्त युज अँड थ्रो म्हणून करणार, असे कीर्तनकार इंदूरकरांनी युवकांना ठणकावून सांगितलं. आज कोणतही काम करायला पोलीस व्हेरिफिकेशन दाखला लागतो, म्हणून पाया पडतो सर्व पोरांच्या दंगलीच्या भानगडीत पडू नका, असेही ते म्हणाले.

# दलाई लामांनी जिंकला ग्रॅमी पुरस्कार

## 90 व्या वर्षी कोणत्या श्रेणीत सन्मान? अध्यात्म आणि पॉप संस्कृतीचा अनोखा संगम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**तिबेटी धर्मगुरू दलाई लामा यांनी वयाच्या ९० व्या वर्षी ग्रॅमी पुरस्कार जिंकला आहे. ६८ व्या ग्रॅमी पुरस्कार सोहळ्यात त्यांनी पुरस्कारावर आपली मोहोर उमटवत संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. ९० वर्षीय दलाई लामा यांना त्यांच्या मेडिटेशनः द रिफलेक्शन्स ऑफ हिज होलिनेस द दलाई लामा या ऑडिओ प्रकल्पासाठी हा सन्मान मिळाला. त्यांना सर्वोत्कृष्ट ऑडिओबुक, कथन आणि कथाकथन रेकार्डिंग या श्रेणीत हा पुरस्कार देण्यात आला. ग्रॅमी पुरस्कारांच्या प्री-टेलिकास्ट समारंभादरम्यान हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ही घोषणा ऐतिहासिक ठरली. कारण प्रथमच या श्रेणीतील एखाद्या जगप्रसिद्ध आध्यात्मिक गुरु ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कारण ग्रॅमी पुरस्कार हा एक संगीत पुरस्कार आहे आणि दलाई लामा त्या क्षेत्रातील नाहीत.दलाई लामांबरोबर होत्या अन्य नामांकित व्यक्ती या श्रेणीतील स्पर्धा तीव्र होती. दलाई लामा यांनी ग्रॅमी पुरस्कारांचे यजमान आणि प्रसिद्ध विनोदी कलाकार ट्रेवर नोआ, अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीश केतनजी ब्राउन जॅक्सन आणि पाप संगीत गट मिली व्हॅनिलीचे सदस्य फॅब मोरवन यांसारख्या प्रमुख नामांकित व्यक्तींना मागे टाकले. हा विजय त्यांच्या लोकप्रियतेबरोबरच शांतता, करुणा आणि आत्मनिरीक्षण या विषयांना अजूनही



जागतिक स्तरावर किती महत्त्व आहे याची प्रचिती देतो.

**कोणत्या अल्बमसाठी पुरस्कार?**

मेडिटेशन : द रिफलेक्शन्स ऑफ हिज होलिनेस द दलाई लामा हा एक ऑडिओ आहे. यामध्ये मौखिक ध्यान, दलाई लामा यांच्या शिकवणी आणि संगीताचे सुंदर मिश्रण आहे. या अल्बमचे संगीत हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताने प्रेरित आहे. हे संगीत श्रोत्याला शांती, आत्मनिरीक्षण आणि संतुलनाची भावना देते. हा प्रकल्प केवळ आध्यात्मिक साधना करण्याचे माध्यम म्हणून काम करत नाही, तर आधुनिक जगात मानसिक शांती मिळवणा-यांसाठी एक शक्तिशाली संदेश देखील देतो. दलाई लामांच्या शिकवणी, अल्बमचा आत्मा

दलाई लामा स्वतः समारंभात उपस्थित नसल्याने, त्यांच्या वतीने हा पुरस्कार प्रसिद्ध गायक-गीतकार रुफस वेनराईट यांनी स्वीकारला. स्टेजवर आल्यावर त्यांनी विनोदाने म्हटले, बरं, मी स्पष्टपणे दलाई लामा नाही, ज्याला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. त्यांनी आयोजकांचे आभार मानले. ज्ञान, चिंतन आणि करुणा यांसारख्या मूल्यांवर आधारित ऑडिओतील सहभागावर आपले मत व्यक्त केले. दलाई लामा यांच्या शिकवणी हा या अल्बमचा आत्मा आहेत आणि त्यांच्या वतीने ग्रॅमी पुरस्कार स्वीकारणे हा एक अभिमानाचा क्षण असल्याचेही वेनराईट यांनी नमूद केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## नवी आशा, नवी उमेद

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत काल अर्थसंकल्प सादर केली. जागतिक व्यापारातील जोखीम आणि अस्थिरतेचे ग्रहण हे आगामी दशकभरासाठी तरी कायम राहील. या सावटाखालीच देशाची पुढील वाटचाल राहण्याचे संकेत देतानाच या उलथापालथीच्या काळात लांब पल्ल्याची मॅरेथॉन आणि वेगवान धाव असलेली शर्यत भारताला एकाच वेळी जिंकायची असल्याचे मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालात व्यक्त केले होते. अत्यंत अनिश्चिततेच्या काळात ही दुहेरी शर्यत जिंकण्याच्या दृष्टीने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी अनेक पावले टाकली. अर्थसंकल्प लोकप्रिय न करता तो लोककेंद्री कसा राहील, याची दक्षता त्यात घेतलेली दिसते. त्यामुळे त्याचे थेट परिणाम व्यक्तीच्या खिशावर झाल्याचे दिसणार नाही; मात्र अर्थव्यवस्थेवर त्याचे दीर्घकालीन परिणाम दिसावेत, यासाठीच्या ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांचा डोस अर्थव्यवस्थेला देण्याचे भान दाखवलेले दिसते. आर्थिक विकासाला गती, उत्पादकतावाढ, नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करणे, त्यासाठी क्षमतावाढ आणि 'सबका साथ सबका विकास' तत्त्वावर आधारित संसाधने, संधीची निर्मिती यावर भर देण्यात आला आहे. अर्थमंत्र्यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच याबद्दलची स्पष्टता दिली. करदात्यांसाठी नवीन काही तरतुदींची अपेक्षा यावेळी नव्हती. त्यामुळे जुन्या तरतुदी अपेक्षेप्रमाणे कायम ठेवण्यात आल्या; मात्र मूळ रिटर्न भरण्यासाठी पगारदारांसाठीची मुदत ३१ जुलै, तर नॉनऑडिट बिझनेस आणि ट्रस्ट यांच्यासाठी ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत ठरवण्यात आली. नवीन प्राप्तिकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होत असून, यामुळे कर प्रणाली सोपीदेखील होणार आहे. परदेश प्रवासही स्वस्त होणार असून, पर्यटकांवरचा करबोजा लक्षणीयरीत्या कमी होईल. चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के असून, आगामी आर्थिक वर्षात ही तूट ४.३ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. या तुटीचे प्रमाण टप्प्याटप्प्याने घटवण्यात येत असून, त्यावरून वित्तीय शिस्तीचे पालन केले जात आहे, या बदलाची नोंद घ्यावी लागेल. आर्थिक विकासाला गती, तो दीर्घकालीन स्वरूपात टिकवण्याकरिता स्पर्धात्मकता वाढवणे आणि अस्थिर जागतिक घडामोडी लक्षात घेऊन अर्थव्यवस्थेची लवचिकता मजबूत करणे, या तीन कर्तव्यांवर अर्थमंत्र्यांनी लक्ष केंद्रित केले. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या 'ग्रोथ फंडा' साठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) जोखीम भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी या निधीत २ हजार कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद आहे. शिवाय केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांना 'एमएसएमई' कडून माल खरेदीसाठी ट्रेड रिसिव्हेबल डिस्काऊंटिंग सिस्टीम प्लॅटफॉर्म अनिवार्य करण्यात आला. त्यामुळे या उद्योगांची तरलता वाढेल. त्याव्यतिरिक्त २०० जुन्या औद्योगिक संकुलांचे नवनवे तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या मदतीने पुनरुज्जीवन करण्यात येईल. 'एमएसएमई' क्षेत्राने ११ कोटी लोकांना रोजगार दिलेला आहे. त्यासाठी भरीव तरतूद करण्यामागे रोजगारनिर्मितीचा मुख्य हेतू आहे. मागील वर्षी संरक्षणावर ६ लाख ८१ हजार कोटी रुपयांची तरतूद होती. यंदा ती ७ लाख ८० हजार कोटींची केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत त्यात १५ टक्के वाढ आहे. त्यातही शस्त्रास्त्रांच्या आधुनिकीकरणासाठीची तरतूद ४० हजार कोटी रुपयांनी वाढवली आहे. मागील दशकापासून केंद्र सरकारचा पायाभूत सुविधांवर भर राहिला. आता पूर्वेकडील दानपुनी ते पश्चिमेकडील सुरतपर्यंत 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे माल वाहतुकीचा वेग वाढू शकेल. पाच लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमधील पायाभूत सुविधांवर लक्ष देण्यात येणार असून, त्यामुळे लहान शहरांचा विकास होईल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बंगळूर, दिल्ली-वाराणसी यासह एकूण सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर प्रकल्प सुरू करण्याची घोषणा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यामुळे मोठ्या शहरांतर्गत वाहतूक गतिमान होणार आहे. देशाला चिपनिर्मितीचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन' सुरू करण्यासाठी ४० हजार कोटींची भरीव तरतूद केली आहे. पुढील दशकाच्या आरंभापर्यंत जगाला दहा लाखांहून अधिक सेमीकंडक्टर व्यावसायिकांची कमतरता भासणार आहे. भारत या आव्हानात्मक गरजेचे रूपांतर संधीत करू शकतो. आज जगातील 'ग्लोबल डिजाईन वर्क फोर्स' पैकी २० टक्के हिस्सा भारताचा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थसंकल्पात फ्युचर्स अँड ऑप्शन्स व्यवहारांवरील सिक्युरिटीज ट्रँझॅक्शन टॅक्स वाढवण्यात आला. त्यामुळे सेन्सेक्स कोसळून शेअर बाजारात हाहाकार माजला. अर्थात, त्याने एकूण अर्थसंकल्पाचे मोजमाप होऊ शकत नाही किंवा करता येणार नाही. ओडिशा, केरळ, आंध्र आणि तामिळनाडूमध्ये दुर्मीळ खनिजांच्या उत्पादनासाठी विशेष कॉरिडॉर निर्माण केला जाणार आहे. दुर्मीळ खनिजांच्या साठ्यांबाबत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे; परंतु त्यांच्या उत्पादनातील देशाचा वाटा एक टक्कादेखील नाही. प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी वसतिगृह उभारण्याची योजना घोषित केल्याबद्दल देशातील असंख्य लाडक्या लेकी निर्मला सीतारामन यांना दुवाच देतील. शिक्षण वा नोकरीसाठी असंख्य तरुण महिला गाव सोडून शहरात येतात. खासकरून दलित व मागासांसाठी वसतिगृहांची गरज प्रचंड आहे. सोळाव्या वित्त आयोगाचा अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला असून, राज्यांचा वाटा ४१ टक्के इतका कायम ठेवला आहे. त्यात महाराष्ट्राचा हिस्सा ६.४४ टक्के असून, या परिणामी सुमारे ९८ हजार कोटी रुपये महाराष्ट्राला मिळणार आहेत. यामधून मेट्रो, ग्रामीण रस्ते, आर्थिक संकुले, ॲग्रो बिझनेस नेटवर्क अशा अनेक गोष्टींसाठी निधी मिळेल. अद्यापही देशाच्या विकासाची गती वाढून ती ८ टक्क्यांवर जाणे आवश्यक आहे. भांडवली खर्चातील १२.२ लाख कोटींची वाढ उल्लेखनीय म्हणावी लागेल. सीतारामन यांनी सलग नववा अर्थसंकल्प सादर करून एक नवा विक्रमच केला, हे खरे! पंतप्रधानांचे विकसित भारताचे व्हिजन लक्षात घेऊन त्यानुसार निर्धारपूर्वक पावले टाकली जात आहेत. हा अर्थसंकल्प नव्या जगाचे भान ठेवत, अर्थव्यवस्थेत नव्या आशा जागवताना नवी उमेद देण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

# भय इथले संपत नाही...

**अजित दादांची आठवण करत 'भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते' अशी सुनेत्रा ताईंच्या मनाची सध्या तगमग होत असेल. पण काळ खूप निष्ठूर असतो. बदल्याचे राजकारण भावना, संवदेनाच्या पलिकडचा जिवघेणा खेळ असतो त्याला सामोरे जाताना सारेकाही बाजुला ठेवून जावेच लागते हेच आपण पहात आहे.**

२८ जानेवारीला महाराष्ट्राच्या राजकारणात भयानक घटना घडली. त्यात राज्याने अजीत पवार यांच्यासारखा अनुभवी संवेदनशील नितळ मनाचा नेता गमावला. या धक्क्यातून महाराष्ट्र सावरला नाही तोच पुन्हा एकदा त्यांचे काका शरद पवार यांच्या आणि त्यांच्या कुटूंबाच्या राजकीय जीवनात नव्याने दरी निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. २०२४च्या लोकसभेत बारामतीमध्ये अजीत पवार यांच्या पत्नीला ज्यांनी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणूक लढवण्यास भाग पाडले त्या शक्ती पुन्हा सक्रीय झाल्या असून त्यांच्याकडून आता शरद पवार यांचा वासरा सांभाळणा-या सुळे यांच्याशी जुळवून घेवू पाहणा-या मोठ्या भावाच्या राजकारणात नवख्या असलेल्या त्याच्या विधवा पत्नीला समोर करत नवा 'राजकीय बाहुल्यांचा खेळ' 'ऑपरेशन लोटस'चा सुरू करण्याचा प्रयत्न केला जावू लागला आहे का? त्यामुळेच 'भय इथले संपत नाही' असे राजकीय विश्लेषक विचारू लागले आहेत.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्याचे गृहमंत्री राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांच्यावर शंभर कोटीच्या खंडणीचे आरोप करण्यात आले आणि त्यांच्या मागे तपास यंत्रणाचा ससेमिरा लावत त्यांना तुरूंगात डांबण्यात आले होते. त्यानंतर ते सरकार शिवसेनेच्या माध्यमातून पाडण्यात आले. २०२३मध्ये भोपाळ येथे एका जाहीर सभेत पंतप्रधान मोदी यांनी सिंचनाच्या ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा उल्लेख केल्यानंतर अजित पवार आणि राष्ट्रवादीचे तपास यंत्रणांच्या रडारवर असणारे हसन मुश्रीफ, वळसे पाटील, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांच्यासारखे १०-१२ प्रमुख नेत्यांनी चक्क शरद पवार यांची साथ सोडून देत भाजपचा हात पकडून जाण्याचे मनसुबे प्रत्यक्षात आणले.

### सत्तेच्या खेळाची लांडगेतोंड

त्यानंतर गेल्या दोन अडीच वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले दोन्ही राष्ट्रवादी वेगळ्या केल्या तरी त्यांच्या पुरोगामीपणाची नाळ काही तुटली नाही. आणि त्यांच्यात पुन्हा एकीने राहण्यासाठीचा नवा विचार आता पूर्णत्वास येण्याच्या मार्गावर होता. मात्र महराष्ट्रात २०१९च्या विधानसभा निवडणूकीनंतर सुरू झालेली सत्तेच्या खेळाची लांडगेतोंड आता जिवघेण्या वळणावर येवून ठेपली आहे. आधी शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्ष नियम कायदे आणि घटनात्मक पक्षांतरबंदीच्या बंधना पलिकडे राज्यपाल, सर्वोच्च न्यायालये आणि संविधनाच्या तरतूदी खुंटीला टांगून तोडण्यात आले. त्यानंतरही सत्ताधारी बलाढ्य पक्षांकडून पाहिजे तेवढे सत्तासंख्याबळ मिळत नसल्याने आता पक्षफोडीचा हा खेळ नेत्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे की काय? अजीत पवार यांच्या अकाली विमान अपघात निधनामुळे सध्या महाराष्ट्रात हा अपघात घडवून आणला गेला की काय? अश्या शंकाचे 'मोहोळ' उठल्याच्या चर्चा जाणकार विश्लेषक करत आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय सद्यस्थिती आणि 'लांडगे' तोडीच्या राजकारणाच्या बातम्यांमध्ये सध्या पुन्हा एकदा 'ऑपरेशन लोटस' होत असल्याच्या शक्यता व्यक्त केल्या जात आहेत,

### माझा काका लई मोठा आहे

पुणे- पिंपरी चिंचवडच्या महापालिका निवडणुकीत अजीत पवार यांच्याकडून दोन्ही राष्ट्रवादीना एकत्र करुन 'तुझ्या बापा पेक्षा माझा काका लई मोठा आहे' म्हणत त्यांच्याकडून राजकीय आव्हान देण्यात आले होते. निवडणूका संपल्या की राजकारण संपले असेही दादा त्यानंतर म्हणाले होते. पण प्रत्यक्षात निवडणुका संपल्या नंतर दादांचे वागणे काही बड्या शक्तीशाली नेत्यांना खटकल्याने ते जे बोलले त्याला कृतीने उत्तर देण्यासाठी त्याच्या उलटच राजकारण त्यांच्या पश्चात सुरू झाले आहे, अशी चर्चा आता राष्ट्रवादीच्या गोटातच दबक्या आवाजात सुरू आहे.

राष्ट्रवादीच्या दोन गटांना एकत्र करून निवडणूका लढायच्या हा मनसुबा मान्य झाला म्हणूनच तो निर्णय आमलात आला होता. त्यानंतर उध्दव ठाकरेंचे जे उदगार ठाकरेंच्या मनोमिलनाच्या वेळी होते तसे 'एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठीच' हा अजित पवार आणि शरद पवार यांचा मनसुबा होता का.? त्याचा अंतिम निर्णय त्यांनी घेतला तो दोन्ही बाजुच्या कुणा नेत्यांना खटकला होता का? मुख्य म्हणजे सध्या सत्तेची ऊब घेणा-या महायुतीच्या काही बड्या नेत्यांना तो मान्य नव्हता का.? असे प्रश्न आता निर्माण झाले आहेत. मूठभर पदाधिकारी आणि नेते महाशक्तीच्या दावणीला बांधले गेल्याने अजित पवार यांच्या 'सारे काही विसरून पुन्हा पूर्ववत एकत्र व्हायचे' मनसुबे त्यांच्या पक्षात ज्यांना मान्य नाहीत त्यांच्याकडून नव्याने राजकारण केले जात आहे का? असे प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. राष्ट्रवादीच्या अंतर्गत



विलीनीकरण्याच्या या राजकारणाच्या चर्चामध्ये आता मुख्यमंत्र्यानी भाष्य केल्याने भाजपलाही स्वारस्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे दादा गेले तरी राष्ट्रवादी मागचा 'राजकीय ससेमिरा' संपण्याची चिन्हे नाहीत.

### डर के आगे 'अजित' है

सुनेत्रा पवार यांच्यावर आता अजीत पवार यांच्या धर्मपत्नी म्हणून कुटूंबाची आणि त्यांच्या राजकीय अस्तित्वाच्या अपूर्ण कामगिरीची जबाबदारी येवून पडली आहे. त्यांना माहेर आणि सासरचा मोठा राजकीय वारसा असला तरी त्या स्वत: नुकत्याच दोन वर्षापूर्वी राजकारणात आल्या आहेत. या सध्याच्या राजकारणाला त्यांचे धडाडीचे पती 'गड्यांनो राजकारण लय वंगाळ त्याच्यापासून दूर रहा' असे सांगू लागले असताना कठीण काळात राजकारणात नाईलाजानेच आल्या आहेत. त्यामागेही काही राजकीय अपरिहार्यता आहेतच हे लक्षात घेतले पाहीजे. त्यांच्यावर राज्य सहकारी बँकेच्या २५ हजार कोटीच्या प्रकरणात सध्या खटला सुरू आहे. तर मुलावर अलिकडेच पुण्यात हजारो कोटीचा जमिन घोटाळ्याचा आरोप झाल्यानंतर चौकशीचे शुक्लकाष्ठ मागे लागले आहे. ज्या भितीच्या सावटाखाली अजीत पवार महायुतीच्या सोबत आले होते, त्यासावटातून ते आताशा डर के आगे अजित है अश्या अविर्भावात वागू बोलू लागले होते. दुर्दैवाने त्यांच्यावर अकाली काळाचा घाला आला.पण त्यांच्या मागे त्यांच्या कुटूंबियाना देखील सुरूवातीला हे अजित पवार जगले त्या राजकीय अपरिहार्यतेच्या वातावरणात जगावे लागत आहे, हे सारे सहन करताना दादांची आठवण करत 'भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते' अशी सुनेत्रा ताईंच्या मनाची सध्या तगमग होत असेल. पण काळ खूप निष्ठूर असतो. बदल्याचे राजकारण भावना, संवदेनाच्या पलिकडचा जिवघेणा खेळ असतो त्याला सामोरे जाताना सारेकाही बाजुला ठेवून जावेच लागते हेच आपण पहातोय.

### 'इतकी घाई' की 'इकीगाई'

आपल्या पहिल्याच उपमुख्यमंत्री म्हणून जारी केलेल्या संदेशात त्यांच्याकडून हेच उमटले आहे त्यांनी म्हटले आहे की, आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारली आहे. दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी व्यक्त केला. सुनेत्रा पवार यांच्याकडून सुरूवातीला अजित पवार यांच्या राज्यातील पद आणि जबाबदारीचा अधिकार घेण्याचा कठीण प्रसंग होता आता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती होण्यासाठी त्यांना उभे रहायचे आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांना त्या जागी बसविण्याची घाई आता पियुष गोयल यांच्या सारख्या भाजपच्या नेत्यांना झाली आहे.

यावरून महाशक्तीच्या आजवरच्या लौकीकानुसार पक्ष हायजॅक करण्याचा प्रयत्न तर केला जात नाही ना ? अश्या चर्चा आता जोर धरू लागल्या आहेत. मात्र 'पाटील' चालेल 'पटेल' नाही असे म्हणत मनसेच्या राज ठाकरेंसारख्या मराठी नेत्यांकडून राष्ट्रवादीच्या 'मराठा' नेते कार्यकर्त्यांची भावना व्यक्त होत असल्याने केंद्राची खासदारकी सोडलेल्या सुनेत्रांच्याकडे ही जबाबदारी येणार का? की खासदार असलेल्या तटकरे किंवा छगन भुजबळ यांच्याकडे हे पहावे लागेल. एक राष्ट्रीय पक्ष म्हणून, अशा बाबींमध्ये आम्ही विहित प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करतो असा स्पष्ट खुलासाही प्रफुल पटेल यांनी एक्स पोस्टमध्ये केला आहे.

भाजपा नेते पियुष गोयल यांनी प्रफुल्ल पटेल यांच्यासंदर्भात विधान केल्यानंतर माफी मागितली आहे. प्रफुल्ल पटेल यांनीही त्यावर स्पष्टीकरण दिले आहे.

हरियानातून आलेल्या सुनील अरोराला सध्या पक्षात शिवसेनेच्या मिलींद नार्वेकरांसारखे महत्वाचे मानले जावू लागले आहे. त्यामुळेच पियुष गोयलांपासून आणि भुजबळ, प्रफुल्ल पटेलापर्यत जी काही 'इतकी घाई' सुरू आहे ती 'इकीगाई' नक्कीच नाही. त्या मागे कुणा महाशक्तीला राज्याच्या विधानसभेत आता पुन्हा स्वत:च्या 'बहु'मतासाठी पवारांच्या 'बहु'ची मदत घ्यावी लागत आहे. राजकीय 'लचके तोडण्यासाठी भ्रष्ट लांडग्याच्या टोळ्याची मदत घ्यावी लागत आहे, त्यामुळे गोयल, पटेल यांचा हा उतावळेपणा हे न कळण्यासारखा महाराष्ट्राचा मराठा दुधखूळा नक्कीच नाही अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीच्या गोटातून दादांचे निष्ठावंत देताना दिसत आहेत.

अमोल मिटकरी, सुनील शेळके अण्णा बनसोडे, नरहरी झिरवाळ यांच्यासारख्या दादाभक्तांनी सुनेत्रा ताईच राष्ट्रीय अध्यक्षपदी हव्या आहेत. मिटकरी यांनी तर अजीत पवार यांच्या अपघाताच्या चौकशीवरही प्रश्नचिन्ह लावत या विषयावर वेगळ्याच चर्चांना वाट मोकळी करून दिली आहे. थोडक्यात 'अभो नया खेल शुरू हुवा है' अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये बरेच काही घडण्याची शक्यता आहे.

**किशोर आपटे**

## ढोंगीपणाचा कळस !

जगाच्या इतिहासात बॅबीलोनीयन, ग्रीस, इजिप्शीयन अशा अनेक संस्कृती उदयास आल्या आणि कालौघात लयाला गेल्या. परंतू अतिप्राचीन भारतीय संस्कृती संस्थाआजही टिकून आहे. शक, हूण कुशाण, यवन, पोर्तुगीज इ. अनेकांनी भारतावर आक्रमण करून येथील संपत्ती तर लुटलीच त्याही बरोबर भारतीय प्राचीन संस्कृती आणि सभ्यता यांचे अविभाज्य भाग असलेल्या मंदिरांचीही तोडमोड केली आणि विध्वंस केला. 'गझनी' या इस्लामी आक्रमकाने सोरटीच्या सोमनाथ मंदिरावर अठरा वेळा स्वारी करून त्यातील वैशिष्ट्यपूर्ण असणारे शिवलिंग ध्वस्त केले. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे पोलादी पुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला. अलिकडेच पंतप्रधान मोदींनी सोमनाथ येथे जाउन सोमनाथाचे दर्शन घेतले. सोमनाथ पर्वयात्रेमधे संबोधित करताना त्यांनी सांगितले की इस्लामी आक्रमण कर्त्यांनी संपत्ती लुटली पण ईश्वरी चैतन्याचा विध्वंस करण्याचा प्रयत्न करणारे स्वतःच लयाला गेले.

हमीद अन्सारी यांनी उपराष्ट्रपती म्हणून आणि इस्लामी देशात भारताचे राजदूत म्हणून काम केले. असे असतानाही निवृत्तीनंतर भारतात मुसलमान असुरक्षित आहेत अशी आवई त्यांनी पायउतार होताच उठवली.

सध्या आतंकवादाने जग त्रस्त झाले आहे. यातील बहूतांश आतंकवादी इस्लामी आहेत. म्हणूनच इस्लामी विचारसणीला कंटाळून अनेक हिंदू धर्माचा स्वीकार करत आहेत.

**संध्या काटदरे**

## ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकेत निदर्शने

ट्रम्प प्रशासनाच्या स्थलांतर विषयक कडक धोरणे, स्थलांतर व सीमा शुल्क विषयक धोरणे व त्यातून अमेरिकेच्या नागरिकांचे झालेले मृत्यू या विरोधात अमेरिकेत शुक्रवारी प्रचंड निदर्शने झाली. कामबंद, शाळाबंद खरेदी बंद असे आंदोलन करण्यात आले होते. या निदर्शनचे स्वरूप सर्व अमेरिकाभर होते मिनियापोलीस व त्याचा परिसर, लास एंजलिस, डेट्राईट उपनगरातील भाग, न्यूयॉर्क शहर, कोलोरॅडो अशा अनेक राज्यात या निदर्शनाचा जोर होता. अनेक ठिकाणी शाळा बंद होत्या. अनेक ठिकाणी नागरिक मोठ्या प्रमाणात एकत्र आले होते ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. ट्रम्प यांच्या व्हीएनझुलवरच हल्ला व तेथील राष्ट्राध्यक्षांना पकडून नेणे इराणला युद्धाची धमकी देणे तसेच अनेक देशांचे आयात शुल्क वाढविणे या गोष्टी जगातील अनेक राष्ट्रांना आवडल्या नाहीत. आता अमेरिकेत सुद्धा ट्रम्प विरोधात जनमत तयार होत आहे असे दिसते. ट्रम्प यांच्या धोरणामुळे जगातच नव्हे तर खुद्द अमेरिकेत सुद्धा विरोध होऊ लागला आहे

**शांताराम वाघ**
पुणे

## व्यसनाधीन तरुणाई

दरवर्षी ४ फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिन साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश समाजात कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. कर्करोग हा आजच्या काळातील एक अत्यंत गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. जगभरात दरवर्षी लाखो लोक या आजारामुळे मृत्युमुखी पडतात, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. कर्करोगाची अनेक कारणे असली तरी व्यसन हे कर्करोगाचे एक प्रमुख कारण आहे. तंबाखू, सिगारेट, गुटखा, खैनी, हुक्का, ई-सिगारेट, दारू तसेच विविध अमली पदार्थांचे सेवन केल्यामुळे तोंडाचा, फुफ्फुसांचा, घशाचा, यकृताचा इत्यादी कर्करोग होण्याचा धोका प्रचंड वाढतो. आजची भयावह वास्तविकता अशी आहे की, तरुण वर्ग (तरुण आणि तरुणी) मोठ्या प्रमाणावर व्यसनांच्या आहारी जात आहे. किशोरवयापासूनच मुलांना व्यसनांची सवय लागत असल्यामुळे त्याचे दुष्परिणाम लवकर आणि अधिक तीव्र स्वरूपात दिसून येतात. केवळ क्षणिक आनंदासाठी ओढलेली सिगारेट पुढे जाऊन व्यसनात रूपांतरित होते आणि आयुष्यभराचा आजार देऊन जाते, ही वास्तविकता आहे. ताणतणावातून पळ काढण्याची वृत्ती, चुकीची फॅशन, मित्रांचा दबाव, पालकांचे दुर्लक्ष तसेच समाजातील चुकीचे आदर्श ही व्यसनाधिनतेची प्रमुख कारणे आहेत. यामुळे अनेक तरुणांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य धोक्यात येत आहे.

**वर्षा आवदे**

## अर्थसंकल्पाची बदलती ओळख

भारताच्या अर्थसंकल्पीय इतिहासात आजचा दिवस केवळ आकड्यांच्या मांडणी साठी नाही, तर एका बदलत्या, आधुनिक आणि स्वाभिमानी भारताचे दर्शन घडवणारा ठरला. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा तिसरा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी परंपरेला तंत्रज्ञानाची जोड देत एक नवा इतिहास रचला. एकेकाळी ब्रिटीश राजवटीचा वारसा सांगणारी चामड्याची ब्रीफ केस ही अर्थसंकल्पाची अनन्यसाधारण ओळख होती. मात्र, २०१९ मध्ये अर्थमंत्र्यांनी ही दशकांची परंपरा मोडीत काढली. चामड्याच्या पेटीऐवजी भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेल्या लाल कापडी पिशवीतील 'बही-खात्या'चा त्यांनी स्वीकार केला. हा बदल केवळ बाह्य नव्हता, तर तो मानसिक गुलामगिरीच्या खुणा पुसून टाकणारा एक धाडसी सांगावा होता. आजचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने 'स्मार्ट' प्रशासनाचे जिवंत उदाहरण ठरला. पर्यावरणाचे संवर्धन आणि तांत्रिक प्रगतीचा ध्यास घेत हा अर्थसंकल्प पूर्णपणे 'कागद विरहित' स्वरूपात मांडण्यात आला. हा अर्थसंकल्प भविष्यातील भारताचा पाया रचणारा आहे. यात मांडलेली प्रत्येक तरतूद 'आत्मनिर्भर भारत' आणि 'शाश्वत विकास' या दोन महत्त्वाच्या स्तंभांवर आधारित आहे. ब्रीफकेस ते टॅब्लेटपर्यंतचा हा प्रवास भारताच्या बदलत्या मानसिकतेचे आणि वैश्विक पटलावर उमटणाऱ्या ठसठशीत मुद्रेचे प्रतीक आहे.

**अविनाश देशपांडे**

## आत्मनिर्भर नवा भारत घडविणारा अर्थसंकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आत्मनिर्भर नवा भारत घडवण्याच्या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरणारा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री श्रीमंती निर्मला सीतारामन यांनी सादर केला आहे. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण पावले पुढे पडत असून ७.४ टक्के विकास दराचे उद्दिष्ट गाठण्याचा या २०२६-२७ या अर्थसंकल्पीय वर्षात प्रयत्न होणार आहे. देशातील मध्यमवर्ग, गरीब आणि शेतकऱ्यांना समृद्ध करणारा हा अर्थसंकल्प आर्थिक प्रगतीचे शिखर गाठणारा ठरणार आहे. शेतकऱ्यांसाठी बहुभाषिक अंक-तंत्रज्ञान विकसित करून अत्याधुनिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. बायो फार्मा मिशन औषधांच्या केवळ किमती कमी करणारे नाही तर, जागतिक औषध बाजारपेठेत भारत एक औषध निर्मितीचे ग्लोबल हब ठरणार आहे. त्याचबरोबर या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रावर ही भर देण्यात आला असून पाच नव्या विद्यापिठासह तीन आयुर्वेदिक महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. या निमित्ताने भारतीय आयुर्वेद शास्त्र जगातल्या कानाकोपऱ्यात पोहोचवले जाणार आहे. या घोषणेसह डिजिटल आणि क्रिएटिव्ह स्किल्स वाढवण्यासाठी सरकारने कंटेंट क्रिएटर लॅब सुरु करण्याची योजना आखली आहे. या अनुषंगाने पंधरा हजार माध्यमिक शाळा आणि पाचशे महाविद्यालयात कंटेंट क्रियेटर लॅबची सुरुवात होणार आहे. ज्यामुळे डिजिटल तंत्रज्ञान कौशल्य शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच उच्च शिक्षण संस्थांसाठी प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृहे बांधण्याची घोषणा देखील अर्थमंत्र्यांनी केली आहे. मोठ्या शहरांसह छोट्या शहरांमध्ये पायाभूत सुविधा वाढवण्यात येणार आहेत. देशभरात सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर तयार करण्यात येणार असल्याने महाराष्ट्रातील व्यापारी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होणार आहे.

केंद्र सरकारतर्फे मांडण्यात आलेला हा अर्थसंकल्प शेती व शेतकऱ्यांना जीवनात आमूलाग्र बदल घडवणारा ठरू शकेल. कृषी बजेट वाढवून सुमारे दीड लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे संकेत देण्यात आले असून ही बाब महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी निश्चीतच आनंदाची आहे. कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी मोठ्या घोषणा करताना देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे यावर विशेष भर देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत योग्य वेळी हवामान, पीक नियोजन, कीड-रोग नियंत्रण आणि बाजारपेठची माहिती मिळणार असून निर्णयप्रक्रिया अधिक सुलभ होईल. डिजिटल शेतीच्या विकासाची दिशा या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसून येते. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन या परस्परपूरक घटकांसाठी भरीव तरतुदी व योजनांची घोषणा करण्यात आल्याने या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊन त्यांचा सर्वांगीण विस्तार होऊ शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सबब

# यवतमाळ येथे खळबळ !

## नामांकित तंत्रशिक्षण महाविद्यालयात विद्यार्थी सुरक्षा ऐरणीवर

### विद्यार्थिनींच्या तक्रारीने खळबळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या शिक्षण क्षेत्रावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी एक गंभीर व धक्कादायक घटना आज यवतमाळच्या अमरावती रोडवरील एका नामांकित तंत्रशिक्षण महाविद्यालयात उघडकीस आली आहे. येथील केमिकल विभागाच्या विभाग प्रमुखा विरुद्ध एका विद्यार्थिनीने अश्लील संदेश, आक्षेपार्ह व्हिडिओ पाठवून मानसिक छळ केल्याची तसेच विनयभंगाचा प्रयत्न केल्याची तक्रार केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित प्राध्यापक गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थिनीच्या वैयक्तिक मोबाईलवर आक्षेपार्ह स्वरूपाचे संदेश व व्हिडिओ पाठवत असल्याचा आरोप आहे. सुरुवातीला भीतीपोटी विद्यार्थिनीने मौन बाळगले मात्र आज दुपारी घडलेल्या घटनेनंतर तिने आपल्यासोबत घडलेला प्रकार सहाध्यायी विद्यार्थ्यांना सांगितला. विद्यार्थिनीने सादर केलेल्या कथित पुराव्यांनंतर महाविद्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. काही संतप्त विद्यार्थ्यांनी संबंधित विभाग प्रमुखाच्या केबिनकडे धाव घेतली. यावेळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून, या घटनेचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याचेही समजते.



दरम्यान, या प्रकरणाची माहिती मिळताच लोहारा पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही महाविद्यालयात भेट देऊन प्राथमिक चौकशी केली. संबंधित विभाग प्रमुखास ताब्यात घेण्यात आले असून, विद्यार्थिनीच्या तक्रारीवर कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.या घटनेला राजकीय व सामाजिक वळण मिळाल्याची चर्चा असून, पीडित विद्यार्थिनी ही जिल्ह्यातील एका प्रभावी राजकीय व्यक्तीच्या निकटवर्तीय असल्याची माहिती चर्चेत आहे. त्यामुळे प्रकरणाकडे प्रशासनाचे विशेष लक्ष केंद्रीत झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे, याच शिक्षण संस्थेशी संबंधित इतर शैक्षणिक संकुल मध्ये यापूर्वीही विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. त्यामुळे पुन्हा एकदा विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची?असा सवाल पालकवर्गातून उपस्थित होत आहे. सध्या महाविद्यालय परिसरात तणावपूर्ण शांतता असून, पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. दोषी आढळल्यास कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत आहे.

### गुन्हा नोंदणीच्या प्रतीक्षेत पोलीस, प्राध्यापकास सेवेतून बडतर्फ

**अमरावती रोडवरील नामांकित तंत्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थिनीशी गैरवर्तनाच्या आरोपांमुळे चर्चेत असलेल्या प्रकरणात आता नवे अपडेट समोर आले आहे. पोलीस विभागाकडून गुन्हा दाखल करण्याची तयारी सुरू असतानाच, संबंधित विद्यार्थिनीने अद्याप अधिकृत तक्रार नोंदवलेली नसल्याने गुन्हा दाखल होणे प्रलंबित असल्याची माहिती लोहारा पोलीस ठाण्याचे ठाणेदार रोहित चव्हाण यांनी दिली आहे. या घटनेनंतर महाविद्यालय परिसरात तणाव निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस प्रशासन सतर्क झाले असून, पीडित विद्यार्थिनीची तक्रार प्राप्त होताच कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही पोलीस सूत्रांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने संबंधित प्राध्यापकाला सेवेतून बडतर्फ केल्याची माहिती समोर आली आहे. महाविद्यालय प्रशासनाने अंतर्गत चौकशी करून हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. सध्या पोलीस विभाग पुढील प्रक्रियेच्या प्रतीक्षेत असून, विद्यार्थिनीच्या तक्रारीनंतरच गुन्हा नोंदविण्याबाबत निर्णय होणार आहे.**

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा निवडीत मोठा घोळ

### मर्जीतील शाळांना जादा गुण? पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

**जनमाध्यम प्रतिनिधी**

**यवतमाळ (विवेक वानखडे)** : राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या महत्त्वाकांक्षी अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यातील मूल्यांकन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, यवतमाळ जिल्ह्यात या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रात तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. गुणवत्तेच्या निकषांवर आधारित स्पर्धा व्हावी या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या योजनेत मर्जीतील शाळांना जादा गुण देऊन निकष डावलण्यात आल्याचा घोळ उघडकीस येत आहे. टप्पा क्रमांक ०३ अंतर्गत २०० गुणांच्या मूल्यांकन पद्धतीनुसार पायाभूत सुविधा ३८ गुण, शासनाचे ध्येय धोरण १०१ गुण आणि शैक्षणिक संपादणूक ६१ गुण या आधारावर शाळांचे मूल्यांकन करून समितीमार्फत निवड करणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात ही प्रक्रिया नियमांनुसार न राबविता माहिती गुप्त ठेवून परस्पर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली, असा आरोप करण्यात येत आहे. परिणामी नियमबाह्य पद्धतीने काही शाळांना बक्षिसांचा लाभ मिळाल्याची चर्चा सुरू आहे.नियमानुसार प्रथम केंद्रस्तरीय मूल्यांकन करून आलेल्या शाळांची प्रसिद्धी करणे, त्यानंतर तालुकास्तरीय मूल्यांकन करून प्रथम,



द्वितीय, तृतीय क्रमांक जाहीर करणे अपेक्षित होते. मात्र शिक्षण विभागाने ही प्रक्रिया टाळत तालुकास्तरीय मूल्यांकन समितीला डावलले. विशेष म्हणजे तालुकास्तरीय समितीत अनिवार्य असलेले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व नगरपालिका मुख्याधिकारी मूल्यांकनावेळी प्रत्यक्षात अनुपस्थित असल्याचेही निदर्शनास आले आहे.याहून गंभीर बाब म्हणजे गटशिक्षणाधिकारी व विस्ताराधिकारी यांनी संगनमताने केंद्रस्तरीय समितीकडून प्राप्त गुणदान प्रपत्रांमध्ये हस्तक्षेप करून ऑनलाइन पद्धतीने गुणांमध्ये कपात-वाढ केल्याचा आरोप मुख्याध्यापकांकडून करण्यात येत आहे. कार्यालयात बसून कागदोपत्री गुण वाढवून मर्जीतील शाळांना लाभ दिला जात असल्यामुळे या अभियानाचा मूळ उद्देशच संपुष्टात येत असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.या प्रकारामुळे तालुक्यातील अनेक शाळांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही शाळांनी अत्यंत प्रामाणिकपणे अभियानाची अंमलबजावणी करत स्वच्छता, सुविधा, उपक्रम व शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी मोठी मेहनत घेतली. मात्र अशा शाळांची गुणकपात करून केंद्रस्तरावरच अडवणूक करण्यात आली, असा आरोप होत असून त्यामुळे अनेक शाळा पुढील स्पर्धा पासून परावृत्त झाल्याचे चित्र आहे.जर गुणांकन कार्यालयातच ठरवायचे असेल, तर स्पर्धा घेण्याचे औचित्य काय?" असा संतप्त सवाल शिक्षण क्षेत्रातून उपस्थित केला जात आहे. शासनाने गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू केलेली योजना जर ओळखी, हस्तक्षेप आणि मनमानीच्या आधारे चालत असेल, तर त्याचा विपरीत परिणाम थेट शिक्षणाच्या गुणवत्तेवर होणार आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून फेरगुणांकन करावे आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी संबंधित शाळा व मुख्याध्यापकांकडून होत आहे.'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान गुणवत्तेचे प्रतीक ठरणार की व्यवस्थात्मक घोळाचे उदाहरण, हा प्रश्न आता उपस्थित झाला असून, यवतमाळ जिल्ह्यात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.

## • वेचक



### टेंभी (का) येथे मुख्यमंत्री ग्राम समृद्ध अभियान अंतर्गत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

महागाव - माणगाव तालुक्यातील ग्रामपंचायत टेंभी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्राम समृद्ध अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले सेवा सप्ताहाच्या माध्यमातून गावातील लोकांचा सहभाग घेऊन गाव स्वच्छता आत्मनिर्भरता हरित गाव सुंदर गाव या तत्त्वांचा जागर करून गाव स्वच्छतेचे कार्य प्रारंभ झाले सात दिवसाच्या सप्त्यामध्ये लोकसभागातील अनेक उपक्रमांचा सहभाग आहे भक्ती भाव तथा आपल्या ग्रामां बद्दलची आत्मियता स्वाभिमान जागृत व्हावा या उदात्त हेतूने सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी सर्व ग्रामस्थांनी सहभाग घेतला व ग्राम समृद्ध अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली यावेळी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी श्री राजुरे साहेब सरपंच अमोल चिकने उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य तंटामुक्ती अध्यक्ष सर्व लोकांनी सहभाग घेतला.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संस्थेच्या तालुका युवक आघाडी प्रमुखपदी निखिल इंगोले

राळेगाव - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान संस्था, महाराष्ट्र राज्य या सामाजिक, सांस्कृतिक व वारकरी चळवळीत कार्यरत असलेल्या संस्थेमध्ये युवकांना संघटित करून समाजहितासाठी कार्य करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. ॲड. श्याम खंडारे यांच्या आदेशानुसार तालुका युवक आघाडी प्रमुख या पदावर निखिल प्रदीपराव इंगोले (मु. पिंपरी – इंगोले) यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली. निखिल इंगोले हे सामाजिक, सांस्कृतिक तसेच वारकरी विचारधारेत सक्रिय सहभाग घेणारे युवक असून त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान दिले आहे. युवकांना योग्य दिशा देणे, समाजप्रबोधन, वारकरी संस्कृतीचा प्रसार, तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे प्रचार-प्रसार करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे. या नियुक्तीमुळे तालुका स्तरावर संस्थेचे कार्य अधिक गतिमान होईल, युवक वर्ग मोठ्या प्रमाणात संस्थेशी जोडला जाईल आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांना बळ मिळेल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. निखिल इंगोले यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व वारकरी संप्रदायातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### धनोडा जि. प. उ. प्रा. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विलास कांबळे तर उपाध्यक्षपदी वैशाली पिटलेवाड यांची निवड

महागाव - ३१ जानेवारी महागाव तालुक्यातील मौजे धनोडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा व्यवस्थापन समितीच्या शैक्षणिक सत्र स.न. २०२६ - २७ च्या अध्यक्षपदी विलास कचरु कांबळे तर उपाध्यक्षपदी वैशाली दशरथ पिटलेवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.यावेळी विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष संतोष साहेबराव अडकिने, सोसायटी संचालक संतोष बुलकुलवार, संतोष धारपवार, दिगंबर चांदले, तातेराव भेंडे,अमजत पठाण यांनी नवनियुक्त अध्यक्ष उपाध्यक्ष यांचे स्वागत केले आले.

# चिखलगाव येथे भव्य नेत्र तपासणी व मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### सरपंच रुपाली सुनील कातकडे व उपसरपंच सुनील कातकडे यांच्या पुढाकारातून शिबिराचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - शहरालगत असलेल्या चिखलगाव येथे आयोजित भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व स्व.केशवराव कातकडे बहुउद्देशीय शिक्षण संस्था,चिखलगाव या संस्थेच्या सामाजिक दायित्वातून चिखलगावच्या सरपंच रुपाली सुनील कातकडे व उपसरपंच सुनील कातकडे यांच्या पुढाकाराने या शिबिराचे आयोजन शनिवारी 31 जानेवारी ला करण्यात आले होते.

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा,चिखलगाव येथे सकाळी 10 वाजल्यापासून आरोग्य शिबिरास सुरुवात झाली.या शिबिराचे उद्घाटन आमदार संजय देरकर यांच्या हस्ते पार पडले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार वामनराव कासावार उपस्थित होते. कार्यक्रमास चिखलगावच्या सरपंच रुपाली कातकडे, उप सरपंच सुनील



कातकडे, शिवसेना जिल्हा प्रमुख संजय निखाडे,शरद ठाकरे, डॉ.महेंद्र लोढा,गणपत लेडांगे,सुधीर थेरे, अजिंक्य शेंडे,रामचंद्र वाभिटकर यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर,तज्ज्ञ डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते,स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात नागरिकांची सखोल नेत्र तपासणी करण्यात आली. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांची निवड करून त्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. यासोबतच रक्तदाब,मधुमेह व सर्वसाधारण आरोग्य तपासणीसह आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. अनुभवी डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांनी रुग्णांची काळजीपूर्वक तपासणी केली. महात्मे नेत्र पेढी,नागपूर,लोढा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, वणी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, राजूर यांच्या संयुक्त सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेले हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित नागरिकांनी आयोजक संस्था, मान्यवर,डॉक्टर व सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे मनःपूर्वक आभार मानले.

# प्रेस क्लब पांढरकवडात विश्वासाची पुन:मोहर



**जनमाध्यम प्रतिनिधी**

### प्रवीण पिन्नमवार अध्यक्षपदी कायम तर सचिव पदी रवि वल्लमवार

पांढरकवडा : प्रेस क्लब पांढरकवडाची अत्यंत महत्त्वाची कार्यकारिणी बैठक रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी येथील विश्रामगृहात ज्येष्ठ पत्रकार अशफाक खान यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत सर्वानुमते प्रेस क्लबची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

बैठकीत अध्यक्षपदी प्रवीण पिन्नमवार यांची सलग फेरनिवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रेस क्लब पांढरकवडाने विविध सामाजिक व पत्रकार हिताच्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली असून, पत्रकारांच्या प्रश्नांवर ठाम आणि निर्भीड भूमिका घेतली आहे. त्यांच्या कार्यावर विश्वास व्यक्त करत सदस्यांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सफी खान, सचिवपदी रवि वल्लमवार, कोषाध्यक्षपदी गणेश सामजवार यांची एकमताने निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध झाल्याने प्रेस क्लबमधील एकजूट, विश्वास आणि संघटनात्मक बळ अधोरेखित झाले. या बैठकीस संतोष मग्गीडवार, तनवीर शेख, वाजीद कुरेशी, गणेश बेतवार यांच्यासह अनेक ज्येष्ठ व युवा पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीमुळे पांढरकवडा परिसरातील पत्रकारितेला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### शाळेत भजन, कीर्तन, वाद्य धार्मिक धडे शिकविणाऱ्या महाराजा विरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हे दाखल!

पुसद - तालुक्यातील कृष्णनगर (सेलू)येथील शाळेतील विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य केल्यामुळे पोस्को अंतर्गत बाळू महाराज डाके मोरचंडीकर यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहे.
हा बाळू महाराज विद्यार्थ्यांना शाळेत भजन,कीर्तन,वाद्य वाजविणे असे धडे शिकवीत होता.हा प्रकार १९ जानेवारी रोजी घडला आहे, नैसर्गिककृत्य झालेला विद्यार्थी हा पाचव्या वर्गात शिकत होता शाळेच्या शिक्षणासोबतच धार्मिक शिक्षण घेत होता त्याच्यासोबत बाळू महाराजांनी केलेले कृत्य हे त्यांनी आपल्या आजीला सांगितले यावरून ग्रामीण पोलीस स्टेशन पुसद येथे पोस्को अंतर्गत कलम ८,१०,१२ तसेच बि.एन. एस १२७(२) नुसार गुन्हे नोंद करून बाळू महाराज यांना अटक करण्यात आली आहे, पुढील तपास ठाणेदार सुरेंद्र राऊत ग्रामीण पोलीस स्टेशन पुसद यांच्या मार्गदर्शनात चौकशी अधिकारी देशमुख हे करीत आहेत.

# पाटणबोरी–वणी महामार्ग प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धोक्याच्या उंबरठ्यावर

### अपघाताची वाट पाहत आहेत का अधिकारी?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - पाटणबोरीपासून वणीच्या दिशेने जाणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या व वर्दळीच्या मुख्य रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात झुडपे, काटेरी झाडे व गवत वाढले असून संपूर्ण रस्ता अक्षरशः झुडपांच्या विळख्यात सापडला आहे. या मार्गावर दररोज हजारो वाहने धावतात. मुकुटबण येथील सिमेंट फॅक्टरी, औद्योगिक वीज प्रकल्प तसेच इतर लघु-मोठ्या उद्योगांमुळे येथे अवजड वाहनांची सतत वाहतूक सुरू असते.

मात्र रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झुडपांमुळे वाहनचालकांना समोरून येणारी वाहतूक, वळणे तसेच बाजूची हालचाल दिसेनाशी झाली आहे. परिणामी छोट्या-मोठ्या अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला असून प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या रस्त्याचे भूमिपूजन २०१९ साली माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते झाले होते. एवढ्या महत्त्वाच्या रस्त्याची अशी दुरवस्था होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. एकीकडे कोट्यवधी रुपये खर्च करून रस्ते बांधले जातात, तर दुसरीकडे साधी झुडपांची साफसफाई करण्यास संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे स्पष्ट दिसून येते. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की दरवर्षी झुडपे साफसफाई, देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली केवळ कागदोपत्री व डुप्लिकेट बिले काढली जातात. प्रत्यक्षात मात्र रस्त्याच्या कडेला वाढलेली झुडपे महिनो-महिने तसेच राहतात. या निष्काळजीपणामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावर शालेय विद्यार्थी, कामगार, उद्योगातील कर्मचारी तसेच सामान्य नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात. अशा परिस्थितीत एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तरी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग प्राधिकरण व जिल्हा प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून पाटणबोरी–वणी मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेली सर्व झुडपे, झाडे व अडथळे त्वरित हटवावेत.

# पुसदमधे साजरी होणार उत्साहात शिवजयंती

### विविध समित्यांचे गठन,सांस्कृतीक व प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - संपूर्ण देशाचे व महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती यावर्षी सुद्धा पुसद शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असुन शिवजन्मोत्सव समितीने यासाठी पुढाकार घेतला आहे. जन्मोत्सव समितीचे समन्वयक राजु साळुंके व अध्यक्ष हरगोविंद कदम यांच्या नेतृत्वात शिवजयंती निमित्य विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे.यात पुतळा समिती प्रमुख म्हणुन राजु साळुंके, शिवसामान्यज्ञान परीक्षा समितीत चंद्रकांत देशमुख, हरीप्रसाद विश्वकर्मा व किरण देशमुख यांचा समावेश करण्यात आला आहे. मोटर सायकल रॅलीचे नेतृत्व अभिजीत पानपट्टे व वैभव फुके करणार आहेत.तर शिवपर्व समितीत नितिन पवार, यशवंतराव देशमुख, सुशांत महल्ले, प्रा. गजानन जाधव हे काम पाहणार आहेत.



शिवजयंती महोत्सव समितीचा उद्घाटन सोहळा संतश्रेष्ठ सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधुन दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता होणार असुन सप्तखंजेरीवादक ईंजी.भाऊसाहेब थुटे लोकप्रबोधनकार आर्वी यांचा समाजप्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे.दि.१६ व १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी विविध शाळांचे विध्यार्थी सांस्कृतीक कार्यक्रम सादर करतील.दि १८ फेब्रुवारी रोजी रात्री बारा वाजता जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे.दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात मान्यवरांच्या हस्ते शिवपुजण करण्यात येणार आहे.या नंतर भव्य अशी मोठी मोटर सायकल रॅली निघणार असुन दुपारी २:००वाजता शोभायात्रा निघणार असुन यात विविध सांस्कृतीक पथके व शाळांच्या विध्यार्थ्यांचे सहभागातुन देखावे पहावयास मिळणार आहेत. या सर्व कार्यक्रमाचा लाभ पुसद शहरातील व परीसरातील नागरीकांनी घ्यावा असे आवाहन शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.समिती गठनाच्या वेळी घेण्यात आलेल्या बैठकीला भारत पेंशनवार, भिमराव कांबळे,कैलास गायनर,शेख नईम,अँड.रमेश पाटील,पंडितराव देशमुख,साहेबराव ठेंगे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व शिवप्रेमी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माळआसोली ते इनापूर रोडवर डिझेलच्या टँकरने युवकास चिरडले ; युवकांचा जागीच मृत्यू

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यातील मौजा सांडवा येथील राहुल प्रल्हाद ढगे वय 27 वर्ष हा लोणदरी येथुन काम आठवण परत येत असताना भरधाव टँकरने शिरडल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. दिनांक 31/01/2026 रोजी संध्याकाळी 07/15 वाजताचे दरम्यान राहुल ढगे हा ग्राम लोणदरी येथून त्यांचे मोटार सायकल होन्डा शाईन क्रमांक MH-29,BN-4657 ने जात असतांना ग्राम ईनापुर ते माळ आसोली रोडवर त्याचा अपघात होऊन तो मरण पावला यावरुन गावातील ग्रामपंचायत सदस्य पवन दांडेगावकर हे ताबडतोब ग्राम ईनापुर ते माळ आसोली येथे पोहोचले असता तेथे राहुल प्रल्हाद ढगे हा मृत अवस्थेत पडुन होता.

तेथे पोलीस स्टेशन खंडाळा व पोफाळी येथील पोलीस हजर होते. हकीकत अशी की मिळालेल्या माहीतीच्या आधारे राहुल प्रल्हाद ढगे हा घरी सांडवा येथे येत असतांना त्याचे मोटार सायकलला डिझेलचे टँकर क्रमांक MH,30-BD,0375 च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजी पणाने चालवून राहुल ढगे यांच्या मोटार सायकलला जबर धडक दिल्यामुळे त्याचा अपघात होवुन जागीच मृत्यु झाला त्याचा मृतदेह छिन्न विन्न अवस्थेत पडून होता तसेच त्याच्या डोक्याचा संपूर्ण भाग हा धडकेमध्ये विखुरल्यागेला होता.सदर वाहन चालका विरुध्द कार्यवाही करीता पोलीस स्टेशन खंडाळा येथे पवन दांडेगावकर ग्रामपंचायत सदस्य सांडवा यांच्या जबानी रिपोर्ट वरून गुन्हा दाखल झाला आहे पुढील तपास खंडाळा पोलीस स्टेशनचे चौकशी निरीक्षक नारायण पवार हे करीत आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना स्वस्त दरात रेती-मुरूम द्यावा

### धानोरा येथील लाभार्थ्यांची तहसीलदारांकडे मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - धानोरा येथील घरकुल लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी लागणारी रेती व मुरूम अत्यंत महाग दराने घ्यावी लागत असल्याने बांधकाम खर्चात मोठी वाढ होत आहे. याबाबत दिलासा मिळावा, यासाठी धानोरा येथील समस्त घरकुल लाभार्थ्यांच्या वतीने ग्रामपंचायत उपसरपंच व सदस्यांनी तहसीलदार राळेगाव यांना निवेदन सादर केले आहे.

धानोरा गावात सध्या सुमारे १०० नवीन घरकुल लाभार्थी असून, घर बांधकामासाठी लागणारी रेती गावाच्या जवळ उपलब्ध असतानाही ती ६,००० ते ७,००० रुपये प्रति ब्रास या अव्वाच्या सव्वा दराने खरेदी करावी लागत आहे. त्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात घर बांधकाम करणे कठीण होत असल्याचे लाभार्थ्यांनी नमूद केले आहे. जर शासनाने घरकुल



लाभार्थ्यांसाठी स्वस्त दरात रेती व मुरूम उपलब्ध करून दिले, तर बांधकाम खर्चात बचत होऊन घरे वेळेत पूर्ण करता येतील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच प्रशासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. यावेळी उपसरपंच विशाल येणोरकर, स्वप्नील गलाट, प्रीतम घिनमीने, विजय मेश्राम, भोजराज जुनघरे, सुनील गेडाम, तुळशीराम गेडाम, आकाश सलाम, विजय चकोले, अविनाश घोडे, मनोहर देवतले, हर्षल घोडे, राजू गुजरकर, जीवन जुमनाके, निलेश वरघणे आदी उपस्थित होते. घरकुल लाभार्थ्यांच्या या मागणीवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रा. डॉ. अमर वंजारी सन्मानित

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - बी द चेंज फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा २०२६ हा कार्यक्रम काल शिर्डी येथील साईपालखी निवारा येथे उत्साहात आणि गौरवपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यात शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा येथील प्राध्यापक प्रा. डॉ. अमर वंजारी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान तसेच सामाजिक बांधिलकी या महत्त्वाच्या निकषांच्या आधारे तज्ज्ञ समितीमार्फत अमरावती विभागातून प्रा. डॉ. अमर वंजारी यांची निवड करण्यात आली होती. पुरस्कार वितरणावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र,



मानचिन्ह, भव्य ट्रॉफी, महाराष्ट्राचा भगवा फेटा, साईबाबांची शाल व भेटवस्तू प्रदान करण्यात आली. या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यास कर्नल मा. श्री. सुनील राजदेव, मा. श्री. अरुण उत्तमराज भंडारे, मा. श्री. श्रीराम धेरात साहेब, मा. निवेदिता पगार मॅडम तसेच मा. श्री. ऋषिकेश खंडार यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्या या गौरवाबद्दल संस्था सचिव तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य मा. विजय मोघे यांनी मनःपूर्वक अभिनंदन करताना, "संस्थेतील शिक्षकांचे कार्य राज्यस्तरावर सन्मानित होणे ही अभिमानाची बाब आहे," असे मत व्यक्त केले.

# ‘टॅग’ चा तमाशा आणि सरकारची तटस्थ भूमिका!

## महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेवर गौवंश तस्करीचा उघड खेळ

**चांदुर बाजार/वार्ताहर**

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर सध्या गौवंश तस्करीचा धंदा नव्या ‘टॅग तंत्रज्ञानाच्या’ आड बिनधास्त सुरू आहे. बनावट टॅग लावून जनावरांची वाहतूक केली जाते, कत्तल झाल्यावर तेच टॅग पुन्हा दुसऱ्या गौवंशाच्या गळ्यात अडकवले जातात आणि हा सगळा काळाबाजार प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरू आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, गावोगावी काही खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर प्रति गौवंश अवघे ५० रुपये घेऊन हे टॅग लावण्याचे काम करत



असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. म्हणजेच, ज्यांच्यावर पशुसंवर्धनाची जबाबदारी आहे, त्यांच्याच हातून व्यवस्थेची खिल्ली उडवली जात आहे. हा केवळ किरकोळ प्रकार नसून, महाराष्ट्र मध्यप्रदेश सीमेवर कार्यरत असलेले मोठे रॅकेट असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

प्रशासन टॅग खरे की खोटे, याची चौकशी करणार असल्याचे सांगत असले तरी प्रत्यक्षात कारवाईला होणारा विलंब अनेक संशयांना जन्म देतो. विशेष म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समित्या असोत वा इतर खरेदी-विक्रीची केंद्रे कुठेही गौवंशाच्या टॅगची सत्यता तपासली जात नसल्याचे उघड झाले आहे. म्हणजे कागदोपत्री कायदे कडक आणि प्रत्यक्षात मात्र मोकळे रान!

या संपूर्ण प्रकरणाला वेगळे वळण मिळाले ते जिल्ह्यातील चांदुर रेल्वे पोलिसांनी केलेल्या दोन कारवायांमुळे. या कारवायांमुळे टॅगचा खोटेपणा उघड झाला आणि आतापर्यंत ‘सगळं कायदेशीर आहे’ असा आव आणणाऱ्यांची पोलखोल झाली. प्रश्न असा आहे की, हे दोन अपवाद वगळता उर्वरित यंत्रणा कुठे झोपलेली होती?

पशुसंवर्धन विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून जिल्ह्यात या गंभीर प्रकाराकडे होत असलेले दुर्लक्ष हे केवळ निष्काळजीपणाचे नाही, तर संशयास्पदही आहे. गौवंश संरक्षणाच्या नावाने राजकारण तापवले जाते, पण प्रत्यक्षात मात्र तस्करांचे फावते,हा दुटप्पीपणा नाही तर काय?

आता तरी महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश सरकारने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे. बनावट टॅग, भ्रष्ट साखळी आणि सीमावर्ती भागात फोफावलेली तस्करी यावर ठोस, पारदर्शक आणि कठोर कारवाई झाली नाही, तर ‘गौवंश संरक्षण’ हे फक्त भाषणापुरतेच उरेल आणि जमिनीवर मात्र टॅगांचा हा तमाशा असाच सुरू राहील.

# जिल्हास्तरीय प्रदर्शनीत इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाचे यश

**अमरावती/का.प्र.**

जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनी कृषी विद्या शाखा, रुरल इन्स्टिट्यूट, शिवाजीनगर, अमरावती येथे उत्साहात संपन्न झाली. या प्रदर्शनीत विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अंतर्गत इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती तर्फे सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले.



व्यावसायिक [illegible] अभ्यासक्रमातील अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाअंतर्गत पोस्टाच्या विविध योजना या विषयावर सादर करण्यात आलेल्या प्रतिकृतीस द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या प्रतिकृतीसाठी प्रा. पद्मा ठाकरे व प्रा.पूजा बैतुले यांचे मार्गदर्शन लाभले. परी सोलव व विद्या कास्देकर या विद्यार्थिनींनी या प्रकल्पासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच चाइल्ड ओल्ड एज अँड हेल्थ केअर सर्व्हिसेस या ट्रेड अंतर्गत बुद्ध्यांक गणना चाचणी या विषयावरील प्रतिकृतीसही द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या प्रकल्पासाठी प्रा. सोनल शहा यांचे मार्गदर्शन लाभले असून संबंधित विद्यार्थिनींनी परिश्रमपूर्वक सहभाग नोंदविला. या तंत्र प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मुळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास कृषी विद्या शाखेचे प्राचार्य ढोबळे तसेच हांडे हे समन्वयक म्हणून उपस्थित होते.या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कोल्हे , विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या कार्यकारिणी सदस्या डॉ. पुनम चौधरी तसेच प्रा. गजानन काळे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून कौतुक केले. महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल अभिनंदन व्यक्त केले.

# ‘आरटीई’ प्रवेश प्रक्रिया जिल्ह्यात २३६ शाळांची नोंदणी

## फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होणार विद्यार्थी नोंदणीसाठी प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**

आरटीई (मोफत शिक्षणाचा अधिकार) अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी जिल्ह्यातील ३६१ शाळांपैकी आतापर्यंत २३६ नोंदणी झालेली आहे. यापैकी काही शाळांचे व्हेरिफिकेशनची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी आरटीई कायद्यानुसार मोफत प्रवेश दिले जातात. यासाठी आतापर्यंत २३६ खासगी, विनाअनुदानित शाळांनी नोंदणी केली आहे. तर काही शाळांकडून प्रक्रिया सुरू आहे. राज्यात शालेय शिक्षण




विभागातर्फे शिक्षण कायद्यांतर्गत २५ टक्के आरक्षित जागांवर ऑनलाइन आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. त्यानुसार या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचे अनुषंगाने जानेवारी महिन्यापासून विना अनुदानित, स्वयंम अर्थसहाय्यित शाळा नोंदणी आणि शाळा व्हेरिफिकेशन लिंक सुरू करण्यात आली आहे.

खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील विद्यार्थी आरटीईचा लाभ घेऊ शकतात. या खाजगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील मुलांसाठी २५ टक्के जागा राखीव आहेत.आरटीई प्रवेशाकरिता शाळा नोंदणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे यंदा नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्याअगोदरच प्रवेशाची प्रक्रिया फेब्रुवारी महिन्यापासून सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

शाळा नोंदणीसाठी ३१ जानेवारीची मुदत दिल्यानंतर शिक्षण विभागाकडून फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यार्थी नोंदणीसाठी सुरुवात केली जाणार आहे. सध्या १ लाखापेक्षा जास्त जागा आरटीई प्रवेशासाठी राज्यभरात उपलब्ध आहेत. त्यामुळे पालकही आरटीई प्रवेशासाठी नोंदणीची प्रक्रिया केव्हा सुरू होते याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

शाळा नोंदणीनंतर अत्यंत महत्त्वाचा टप्पा शाळा व्हेरिफिकेशन असतो. तरी या अनुषंगाने सर्व संबंधितांनी शाळा व्हेरिफिकेशन करताना बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जा शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरित झालेल्या शाळा आरटीई प्रवेश सत्रात समाविष्ट होणार नाही. याची खबरदारी घेण्यात याबाबतच्या सूचना शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्यावर निश्चित केलेली आहे.

## संत सतिश महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव

**लेहेगाव**- दरवर्षीप्रमाणे यावर्षीही संत बालयोगी ब्रह्मलीन सतीश महाराज यांचा २४ वा पुण्यतिथी महोत्सव नजीकच्या ग्राम वाघोली येथे विविध धार्मीक कार्यक्रमाने साजरा होत आहे.८ फेब्रुवारी रोजी रविवार ला सकाळी ७ वाजता तीर्थ स्थापना उद्धवराव तायवाडे यांच्या हस्ते होणार असून दुपारी महिला भजन मंडळ काटपुर यांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. सायंकाळी ह.भ.प. अशोकराव तायवाडे नवदुर्गा भजन मंडळ व गणेश महिला मंडळ वाघोली काटपुर व ग्रामवासी यांचे उपस्थितीत गावातून भव्य अश्या मिरवणुकीचे आयोजन केले आहे.९ फेब्रुवारी सोमवार सकाळी गुरुदेव सेवा



मंडळाचे कार्यकर्ते ग्रामसफाई करून, दुपारी ह.भ.प.श्री. हरिहर महाराज कडू रा. घोराड वारकरी भजन मंडळ, काटपुर व वाघोली यांचे मधुर वाणीतून काल्याचे किर्तन व दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात संत रामेश्वर महाराज व संत शिवनाथ महाराज यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# राज्यातील ३१ जिल्ह्यांसाठी एसटीची ‘तीर्थयात्रा’ योजना

## ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत तर महिलांना ५० टक्के सवलत

**अमरावती/का.प्र.**

अमरावती राज्य मार्ग परिवहन महामंडळाने स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीचे औचित्य साधून ‘हिंदुहृदय-सम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थयात्रा’ ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना संपूर्ण राज्यात लागू केली आहे. अमरावती विभागातील यामयोजनेत अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यांना विशेष प्राधान्यभाविकांना राज्याच्या कानाकोप-यातील भाविार्षिक सुरक्षितची संधी उपलब्ध करून दिली पर्यटनाची संधी उपलब्ध करूनरिकोना संपूर्ण मोफत प्रवास घडवला जाणार असून, महिला



व इतर ज्येष्ठांना बुलढाण्याही तिकीट दरात ५० टक्के सवलत मिळणार आहे.

या ऐतिहासिक योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा यासह मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक,अहिल्यानगर, धुळे, जळगाव, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, बीड, परभणी, धाराशिव, लातूर, जालना, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि वर्धा या सर्व ३१ विभाग नियंत्रकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक आगारातून किमान ४० प्रवाशांचा गट तयार झाल्यास ही विशेष बस सेवा उपलब्ध करून दिली जाईल. यामध्ये अष्टविनायक, ज्योतिर्लिंग, साडेतीन शक्तिपीठे, शेगावचे गजानन महाराज मंदिर, अमरावतीचे अंबादेवी-एकविरा मंदिर आणि वाशीमच्या पोहरादेवीसह राज्यातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रांचा समावेश असेल.

लालपरीच्या या तीर्थयात्रा सहलींसाठी आगाऊ आरक्षणाची सोय असून किमान ३५ जागांचे आरक्षण होणे आवश्यक आहे. जर प्रतिसादाअभावी सहल रद्द झाली तर प्रवाशांना १०० टक्के पैसे परत मिळण्याची हमी देण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अपघाती विमा संरक्षणही या योजनेत समाविष्ट असून सर्व शासकीय सवलती राज्याच्या हद्दीपर्यंत लागू राहतील.

एसटी महामंडळाने सुरू केलेल्या या योजनेमुळे आता सर्वसामान्य कुटुंबातील भाविकांना अत्यंत कमी खर्चात देवदर्शन करता येणार आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ही योजना म्हणजे एक मोठी भेट ठरली आहे. ४० प्रवाशांच्या गटाने मागणी केल्यास त्यांना त्यांच्या गावातून थेट बसची सुविधाही मिळवता येणार आहे.

प्रवाशांच्या मागणीनुसार एक किंवा त्यापेक्षा जास्त दिवसांचे मार्ग निश्चित करून अंतराप्रमाणे रास्त प्रवास भाडे आकारले जाईल. या सहलींदरम्यान मा सिटीजनाची सोय व्हावी देवस्थान ट्रस्ट आणि सस्थानिक देवस्थान स्टाय आणि सामाजिक संस्थांशी समन्वय साधून प्रवाशांना करेल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक आगार स्तरावर समन्वयक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून ते सहलींचे पूर्ण नियोजन करतील. महा-मंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. या योजनेच्या माध्धव कुसेकर यांनी या आध्यात्मिक वैभवाचा अनुभवा ज्याच्या आवाहन केले आहे.

## संक्षिप्त

### संजय वाघुळे सन्मानित



**वलगाव**-डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतरा लढ्याच्या आठवणीला उजाळा देण्यासाठी अलीकडे भारतीय दलित पँथर अमरावती जिल्ह्याच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर (इर्विन )चौक अमरावती येथे आयोजित एका कार्यक्रमात संजय वाघुळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर योद्धा म्हणून सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.अध्यक्षस्थानी विधीतज्ञ डॉ. पी.एस . खडसे, प्रमुख अतिथी खासदार बळवंत वानखडे, पूज्य भन्ते बुद्धप्रिय, पँथर नेते प्रभाकर घोडेस्वार,लक्ष्मण मेश्राम, सुधाकर पाटील, दादासाहेब क्षीरसागर, विनोद भालेराव, जयंत गवई, काशिनाथ बनसोड साहेबराव गुडसुंदरे, भारतीय दलित पँथर जिल्हाध्यक्ष प्रवीण पाटील, सचिव अजय रामटेके व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेकापुरे दाम्पत्याचा मरणोत्तर देहदानाचा निर्णय



**अमरावती**-जिल्ह्यातील सुरळी येथील व सद्यस्थितीत अमरावती स्थित महाराष्ट्र राज्याचे माजी संचालक, व्यवसाय शिक्षण तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे माजी तंत्र शिक्षण संचालक डॉ. गजानन रामभाऊ शेकापुरे व स्नेहलता गजानन शेकापुरे या उभयतांनी सामाजिक जाणिवेतून अत्यंत स्तुत्य असा देहदानाचा निर्णय घेतला आहे. दोघांनीही डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांना मरणोत्तर देहदान इच्छापत्र सुपुर्द केले. वैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अभ्यासासाठी मानवी देहाची मोठी गरज असते. आपल्या मृत्यूनंतर देह वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी उपयोगात यावा या उदात्त हेतूने त्यांनी मरणोत्तर देहदान करण्याचा संकल्प केला आहे.शेकापुरे दाम्पत्याच्या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतूक होत असून त्यांच्या या प्रेरणादायी कृतीमुळे इतरांनीही देहदानासारख्या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### भाकप कार्यालयात प्रजासत्ताक दिन

**कुऱ्हा**-भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालय, स्वा. सं. से.कॉ. लक्ष्मीकांत मुळे भवन येथे पार पडला.झेंडावंदन सामाजिक कार्यकर्ते कॉ.



मनोहर चिरडे यांचे हस्ते करण्यात आले. या ठिकाणी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले.विपरीत परिस्थितीमध्ये मुळे भवनातील अभ्यासिकेत अभ्यास करून, स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले व नोकरीवर लागले. त्यांच्या पालकांसह उचित सत्कार करण्यात आला. यामध्ये राहुल प्रकाश बावणे( केंद्रीय राखीव पोलीस फोर्स) रोशन मनोहर बावणे (आसाम रायफल) यांचा सत्कार करण्यात आला. अॅड़ अर्चना तिरमारे यांनी वकिलीची सनद घेऊन मालेगाव (वाशिम) कोर्टात वकिली सुरू करणार आहेत. यावेळी सचिव देवेंद्र बावणे , सहसचिव कॉम्रेड सलीमखा पठाण( उपसरपंच) सहसचिव कॉ. राजाभाऊ बाभुळकर( माजी उपसरपंच) यांची निवड झाल्याबद्दल,जेष्ठ कॉम्रेड यादवराव पाखरे व दिलीपसिंह नहाटे (किसान सभा) यांचे हस्ते सत्कार केला. याप्रसंगी प्रा.धनंजय पाखरे यांनी प्रजासत्ताक दिन व संविधान विषयक भूमिका मांडली.यावेळी अशोक सोनारकर,मुस्ताक भाई,लता सोनारकर,कविता तिरमारे,सुधाकर मानकर, सुधाकर वैद्य, मयुरी पाखरे, राजू पाखरे, प्रशांत लिल्लर्वे , युसुफ खान, दाऊद खान, शेख कासम, शेख जमीर ,शेख जाकीर ,आसिफ खान, अनिता गायगोले, शीला मीमरोठ ,अ. गफार,वच्छला बावणे,सुशीला पाखरे यांचेसह नागरिक सहभागी झाले होते.

# १५ फेब्रुवारीला राज्यस्तरीय बांधिलकी काव्य महोत्सव













**अमरावती/का.प्र.**

साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या बांधिलकी प्रतिष्ठान अमरावतीच्यावतीने राज्यस्तरीय भव्य काव्यमहोत्सवाचे आयोजन रविवार १५ फेब्रुवारी रोजी कांचन रिसॉर्ट, नवसारी रिंगरोड, अमरावती येथे करण्यात आले असून या काव्यमहोत्सवाच्या उदघाटनपर सत्राचे अध्यक्ष गझलकार प्रवीण बोपुलकर,संस्थापक-अध्यक्ष शब्दवेल साहित्य संघ,पनवेल, उदघाटक जेष्ठ साहित्यिक शंकर घोरसे, संस्थापक -अध्यक्ष अक्षरक्रांती फाउंडेशन नागपूर तर स्वागताध्यक्ष प्रसिद्ध उद्योजिका तथा साहित्यिक कांचनताई उल्हे, प्रमुख अतिथी जेष्ठ साहित्यिक तथा समीक्षक डॉ. शोभा रोकडे तसेच विशेष उपस्थित म्हणून भानुदास बोदडे,नितीन गावंडे, प्रविणा गावंडे आदि मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती असेल.

एकूण ७५ कविंचा सहभाग असणारा हा भव्य काव्यमहोत्सव पाच सत्रात पार पडणार असून पहिले सत्र उदघाटनाचे असेल.गजानन काकडे यांच्या उदघाटनीय कवितेने काव्यमहोत्सवाची सुरुवात होईल. प्रास्ताविक अॅड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे, संस्थापक अध्यक्ष बांधिलकी प्रतिष्ठान या करतील.संचालन प्रसिद्ध कवी अजय अडीकने तर आभार आरती नागपुरे मानतील.त्यानंतर दुसऱ्या सत्रापासून काव्यमहोत्सवाला सुरुवात होईल. काव्यप्रभा या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकर तांडेकर (प्रदत्त) नागपूर,प्रमुख अतिथी विनय दांदळे अकोला,संजीवनी काळे अमरावती,मा. विजय वासाडे नागपूर तर विकास राऊत प्रकाशक अक्षरशिल्प प्रकाशन यांची विशेष उपस्थिती असेल.संचालन प्रसिद्ध गझलकार सुयोग राजनेकर व आभार प्रदर्शन प्रसिद्ध कवी किशोर जऱ्हाड हे करतील.काव्यांजली या तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक पिलमपोयाकार पुष्पराज गावंडे, प्रमुख अतिथी प्रकाशक मेधा पब्लिकेशन तथा कादंबरीकार संजय महल्ले,सुप्रसिद्ध साहित्यिक प्रमोद भागवत, सुप्रसिद्ध कादंबरीकार विशाल मोहोड तर सचिन सुकळकर प्रकाशक ज्ञानपथ पब्लिकेशन नागपूर हे विशेष उपस्थित असतील. या सत्राचे सूत्रसंचालन प्रसिद्ध साहित्यिक हिम्मत ढाळे तर आभार वृषाली वानखडे मानतील.काव्यगंध या चौथ्या सत्राचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिका मा. डॉ. शोभा गायकवाड,प्रमुख अतिथी दिलीपसिंह खांबरे,प्रसिद्ध कादंबरीकार उद्धव शहाणे, दिवाकर देशमुख तर प्रसिद्ध कीर्तनकार तथा कवयित्री छाया पाथरे व प्रसिद्ध साहित्यिक तथा संपादक साहित्य प्रवाह मा. विशाल कन्हेरकर हे विशेष उपस्थित राहतील.

संचालन प्रसिद्ध कवी हितेश गोमासे व राजेश माहूरकर नागपूर तर आभार प्रदर्शन प्रसिद्ध कवी नयन पऱ्हाड करतील.या कार्यक्रमाच्या समारोपीय सत्राचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक सुनील यावलीकर,प्रमुख अतिथी गजानन काकडे अध्यक्ष संवेदना बहुद्देशीय संस्था, संदीप देशमुख प्रसिद्ध कवी व गझलकार तर प्रसिद्ध कवयित्री वर्षा भांदर्गे, सीमा भांदर्गे, अंजली वारकरी, वऱ्हाडी कवी खुशाल गुल्हाने यांची विशेष उपस्थिती राहील.समारोपीय सत्राचे संचालन प्रा. डॉ. मंदा नांदुरकर व आभार प्रदर्शन छाया राऊत बर्वे करतील. या कार्यक्रमात विविध कवी व कवयित्री यांचा सन्मान देखील करण्यात येईल. तसेच बांधिलकी प्रकाशन द्वारा प्रकाशित ‘काव्यप्रभा’ व ’लेखणीतील मैत्री’ या प्रातिनिधिक कवितासंग्रहांचे प्रकाशन देखील करण्यात येइल. साहित्यिक व रसिकांनी या भव्य अशा काव्यमहोत्सवाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक बांधिलकी प्रतिष्ठान व बांधिलकी प्रकाशन तसेच संयोजक अॅड डॉ. नीता प्रफुल्ल कचवे, संस्थापक अध्यक्ष बांधिलकी प्रतिष्ठान तसेच बांधिलकी प्रकाशन अमरावती यांनी केले आहे.

# कालसुसंगत पाऊल



**भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंता नागेश्वरन यांनी यंदाच्या देशाच्या वार्षिक आर्थिक पाहणी अहवालात सोशल मीडियाच्या वापरासाठी वयोमर्यादेची अट असावी, अशी सूचना केली आहे. तत्पूर्वी, आंध्र प्रदेश या राज्यानेही याबाबत कायदेशीर तरतुदी करण्यासंदर्भात चर्चा सुरू केली आहे.**

तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात आज प्रत्येक व्यक्तीच्या हातात स्मार्ट फोन स्थिरावला आहे. संवादाचे माध्यम म्हणून सुरू झालेली समाजमाध्यमे आता मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत; मात्र या तांत्रिक प्रगतीची एक गडद बाजू आता प्रकर्षाने समोर येत असून ती म्हणजे 'डिजिटल व्यसन'. विशेषतः लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये या व्यसनाचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. याच पार्श्वभूमीवर भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंता नागेश्वरन यांनी यंदाच्या देशाच्या वार्षिक आर्थिक पाहणी अहवालात एक अत्यंत महत्त्वाचा आणि धाडसी सल्ला सरकारला दिला आहे. समाजमाध्यमांच्या वापरासाठी वयाची अट निश्चित करण्याची वेळ आता आली असून लहान मुलांना या आभासी जगापासून दूर ठेवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

भारतासारख्या खंडप्राय देशात जिथे मेटा आणि यूट्यूब यांसारख्या प्लॅटफॉर्मसाठी सर्वात मोठी वापरकर्ता बाजारपेठ उपलब्ध आहे, तिथे अशाप्रकारच्या निर्बंधांची चर्चा होणे ही बाब जागतिक स्तरावरदेखील मोठा चर्चेचा विषय ठरणारी आहे. आर्थिक पाहणी अहवालात केवळ आकड्यांची जुळवाजुळव नसते, तर देशाच्या सामाजिक आरोग्याचा आरसाही त्यात प्रतिबिंबित होत असतो. नागेश्वरन यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे की, तरुण वापरकर्ते हे सक्तीच्या वापरास आणि हानिकारक मजकुरास अधिक बळी पडण्याची शक्यता असते. त्यामुळे वयावर आधारित प्रवेश मर्यादा विचारात घेणे ही काळाची गरज बनली आहे. जागतिक स्तरावर पाहिले, तर भारत अशाप्रकारचा विचार करणारा पहिला देश नाही. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदी लागू करून जगात एक नवा पायंडा पाडला आहे. त्याचप्रमाणे फ्रान्सच्या नॅशनल असेंब्लीने नुकताच १५ वर्षांखालील मुलांवर सोशल मीडिया बंदी घालणाऱ्या कायद्याला पाठिंबा दिला आहे. ब्रिटन, डेन्मार्क, स्पेन आणि ग्रीस यांसारखे प्रगत देशही सध्या या विषयावर सखोल अभ्यास करत आहेत. भारतानेही या जागतिक प्रवाहाशी सुसंगत पावले उचलल्यास तो एक ऐतिहासिक निर्णय ठरेल; मात्र भारताची लोकसंख्या आणि येथील तांत्रिक साक्षरतेचे प्रमाण पाहता अशा कायद्याची अंमलबजावणी करणे हे एक मोठे आव्हान असणार आहे.

आर्थिक सल्लागारांनी केवळ बंदीचा मार्ग सुचवलेला नाही, तर त्यांनी कौटुंबिक स्तरावर काही बदलांची शिफारस केली आहे. मुलांचा स्क्रीन टाईम मर्यादित करणे, दिवसातील काही तास उपकरणांशिवाय व्यतीत करणे आणि कुटुंबासोबत ऑफलाईन उपक्रमांमध्ये सहभागी होणे या गोष्टींना प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. आजची मुले मैदानी खेळांपेक्षा मोबाईलमधील आभासी खेळांमध्ये अधिक रमत आहेत. महानगरांमध्ये तर ही समस्या अधिक प्रमाणात दिसून येते. कारण, इथे खेळण्यासाठी मैदाने, उद्याने यांची वानवा आहे. तसेच गावकुसामध्ये असणाऱ्या गल्ल्यांमध्ये ज्याप्रमाणे मुले-मुली एकत्र येतात तशी रचना शहरांमध्ये दिसत नाही. परिणामी, अनेक मुले एकटेपणाने आपापल्या घरात, बंगल्यात गुदमरत जगतात. अशावेळी त्यांना सोशल मीडिया हा जवळचा मित्र वाटणे स्वाभाविक असते; पण यामुळे त्यांच्या शारीरिक विकासासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहेत. सततच्या नोटिफिकेशनमुळे लक्ष विचलित होणे, एकाग्रतेचा अभाव आणि समाजमाध्यमांवरील इतरांच्या झगमगाटी आयुष्याची तुलना स्वतःच्या आयुष्याशी केल्यामुळे येणारे नैराश्य हे सध्याच्या पिढीतील मुख्य प्रश्न बनले आहेत.

समाजमाध्यम कंपन्यांसाठी भारत ही एक सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. गुगल, मेटा आणि एक्स यांसारख्या कंपन्यांनी या प्रस्तावावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही; परंतु सरकारने वयोमर्यादेचा नियम लागू केला, तर या कंपन्यांच्या वापरकर्त्यांच्या संख्येत मोठी घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व्यवसायापेक्षा मानवी मूल्ये आणि लहान मुलांचे भविष्य महत्त्वाचे आहे, हे ठामपणे सांगण्याची हीच वेळ आहे. केवळ कायदे करून हे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी समाजात व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. पालकांनीही आपल्या पाल्याच्या हातात मोबाईल देताना त्याच्या परिणामांचा गांभीर्याने विचार करणे अपेक्षित आहे. काही दिवसांपूर्वी आंध्र प्रदेशचे मंत्री नारा लोकेश यांनी नुकतीच एक बैठक घेऊन ई-केवायसीसारख्या तांत्रिक उपायांचा वापर करून वयोगट निश्चित करण्याबाबत चर्चा केली आहे.

राज्य सचिवालयात पार पडलेल्या 'सोशल मीडिया उत्तरदायित्व सक्षमीकरण' या विषयावरील मंत्रिगटाच्या बैठकीत मुलांच्या मानसिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि सोशल मीडियाच्या दुष्परिणामांपासून त्यांना दूर ठेवण्यासाठी कठोर नियमावली तयार करण्यावर भर देण्यात आला. सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, मलेशिया आणि फ्रान्स यांसारख्या देशांमध्ये अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर असलेल्या बंदीच्या कायद्यांचा अभ्यास करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. आंध्रचे नागरी पुरवठामंत्री नादेंडला मनोहर यांनी सुचवले की, १६ वर्षांवरील व्यक्तींनाच 'ई-केवायसी' लिंकद्वारे सोशल मीडिया वापरण्याची परवानगी द्यावी. यासाठी 'माय डिजिटल आयडी' आणि पासपोर्टमधील तपशील वापरले जाऊ शकतात. प्रस्तावित नियम हे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या चौकटीत राहूनच तयार केले जाणार आहेत.

नारा लोकेश यांनी केवळ मुलांच्या सुरक्षिततेवरच नाही, तर सोशल मीडियावरील वाढत्या विकृतीवरही भाष्य केले. पुढील बैठकीत गुगल, मेटा, एक्स आणि इतर संस्थांच्या अनुपालन अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्याचे ठरले आहे. राज्य स्तरावर असे प्रयत्न यशस्वी झाले, तर केंद्र सरकारला राष्ट्रीय स्तरावर धोरण आखणे सोपे जाईल.

**अंजली महाजन**

## टीनेज मुलांशी वागण्याच्या प्रभावी स्ट्रॅटेजी

मुलांना स्वतः कमाई करण्यासाठी प्रोत्साहन द्या. त्यांना वस्तूची किंमत कळायला हवी असे जर तुम्हाला वाटत असेल, तर एखादा आठवडा मुलांना घराची छोटीशी का होईना आर्थिक जबाबदारी सोपवू शकता. मुलांना पुढील महिन्यात घेऊ इच्छिणाऱ्या आवडत्या वस्तूच्या खरेदीसाठी किमान २५ ₹ रकमेची बचत करायला सांगू शकता. आपण मुलांना वारेमाप खेळणी, गॅजेट्स, वस्तू घेऊन देत असू, तर मग हळूहळू त्यांना हा आपला हक्कच आहे असे वाटू शकते. यासाठीच मुलं टीनेजमधील असल्याने सुट्टयांमध्ये माफक प्रमाणात काम व कमाई करू देत म्हणजे कामाचे कष्ट आणि पैशाची कमाई याचे महत्त्व मुलांना कळेल.

मुलांना अपयशी होऊ द्या.खूप पालकांना हे वाक्य ऐकायला आणि पचवायला जड जाईल. पण या जगात कसं जगलं पाहिजे, नाही तर कोणते परिणाम होऊ शकतात, या गोष्टींची जाणीव मुलांना व्हायलाच हवी. याशिवाय परिस्थितीशी जुळवून कसे घ्यायचे याचं भान त्यांना येणार नाही. जेव्हा तुम्हाला हे दिसू लागेल की ते परिस्थितीशी झटापट करत आहेत तेव्हा जरूर तुम्ही त्यात उडी घ्या, त्यांना मदत करा. उदाहरणार्थ अभ्यासातील ग्रेड्स मिळवण्यासाठीच्या अडचणी किंवा वागण्याचे प्रश्न याबाबत तुम्ही त्यांना मदत करू शकता. पण अपयश आले तर काय परिणाम होतात तेही त्यांना कळूच दे. कारण सतत मदत करण्याने आपण त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी अडथळे तयार करत असतो हे लक्षात ठेवा. अपयश हा प्रॉब्लेम सोडवण्यासाठी मुलांना तयार करणारा एक असा मार्ग आहे जो त्यांच्या कृतीच्या, वागण्याच्या परिणामांची जाणीव मुलांना देतो. म्हणून अपयशाकडे सकारात्मक पद्धतीने बघा. आपण प्रयत्न केले नाहीत, योग्य तो सराव केला नाही तर त्याचे परिणाम काय होऊ शकतात हे कळले की मग मुलं योग्य त्या पद्धतीने रोज अभ्यास करू लागतील

घरातील जबाबदाऱ्या आणि मुलांची सेल्फ सफिशियन्सी मुलांवर सोपवायला हवी. यासाठी मुलांना उत्तेजन द्यायला हवं. या वयातील मुलं स्वतःहून मोटिवेट होत नाहीत. कधी कधी तर ती आपल्याला चक्क आळशी वाटतात. काही वर्षांनंतर तुमची ही पाखरे आपल्या घरट्यातून दूर उडून जाणार आहेत. तत्पूर्वीच आपण त्यांना स्वतंत्र जगात जगण्याची कौशल्ये शिकवणं आवश्यक आहे. मगच ते पुढे आत्मविश्वासाने जाऊ शकतील. स्वतःची काळजी घेऊ शकतील. आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीबाबत आपण अकाउंटेबल आहोत याची जाणीव त्यांना द्या. एवढंच नव्हे तर या गोष्टींची जबाबदारी न घेतल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव द्या. एका विशिष्ट वयानंतर किंबहुना वयाच्या प्रत्येक टप्प्यावर मुलांना कामं सोपायलाच हवीत. मुलं आळशीपणा करतात, कामचुकारपणाने वागतात म्हणून त्यांच्या मागेही लागावं लागतं. पण किती दिवस आपण मुलांचे काम करणार आहोत. सगळं आयतं हातात देणं, रूम सर्विस देणं

## 'संघाचे संस्कार आणि राजकारण' फरक समजून घेण्याची गरज

भारतीय लोकशाहीतील सार्वजनिक चर्चा विश्वात काही शब्द नेहमीच एकत्र वापरले जातात आणि त्यातून गैरसमज अधिकच दृढ होत जातात.संघ आणि राजकारण ही त्यातीलच दोन उदाहरणे. अनेकदा या दोन संकल्पनांची सरमिसळ करून चर्चेला सोपे वळण दिले जाते. मात्र वस्तुस्थिती पाहिली, तर संघाचे संस्कार आणि राजकारण यांचा स्वभाव, उद्देश आणि कार्यक्षेत्र मूलभूतरीत्या वेगळे आहे. हा फरक समजून घेतल्याशिवाय कोणतीही प्रामाणिक वैचारिक चर्चा पूर्ण होऊ शकत नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली झाली, तेव्हा देश गुलामगिरीत होता. समाज विखुरलेला, आत्मविश्वास हरवलेला आणि संघटनेच्या अभावाने त्रस्त होता. अशा परिस्थितीत १९२५ ला संघाचा जन्म सत्तेसाठी नव्हे, तर समाजघडणीसाठी झाला. व्यक्तीमध्ये राष्ट्रभावना, शिस्त, त्याग आणि सामाजिक जबाबदारी रुजवणे हेच संघाचे केंद्रबिंदू राहिले. म्हणूनच संघाने सुरुवातीपासून स्वतःची ओळख सांस्कृतिक आणि सामाजिक संघटना म्हणूनच करून दिली.

संघाचे संस्कार म्हणजे नेमके काय? संघ हा मूलतः सांस्कृतिक व सामाजिक संघटन आहे. संघ शाखेतून होणारे दैनंदिन कार्य व्यक्तीच्या चरित्रनिर्मितीवर केंद्रित असते.



शारीरिक, बौद्धिक आणि सामाजिक अशा तिन्ही पातळ्यांवर स्वयंसेवक घडवण्याचा प्रयत्न येथे होतो. संघ शाखेत स्वयंसेवकाला मतदान कसे करायचे हे नाही, तर जबाबदार नागरिक कसे व्हायचे हे शिकवले जाते. येथे अधिकारांची भाषा नसते; कर्तव्याची भाषा असते. प्रसिद्धीचा मोह नसतो; कामाची सवय असते. सत्ता मिळवण्याची हाव नसते; समाजासाठी झटण्याची तयारी असते.संघाच्या कार्यपद्धतीत सत्ता, निवडणूक, पक्षीय गणित किंवा धोरणात्मक राजकीय व्यवहार यांना स्थान नाही. 'प्रथम माणूस घडवा, मग समाज आपोआप घडेल' ही संघाची मूलभूत धारणा आहे.

याउलट राजकारणाचा स्वभाव पूर्णतः वेगळा आहे. राजकारण हे सत्ताकेंद्रित असते. निवडणुका, पक्षीय स्पर्धा, सत्ता मिळवणे व ती टिकवणे, प्रशासनावर नियंत्रण ठेवणे आणि धोरणांची अंमलबजावणी करणे हे राजकारणाचे मुख्य उद्दिष्ट असते. येथे तडजोड, विरोध, प्रचार,आरोप-प्रत्यारोप हे अपरिहार्य घटक असतात. राजकारण तात्कालिक निर्णयांवर चालते, तर समाजसंस्कार दीर्घकालीन प्रक्रियेतून घडतात. हा एवढा स्पष्ट फरक असूनही संघ आणि राजकारण यांचा उल्लेख एकत्र का केला जातो, हा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे संघातून घडलेले अनेक स्वयंसेवक पुढे समाजजीवनातील विविध क्षेत्रांत कार्यरत झाले. शिक्षण, प्रशासन, वैद्यकीय सेवा आणि राजकारण त्यामध्ये सर्वत्र संघसंस्कार लाभलेली माणसे कार्यरत असल्याचे दिसून येते.त्यापैकी काहींनी राजकारणाचा मार्ग निवडला आणि त्यामुळे संघाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाला.

संघाचे संस्कार आणि राजकारण यातील फरक अधोरेखित करणारे हे एक बोलके उदाहरण.गेल्या महानगरपालिका निवडणुकीत अनेक स्वयंसेवकांनी समाजासाठी काम करण्याच्या भावनेतून निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविली. काहींना संधी मिळाली आणि त्यांनी उमेदवारी स्वीकारली; तर काहींना पक्षाकडून तिकीट नाकारण्यात आले.परंतु येथेच संघसंस्कारांचे खरे रूप दिसून आले. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही, त्यांनी कुठेही राग, असंतोष किंवा बंडखोरी दाखवली नाही. न मोर्चे काढले, न आरोप-प्रत्यारोप केले, न माध्यमांमध्ये गोंधळ घातला. उलट, वरिष्ठांच्या निर्णयाला शिस्तबद्धपणे स्वीकारून त्यांनी संघटनेच्या हिताला स्वतःच्या महत्त्वापेक्षा वर मानले.आजच्या राजकारणात जिथे तिकीट न मिळाल्यावर बंडखोरी, अपक्ष उमेदवारी आणि सार्वजनिक नाराजी ही सामान्य गोष्ट बनली आहे, तिथे हा संयम आणि निष्ठा संघसंस्कारांचे वेगळेपण ठळकपणे दाखवून देतात. स्वतःपेक्षा संघ मोठा मानण्याची ही वृत्ती म्हणजेच संघाची खरी ताकद आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे संघाचे कार्य निवडणूक चक्रांवर अवलंबून नसते. सरकार बदलले तरी संघाचे दैनंदिन काम अखंड सुरू राहते. आपत्तीग्रस्त भागात सेवा, आरोग्यसेवा, सामाजिक उपक्रम ही सर्व कामे स्वयंसेवक सातत्याने करीत असतात. येथे श्रेयपत्र नसते, जाहिरात नसते, छायाचित्रांची हौस नसते. हाच संघाचा संस्कार आहे, जो राजकीय गणितांपलीकडे जातो.शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, संघ हा राजकारणाचा शॉर्टकट नाही आणि राजकारण हे संघाचे अंतिम ध्येय नाही. संघाचे काम माणूस घडवणे आहे; राजकारणाचे काम व्यवस्था चालवणे आहे. हा फरक न समजल्यामुळेच मुद्दाम पसरवलेले गैरसमज सत्य मानले जातात. आणि जेव्हा गैरसमज सत्य बनतात, तेव्हा लोकशाही संवाद हरवतो.

**जय राणे,** अकोला
मो.९१३०४७७१४५

## भयमुक्त परीक्षा

**फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या लेखी परीक्षा सुरू होत आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांना भयमुक्त व आत्मविश्वासपूर्ण वातावरण मिळणे गरजेचे आहे. अभ्यास, योग्य मार्गदर्शन, पालक-शिक्षकांचा सकारात्मक सहभाग आणि मानसिक स्वास्थ्य यांचा समतोल साधल्यास विद्यार्थी निर्धास्तपणे परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादन करतील.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सुरू होत आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच दक्षता समिती व भरारी पथकांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली आहे. असे असले तरी परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा देणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचा उत्साह वाढवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

भयमुक्त म्हणजे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील केलेला अभ्यास अतिशय महत्त्वाचा असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित जाऊन नियमितपणे अभ्यास केलेला असेल त्यांना परीक्षेचे भय वाटणार नाही. असे विद्यार्थी आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. जे विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करतात असे विद्यार्थी जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे तणावाखाली येत असतात. त्यामुळे त्यांना परीक्षेला जाताना भय वाटत असते. याला कारणं सुद्धा अनेक असतील. मात्र विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास महत्त्वाचा असतो. शाळा सुरू झाल्यापासून विद्यालयामध्ये जसा अभ्यास शिकवून झालेला असेल त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास एके अभ्यास जरी केला तरी आपण एक विद्यार्थी आहोत, आपल्यासाठी कोणीतरी परिश्रम करीत आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांचे विचार शिक्षणाशी निगडित असावेत. शिक्षणामुळेच आपण मोठे होऊ शकतो याची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हायली हवी. महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीचे वेळेवर जेवण घ्यावे. व्यायाम करावा, खेळ व पुरेशी झोप घ्यावी. मात्र अति विचार टाळावेत. अनाठायी वेळ वाया घालवू नये. त्यात मध्ये टी. व्ही.वरील कार्यक्रम व बातम्या पाहाव्यात यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडत असते. असे नियमित करायला हवे. हीच



खरी यशाची गुरुकिल्ली असते. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवणे गरजेचे असते. मन शांत ठेवल्याने अभ्यासामध्ये मन रमते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती आपोआप निघून जाते. खोडकर मित्रांचा नाद सोडून चांगल्या मित्रांच्या सहवासात राहावे. मोबाईलला चार हात दूर ठेवावे. आवश्यक कामासाठी मोबाईलचा वापर करावा. याचा परिणाम परीक्षेची तयारी झाल्याने विद्यार्थी हसत हसत आनंदाने परीक्षेला जातात. बरेच विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा केल्याने परीक्षेच्या कालावधीत मानसिक तणावाखाली दिसतात. याचा परिणाम आपण काय करावे काय करू नये याचा विचार करीत विद्यार्थी असतात. अशावेळी त्यांच्या मनातील भीती घालविण्यासाठी किंवा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्याला तसेच त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे गरजेचे आहे. परीक्षेपूर्वी प्रत्येक विद्यालयांनी किंवा एकत्रितपणे मानसोपचार तज्ज्ञांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात यावेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होते.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असतात. या दोन्ही परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा ठरत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या भयातून मुक्त करायला हवे. हेच विद्यार्थी देशाचे सुजाण नागरिक बनणार आहेत. वर्षे, महिने आणि आता काही दिवस परीक्षेला शिल्लक राहिले आहेत. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची दिशा या परीक्षांवर अवलंबून असते. आता बारावीच्या परीक्षेला १० दिवस आणि दहावीच्या परीक्षेला २० दिवस आहेत. वर्षभर आपण काय केले? किती तास अभ्यास केला? मार्गदर्शक कोण होते? गंमती जंमती काय केल्या? हे सर्व बाजूला ठेवावे. विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याचा विचार करून परीक्षेचे वेळापत्रक डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासाची उजळणी करावी. त्याचप्रमाणे लिहिण्याचा सरावही नियमित करावा. आतापर्यंत आपल्याला प्रत्येक विषयात किती गुण मिळाले याची चर्चा करू नये. आता एकच लक्ष अंतिम परीक्षा. दिलेल्या वेळेत विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे लिहिणे. ती सुद्धा उत्तरपत्रिकेत खाडाखोड न करता. मनामध्ये कोणत्याही प्रकारचे दडपण न घेता. प्रश्नाच्या उत्तराच्या महत्त्वाच्या वाक्याखाली लाईन मारणे. प्रश्न नवीन पानावर सोडविणे. याची पूर्व सूचना शाळा सुरू झाल्यावर प्रश्नाचे उत्तर कसे लिहावे. प्रश्नपत्रिका कशी सोडवावी याविषयी अध्यापकांनी ज्या सूचना दिल्या असतील त्याचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही प्रकारचे दडपण घेऊ नये.

मन प्रसन्न ठेवून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या वेळेत लिहून पूर्ण करावीत. परीक्षेच्या कालावधीत भीतीविरहित विद्यार्थ्यांच्या मनात वातावरण निर्माण केले पाहिजे. यासाठी परीक्षेच्या कार्यकाळात वातावरण निर्मिती अतिशय महत्त्वाची असते. तरच विद्यार्थी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला भयमुक्त परीक्षेला सामोरे जाऊन परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करू शकतात.

**रवींद्र तांबे**

## परीक्षा कॉपीमुक्त होणार का ?

राज्यात बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. प्रत्येकाच्या शैक्षणिक जीवनात या दोन्ही परीक्षा अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात. नोकरीकरिता 'बायोडेटा' बनवताना त्यामध्ये दहावी आणि बारावीची टक्केवारी नमूद करण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. या परीक्षेतील टक्केवारीनुसार माणसाच्या बौद्धिक क्षमतेची कल्पना 'बायोडेटा' पाहणाऱ्याला येते.यंदाच्या या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे सरकार राज्यभर मोहीम राबवणार आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे आदेश संबंधितांना दिले आहेत.

परीक्षा केंद्रांवर नजर ठेवणासाठी ड्रोनचाही वापर केला जाणार आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत अशा ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडल्यास तत्परतेने गुन्हा नोंदवण्यात येणार आहे.

या दोन्ही परीक्षांच्या कालावधीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कॉपी केली जाते, कॉपी करणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणारे त्यांचे हितचिंतक कॉपी करण्याच्या आणि कॉपी पुरवण्याच्या विविध क्लुप्त्या शोधून काढतात.मुलांचे वय हे संस्कारक्षम असते. लहान वयात होणारे संस्कारच त्यांचे भवितव्य ठरवत असतात. शालेय जीवनात परीक्षेत कॉपी करून



उत्तीर्ण होण्याची सवय जडलेले महाभाग पुढील आयुष्यातही यश मिळवण्यासाठी 'शॉर्टकट'चा किंवा गैरमार्गाचा अवलंब करू पाहतात. पौगंडावस्थेत असतानाच कॉपी करण्याची सवय लागल्याने भविष्यात असे करण्यात काही चुकीचे आहे असेही त्यांना कधी वाटत नाही. कॉपी केल्यामुळे आपण परीक्षा उत्तीर्ण होऊ मात्र पुढील व्यवहारिक जीवनात परीक्षेचे प्रसंग हे पदोपदी येणार आहेत त्यावेळी आपल्या बुद्धिमत्तेची आणि विवेकाची कसोटी लागणार आहे, तेव्हा आपल्याला कोण साहाय्य करणार? कॉपी करणे म्हणजे निव्वळ आपल्या स्वार्थासाठी गैरमार्गाचा अवलंब करणे. कॉपी करणे म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर प्रामाणिकपणे आणि नेटाने अभ्यास केला आहे त्यांच्यावर अन्याय करणे. कॉपी करणे म्हणजे स्वतःला गुन्हेगारीची सवय लावून घेणे. कॉपी करणे म्हणजे मेहनतीला डावलून शॉर्टकट शोधण्याची सवय अंगीकारणे . वर्षभर अभ्यास करून परीक्षेला आनंदाने सामोरे जाणे ही नैतिकता आहे, तर वर्षभर उनाडक्या करून ऐन परीक्षेच्या काळात अभ्यास झाला नाही म्हणून कॉपी सारख्या गैरमार्गाचा अवलंब करणे ही अनैतिकता आहे.पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत असला तरी मानसिक आणि भावनिक विकासासाठी तसेच योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता येण्यासाठी शालेय जीवनात नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे.

आजमितीला हा विषय शिकवण्याकरिता अनेक शाळांनी शिक्षकच नियुक्त केलेले नाहीत. बऱ्याच शाळांमध्ये या विषयाच्या तासिकेत विद्यार्थ्यांना अन्य विषय शिकवले जातात, एकूणच या विषयाला शाळांकडून दुय्यम स्थान देण्यात येत आहे. बालपणापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि अनैतिक गोष्टींविषयी सजगता आली की मुले कॉपीसारख्या कुप्रथेच्या आहारी जाणार नाहीत.

**जगन घाणेकर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# शेतकऱ्यांच्या आर्थिक बळकटीकरणासाठी पांदन रस्ते योजनेची काटेकोर अंमलबजावणी करा

## आमदार रणधीर सावरकर यांचे स्पष्टनिर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील शेतकऱ्यांचा विकास केंद्रस्थानी ठेवत मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांदन रस्ते योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतातील शिवदांड रस्ते, गाव ते गाव जोडणारे तसेच शेतात जाणारे रस्ते विकसित करून शेतकऱ्यांचे आर्थिक बळकटीकरण करण्याचा शासनाचा उद्देश आहे. ही योजना प्रभावी व पारदर्शकपणे राबविण्याच्या सूचना आमदार रणधीर सावरकर यांनी दिल्या.



योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात उपविभागीय अधिकारी, अकोला यांच्या कार्यालयात सर्व संबंधित विभागांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. महसूल व वन विभागाच्या १५ डिसेंबर २०२५ व ७ जानेवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विधानसभा क्षेत्रनिहाय समिती गठित करण्यात आली असून अकोला पूर्व मतदारसंघाच्या समितीची पहिली बैठक आमदार रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीच्या प्रारंभी मौजे दहीगाव व भौरद येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी स्व. नाईक व स्व. ईश्वर धनवे यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून प्रत्येकी एक लाख रुपयांचे सानुग्रह अनुदानाचे धनादेश आमदार सावरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यानंतर अकोला पूर्व मतदारसंघातील अकोला व अकोट तालुक्यातील शेत पांदन रस्त्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गाव नकाशावर दर्शविलेले ६१८ व नकाशावर नसलेले १२८ असे एकूण ७४६ रस्ते निवडण्यात आले असून, या सर्व रस्त्यांचे सीमांकन तातडीने करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याच्या सूचना आमदार सावरकर यांनी महसूल अधिकाऱ्यांना दिल्या.

शेत पांदन रस्त्यांच्या विकासाचा रोडमॅप तयार करण्यात आला असून अंमलबजावणीदरम्यान प्राधान्यक्रम निश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. ज्या रस्त्यांवर अतिक्रमण नाही, जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ होणार आहे तसेच रुंदी अधिक आहे, अशा रस्त्यांची प्रथम टप्प्यात निवड करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले. पहिल्या टप्प्यात किमान २०० रस्ते निवडून त्यापैकी २५ टक्के रस्त्यांचे काम जिल्हा परिषद, २५ टक्के पंचायत समिती व ५० टक्के पंतप्रधान ग्रामसडक योजनेमार्फत करण्यात यावे, असे ठरविण्यात आले. लोकसंख्येच्या निकषानुसार २ हजार लोकसंख्येपर्यंत एक रस्ता, २ ते ३ हजार लोकसंख्येसाठी दोन, ३ ते ४ हजारसाठी तीन आणि ५ हजारांहून अधिक लोकसंख्येच्या गावांसाठी चार रस्ते निवडण्याचा मार्गदर्शक निकष असला तरी, गाव जोडणारे व अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ देणारे रस्ते प्राधान्याने घ्यावेत, असे आमदार सावरकर यांनी स्पष्ट केले. रस्ते बांधकामासाठी लागणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचा वास्तववादी अंदाज तयार करण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. शासनाने प्रतिकिलोमीटर १५ लाख रुपयांची मर्यादा ठरविली असली तरी जिल्ह्यातील काळ्या मातीचा भाग लक्षात घेता खर्च वाढण्याची शक्यता असून, प्रत्यक्ष खर्चाचा अंदाज घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल, असेही आमदार सावरकर यांनी सांगितले. तसेच रस्त्यांच्या निवड प्रक्रियेत प्रत्येक महसूल मंडळातून किमान एक अनुभवी व तज्ज्ञ शेतकऱ्याचा समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी अकोला शरद जावळे, उपविभागीय अधिकारी अकोट लोणारकर, पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे अधीक्षक अभियंता जवंजाळ, तहसीलदार झाल्टे, तहसीलदार अकोट, प्रभारी गटविकास अधिकारी पाटेकर, पोलीस विभागाचे सुदर्शन पाटील, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जयंत मसने, राजेश बेले, अंबादास उमाळे, गिरीश जोशी, संजय कोरडे, अंकुश इंगळे, माधव मानकर, विभाग माहोरे, प्रवीण गावंडे, नारायण बोर्डे आदी उपस्थित होते.

# महापौर शारदा खेडकर व उपमहापौर अमोल गोगे यांनी स्वीकारला पदभार



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या शहर सुधार समितीच्या महापौर व उपमहापौरांनी आज विधिवतरीत्या आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. अकोला महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर शारदा खेडकर तसेच उपमहापौर अमोल गोगे यांच्या पदभार स्वीकार सोहळ्यानिमित्त महानगरपालिका परिसरात औपचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे आ. वसंत खंडेलवाल, माजी महापौर विजय अग्रवाल, जयंत मसने, हरीश भाई अलीमचंदानी, सुहासिनी धोत्रे, सौ. सावरकर, यांच्यासह भाजपाचे नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार ) गटाचे रफीक सिद्दीकी, सैयद वसीम, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, प्रदेश संघटन सचिव जावेद झकरिया, महानगर कार्याध्यक्ष देवानंद ताले तसेच अल्ताफ खान यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त महापौर व उपमहापौरांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर महापौर शारदा खेडकर व उपमहापौर अमोल गोगे यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिक सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता व पारदर्शक प्रशासनाला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. अकोला शहराच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमातून शहर सुधार समितीच्या कामांना गती देत अकोला महानगरपालिकेच्या विकासासाठी सकारात्मक दिशेने कार्य करण्याचा संदेश देण्यात आला.

# अकोला बार असोसिएशन अध्यक्ष पदाकरता ॲड. एस.ए. देशमूख यांची उमेदवारी दाखल



■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्रातील ख्यातनाम अशा अकोला विधीज्ञ संघाच्या अर्थात अकोला बार असोसिएशनच्या सार्वत्रिक निवडणुकीत अध्यक्षपदासाठी ॲड. एस. ए. देशमूख यांनी आपली उमेदवारी दाखल केली आहे .

येत्या १३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या अकोला बार असोसिएशनच्या सार्वत्रिक निवडणुकीत अध्यक्ष पदाकरता उमेदवार म्हणून ॲड.एस.ए. देशमूख प्रथमच प्रस्थापितांविरुद्ध विधीज्ञांच्या प्रलंबित मागण्या आणि विकासासाठी लढत देणार आहेत . ज्येष्ठ विधिज्ञांच्या आशीर्वादाने आणि सहयोगी विधीज्ञांच्या शुभेच्छांनी सदर निवडणुकीमध्ये बदलाचे वारे वाहू लागले आहेत . यंदा बदल नक्की होणार या दृढ विश्वासासह विधीज्ञ संजय देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत आत्मविश्वासाने सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे .

# वीजबिल भरणार नाही, तर वीजही मिळणार नाही!

## ६ हजार थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

**अकोला :** अकोला परिमंडळाअंतर्गत महावितरणने वीजबिल थकबाकीदारांविरुद्ध धडक मोहीम सुरू केली असून वीजबिल भरणार नाही, तर वीजही मिळणार नाही, अशी कठोर भूमिका घेत वारंवार आवाहन करूनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या अकोला, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील ६ हजार ३८७ ग्राहकांचा वीजपुरवठा जानेवारी महिन्यात खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी बिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.



अकोला परिमंडळात वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरण समोर आर्थीक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अकोला, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील लघुदाब वर्गवारील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक व इतर वर्गवारीतील ११ लाख ६७ हजार १८२ ग्राहकांकडे जानेवारी महिन्याचे चालू बिल पकडता ३४५ कोटी रूपयाची थकबाकी होती. त्यापैकी जानेवारी महिन्यात ११२ कोटी रूपये वसूल झाले आहे, अद्याप २३३ कोटी थकीत आहे. यात अकोला जिल्ह्यातील ४ लाख १६ हजार ३३७ ग्राहकांकडे १२६ कोटी ६३ लाख, वसूल मात्र ४६ कोटी ४५ लाख रूपये, बुलडाणा जिल्ह्यातील ५ लाख २९ हजार ६८२ ग्राहकांकडे १५९ कोटी ७२ लाख एकुण थकबाकी आणि वसूली ४६ कोटी ३१ लाख, वाशिम जिल्ह्यातील २ लाख २१ हजार १६३ ग्राहकांकडे ५८ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी असतांना जानेवारी महिन्यात केवळ १८ कोटी ९५ लाख रूपयेच वसूल झाले आहे. वारंवार आवाहन करूनही अनेक ग्राहकांनी वीज बिल न भरल्याने महावितरणच्या थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे महावितरणने कठोर भूमिका घेत आता थकबाकीदारांची वीज जोडणी खंडित करण्याची धडक मोहीम सुरू केली आहे. जानेवारी महिन्यात अकोला जिल्ह्यातील १ हजार ३२१, बुलडाणा जिल्ह्यातील ४ हजार ३५२ आणि वाशिम जिल्ह्यातील ७१४ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

# नरनाळा महोत्सव आता १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान

■ प्रतिनिधी | अकोला ■

नरनाळा महोत्सवासाठी आता दि. १५ ते १७ फेब्रुवारी या तारखा निश्चित करण्यात आल्या असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समावेशासह महोत्सव घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे सांगितले.

महोत्सवातून सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. उत्सवात नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे.

महोत्सवात प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. 'चला हवा येऊ द्या', 'शिवशंभू गर्जना', तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची 'लाईव्ह



कॉन्सर्ट' असे नामवंत कलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे. त्याचप्रमाणे, निसर्ग निर्वाचन संकुल, शहानुर येथे जंगल सफारी, ट्रेकिंग, व्हॅली क्रॉसिंग, रॅपलिंग, बोटिंग व झॉर्बिंग वॉटर बॉलचे आयोजन पोपटखेड धरण येथे करण्याचे नियोजन आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वतयारी करावी. विविध माध्यमांद्वारे माहिती सर्वदूर पोहोचवावी. ऐतिहासिक वैभव व वनसमृद्धी लाभलेला नरनाळा किल्ला अकोला जिल्ह्याचे भूषण असून, जिल्ह्यातील नागरिकांनी अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

# महानिर्यात कार्यशाळेद्वारे सूक्ष्म व लघु उद्योजकांना मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान देणा-या सूक्ष्म व लघु उद्योग क्षेत्रावर भर देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याचा उद्देश ठेवून जिल्हा उद्योग केंद्रातर्फे 'महानिर्यात इग्नाईट कार्यशाळा' आज हॉटेल आर. जी. एक्सक्लुसिव्ह येथे घेण्यात आली.

अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते कार्यशाळेचा शुभारंभ झाला. उद्योग सहसंचालक रंजना पोळ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, संकेत निनावे, श्री. रूनालिया, श्रद्धा टेकाम, आकाश ढगे, निर्यात तज्ज्ञ अंकित गुप्ता, अकोला औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल आदी उपस्थित होते. राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम राबविणे व निर्यातवृद्धीला चालना देणे हा कार्यशाळेचा उद्देश आहे. त्याचा स्थानिक उद्योजक बांधवांना निश्चित लाभ होईल. उद्योग विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी श्री. गायकवाड यांनी केले.

# भक्ती सत्संग महोत्सवाची तयारी जोमात

**अकोला :** विश्व जागृती मिशन अकोलाच्या वतीने गुरुवार दि १९ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी पर्यंत श्री गोरक्षण संस्था प्रांगण, गोरक्षण रोड येथे लाखो भक्तांचे आराध्य पु सुधांशूजी महाराज यांचा दिव्य भक्ती सत्संग सोहळा होत असून याची भव्य तयारी सुरू करण्यात आली आहे.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**DEEPALI BABARAO JADHAO**
--TO--
**DIPALI RAJENDRA BHAGAT**
My Residential Address is :- First Gali West of District Ladies Hospital Old Radhakisan plot Akola 444001

**Change In Name**

I HAVE CHANGE OF MY NAME FROM OLD NAME
NASEEM PARVEEN. ILYAS KHAN
--TO--
NEW NAME
NASEEMA BANO ILYAS KHAN. (ASPERMY DOCUMENTS)
ADRESS: AT POST KHETRI, TQ. PATUR, DIST AKOLA.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**DEEPALI RAJENDRA BHAGAT**
--TO--
**DIPALI RAJENDRA BHAGAT**
PASSPORT NO :- P3436137 My Residential Address is :- First Gali West of District Ladies Hospital Old Radhakisan plot Akola 444001

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.३०.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

### मा.सह दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.०६/२०२६ — ने.ता.२५.०२.२०२६

**अर्जदार :**
१. निलेश तुळशीराम गावंडे,
रा.सावनेर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती
२. योगेश तुळशीराम गावंडे
रा.गुलजार नगर, अमरावती, जि.अमरावती
३. अंजली जयंत टिंगासे,
रा.गोंड प्लॉट, पावरे नर्सिंग होम, वर्धा, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत तुळशीराम सूर्यभानजी गावंडे** यांचा मृत्यू दिनांक **१५.०४.२०२५** रोजी सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे **सुशिला तुळशीराम गावंडे** ही दिनांक **०४.०८.२०२२** रोजी सावनेर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे मरण पावली. मयतांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले आहेत. तसेच अर्जदार नं.३ मुलगी आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,क.स्तर
नांदगाव खंडेश्वर

---

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४१/२०२६
**निर्मला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. निर्मला देवराव गाढवे, वय ७६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. वंदना श्रीकृष्ण जोगी, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं.२ रा.पनोरा, पो.टाकली, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. संदीप देवराव गाढवे, वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. प्रविण देवराव गाढवे, वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
अर्जदार नं.१,३,४ रा.गल्ली नं.८ हनुमान मंदिराजवळ किरण नगर नं.१ रुक्मिणी न ा ग ा र , अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देवराव शामरावजी गाढवे** हे दिनांक 26.02.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी. क्र.१८७/२०२६ — ने.ता.०२.०३.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :**
१. श्रीमती माया पुरुषोत्तम खोपे, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.धानोरा मोगल, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. अंकुश पुरुषोत्तम खोपे, वय अं.३६ वर्षे, धंदा - नोकरी
रा.सि-१७, फ्लॅट नं. ५०३, रोनक सिटी, सेक्टर-३, अंधारवाडी, कल्याण (वेस्ट) वेस्ट ठाणे, ता.जि.ठाणे
३. अजय पुरुषोत्तम खोपे, वय ३४ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.धानोरा मोगल, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. प्रविण पुरुषोत्तम खोपे, वय ३२ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.धानोरा मोगल, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **श्रीमती माया पुरुषोत्तम खोपे व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **पुरुषोत्तम किसनराव खोपे,** धानोरा मोगल, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचा मृत्यू दिनांक १९.०८.२०२५ रोजी क्रिम्स हॉस्पिटल, नागपूर, ता.जि.नागपूर येथे झाला.अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक ०१ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,चांदूर रेल्वे

---

## जाहीर नोटीस

### विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५९/२०२६ — ने.ता.०७.०२.२०२६

**अर्जदार -**
१. **श्रीमती इंदिराबाई उत्तमराव राऊत**, वय ८४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री राजेंद्र उत्तमराव राऊत**, वय ६० वर्षे, धंदा - शेती
३. **श्री दिलीप उत्तमराव राऊत**, वय ५१ वर्षे, धंदा - शेती
४. **रेखा चरणदास ठाकरे,** वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
५. **मंदा बाबाराव ठाकरे,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. **सुनंदा वामनराव धर्माळे**, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेनोडा, ता.वरुड.जि.अमरावती
७. **उषा राजकुमार ताथोडे,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.देउतवाडा, पो.पवनी, ता.वरुड, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट**-(८), **१८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ७ चे वडिल **नामे उत्तमराव जयरामजी राऊत** हे दि.**१९.१०.२०१०** रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

---

### मा.सह दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.२१/२०२६ — ने.ता.०४.०३.२०२६

**अर्जदार :**
१. प्रिती अमोल परिमल
२. ईश्वरी अमोल परिमल
दोघीही रा.अडगांव बु., ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत अमोल पुंडलिकराव परिमल** यांचा मृत्यू दिनांक **२३.११.२०२५** रोजी **अडगांव बु.**, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी व नं. २ हा मुलगा आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,क.स्तर
नांदगाव खंडेश्वर

---

### जाहीर नोटीस
### अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०५ यांचे न्यायालय

मोटार अपघात दावा क्र.२१४/२०२४ — ने.ता.०७.०२.२०२६

**पिटीशनर :**अवंतिका राजु कांबळे

-- विरुध्द --

**रिस्पॉंडंट :** **वृषभ सुधाकरराव तायडे व ईतर**

**बनाम :** 1. Vrushabh Sudhakarrao Tayde, Age 25 Yrs. Occu.: Driver R/o Shirajgaon, Tq. Dist. Amravati.

APPLICATION U/.SEC.166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION

ज्याअर्थी वरील पिटीशनर अवंतिका राजु कांबळे यांनी वि.जिल्हा व सत्र न्यायालय-०५, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार नं.१ व २ यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ०७.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०५, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अमरावती
दिनांक २७.१०.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (न्या.वि.)**
जिल्हा व सत्र न्यायालय
अमरावती

---

### महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अमरावती
### (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना)
### ईच्छुक कंत्राटदारांना सुचना NIT No. १६३/२०२५-२६

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना/मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अमरावती विभागा अंतर्गत अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम जिल्ह्यातील रस्त्याचे व पुलाचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याबाबत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असून सदर निविदा संबंधी माहिती, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

निविदा प्रसिध्दीचा दिनांक ०२.०२.२०२६ असून निविदा भरुन ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक १६.०२.२०२६ आहे. तरी इच्छुक व पात्र कंत्राटदारांनी निविदा स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे.

**(टिप - या पुढील सर्व आवश्यक सुचना/शुध्दीपत्रके हे Online Website वर प्रसिध्द करण्यात येईल.)**

**(एन.आर.देशमुख)**
**कार्यकारी अभियंता,**
**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,**
**अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### रामकृष्ण महाविद्यालयाची स्मारकास भेट

**अमरावती-**स्थानिक रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या (B.Ed. College) वतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील नव्याने लोकार्पण झालेल्या 'रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई स्मारकाला' शैक्षणिक भेट देण्यात आली. भावी शिक्षकांना थोर समाजसुधारक आणि राजकीय नेत्यांच्या जीवनकार्याची ओळख व्हावी, या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. स्मारकातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, किऑस्क आणि माहिती फलकांमुळे विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक घटनांची सखोल माहिती जाणून घेतली.अशा शैक्षणिक भेटींमुळे पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन प्रत्यक्ष अनुभूतीतून शिकण्याची संधी मिळते, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.यावेळी या भेटीदरम्यान स्मारकाचे संपदा व्यवस्थापक धम्मदीप गवई, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, स्मारकावरील कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

### विद्यापीठात संत रविदास यांची जयंती

**अमरावती -**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात तेराव्या



शतकातील महान संत रविदास यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी संत रविदास यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन तसेच संत रविदास यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



### श्री संत गजानन महाराज प्रगटदिन प्रित्यर्थ रक्तदान शिबीर

**अमरावती-**स्थानिक प्रवीण नगर येथील ब्रह्माण्डनायक सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने श्री संत गजानन महाराज प्रगटदिन उत्सवाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय येथील रक्तपेढी चमूच्या सहकार्याने पार पडलेल्या या शिबिरात परिसरातील नागरिकांनी, विशेषतः महिला व युवतींनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.या आध्यात्मिक सोहळ्याला सामाजिक कार्याची जोड देण्याच्या उद्देशाने संस्थेच्या वतीने हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. 'रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, एका युनिट रक्तामुळे तीन गरजूंचे प्राण वाचू शकतात. हा संदेश समाजापर्यंत पोहोचावा आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी,' या उदात्त हेतूने हे शिबीर आयोजित केल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष वैभव बनकर, उपाध्यक्ष मयूर डांगे, सचिव स्वप्नील तायडे, कोषाध्यक्ष राहुल मानकर (महाराज), तसेच विश्वस्त रामदास राऊत, प्रशांत भड, निलेश राऊत, मंगेश कविटकर,रामकृष्ण देशमुख, सागर तायडे, अंकित गाडगे,आकाश वाघमारे,दिलीप देशमुख, बंडू कथिलकर, आनंद गुप्ता,नयन कथिलकर,छोटू देशमुख, कार्तिक कोठे व इतर सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.



### अजित पवार यांना श्रद्धांजली

**शिराळा -** महाराष्ट्र शिक्षण समिती, शिराळा येथे मनोजभाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी गवसियांनी दोन मिनिटे मौन पाळून दादांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी मनोजभाऊ देशमुख, दिनेश मुंडाणे, संजय भोवळू, कुशल देशमुख, श्रेयश गोडांबे, अंशुक ढोक, ऋषी मुंडाणे. मित्रमंडळी आणि कुटुंबीय उपस्थित होते.



### अजितदादांना आदरांजली

**आसेगाव पूर्णा-**चांदूर बाजार तालुक्यातील विरूळ पूर्णा येथे स्व. विलास देशमुख युवा प्रतिष्ठानच्या कौटुंबीक पूर्वनियोजित कार्यक्रमात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सन्मानीय स्व. अजितदादा पवार साहेब याना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी उपस्थीत प्रतिष्ठानचे मार्गदर्शक सन्मानीय प्रकाश साबळे, राहुल तायडे, अमरावती विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी साहेब, उपकार्यकारी अभियंता भेंडे , अजयकाका तायडे, शिव संभाजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सन्मानीय निलेश तायडे, युवा प्रतिष्ठानचे अनिकेत जावरकर या सह पंचकोशीतील शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# श्री.संत अच्युत महाराज हृदय रुग्णालयात अत्याधुनिक मॉड्युलर ओटी

## हृदय रुग्णांच्या सेवेत नवा अध्याय



**अमरावती/का.प्र.**

विदर्भ, मराठवाडा तसेच मध्यप्रदेशातील मोठ्या संख्येने येणाऱ्या हृदयरोगी रुग्णांना अधिक प्रभावी, सुरक्षित व दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत या उद्देशाने श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय, मार्डी रोड, अमरावती येथे सातव्या मजल्यावर उभारण्यात आलेल्या दोन अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर व घ्णळ सुविधेचे लोकार्पण झाले.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. जयंत खांडेकर (विभाग प्रमुख, सायन हॉस्पिटल, मुंबई) उपस्थित होते. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या या ऑपरेशन थिएटरमुळे गंभीर हृदयरोगी रुग्णांवरील शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित व परिणामकारक पद्धतीने करता येणार आहेत.श्री संत अच्युत महाराज हृदय रुग्णालय हे सध्या २०० खाटांचे हृदय उपचार केंद्र असून आजपर्यंत रुग्णालयात ३,६९० पेक्षा अधिक ओपन हार्ट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ३,१२० पैंड (बायपास) शस्त्रक्रिया तसेच २७ अत्यंत जटिल 'बेंटॉल' शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्याचा मान या रुग्णालयाला प्राप्त झाला आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मागील एका वर्षात रुग्णालयात विक्रमी १,१२५ हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, हा आकडा विदर्भातील हृदय उपचार क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या शस्त्रक्रियांमध्ये बीटिंग हार्ट बायपास सर्जरी, हार्ट व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट, मिनिगली इन्व्हेसिव्ह बायपास सर्जरी, री-डू सर्जरी, बेटॉल सर्जरी तसेच न्ऍं (व्हॅंट्रिक्युलर सेप्टल रप्चर) यांसारख्या अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांचा समावेश आहे.या यशामागे रुग्णालयातील अनुभवी व कुशल कार्डिओथोरॅसिक सर्जन डॉ. मनीष जाधव, डॉ. सुधीर धांडे यांचे मोलाचे योगदान असून, शस्त्रक्रियेदरम्यान व शस्त्रक्रियेनंतर रुग्णांची सुरक्षितता व काळजी घेणारे कार्डिएक ॲनेस्थेसिस्ट डॉ. अभिषेक भडांगे व डॉ. प्रतीक चोरे यांनीही उत्कृष्ट कार्य केले आहे. याशिवाय ऑपरेशन थिएटर टीम, घ्णळ टीम, नर्सिंग स्टाफ व रुग्णालय व्यवस्थापन टीम यांचे समन्वयित व शिस्तबद्ध कार्य या यशामागील महत्त्वाचा घटक ठरला आहे.

या नव्या मॉड्युलर ऑपरेशन थिएटरमुळे अमरावती व आसपासच्या जिल्ह्यातील रुग्णांना आला नागपूर किंवा मुंबईला न जाता स्थानिक पातळीवर उच्च दर्जाच्या हृदय शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध होणार असून, विदर्भातील आरोग्यसेवेला एक नवे बळ मिळाले आहे. ही महाराजांची स्वप्न पूर्ती आहे. त्यांनी असे ही सांगिलले कि डॉ खांडेकर यांनी या हॉस्पिटल मध्ये सुरुवातीला हृदय शस्त्रक्रिया केल्या आहेत.

सुधीर दिवे, उपाध्यक्ष यांनी संस्था महात्मा फुले योजनेत सर्वात जास्त शस्त्रक्रिया करीत आहे. आणि लवकरच आम्ही इलेक्ट्रो फिजिओलोजी सुविधा सुरु करणार आहोत.संचलन प्रा सागर पासेबंद यांनी केले तर आभार प्रदर्शन मुकुंद्र वाईकर यांनी केले. या प्रसंगी इंडियन मेडिकल असोसिएशन छाया अध्यक्षा डॉ. राधा साबदेकर, होमिओपॅथी डॉक्टर असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ.स्वाती पडोळे, डों. प्रिया मोहोड लायदे विंग, डॉ. शीतल आचार्य सेक्रेटरी, डॉ नंदकिशोर भुतडा, निमाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण आवगड ह्यांचा हॉस्पिटल कडून यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी रमेश सावरकर, डॉ. श्रीकांत देशमुख,नितीन कोल्हटकर, सुधीर जोशी, डॉ. मुरलीधर वाडेकर, श्रीमती शुभदा पोतदार, डॉ, गुणवंत इहाणे, डॉ. उमेश सावरकर, डॉ. रोहित देशमुख, इंजि. राजेंद्र दिगंबर, यांसह राजु मुकवाने, धनंजय मेटे, डॉ शिवाराज शिंदे, डॉ. धवल तेली, डॉ. बकाल, डॉ विजय देवळे, उषाताई ठुसे, धीरुभाई सांगानी, राजेंद्र देवळे, संजय देवळे व रुग्णालयाचे सर्व संचालक, ट्रस्ट सदस्य व कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्‌घाटन

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक विद्या भारती महाविद्यालय अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिर ग्राम मांजरखेड, ता. चांदुर रेल्वे, जिल्हा अमरावती या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे थाटात उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याभारती महाविद्यालयातील आय क्यू ए सी समन्वय डॉ. पी.जी. बनसोड हे होते, तर उद्घाटक म्हणून वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एस. बी. कडू हे होते प्रमुख अतिथी म्हणून मांजरखेड ग्रामपंचायतीच्या सरपंच पल्लवीताई देशमुख ह्या होत्या. या कार्यक्रमांमध्ये डॉ. एस. बी. कडू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्देश सांगून विद्यार्थ्यांना ग्रामीण भागाविषयी असलेली जाणीव निर्माण करून दिली. तसेच विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचवाव्या असे सांगितले. त्यानंतर मांजरखेड ग्रामपंचायतच्या सरपंच सौ पल्लवीताई देशमुख यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या व गावातील संपूर्ण सहकार्याची हमी दिली. सोबतच विद्यार्थ्यांनी गावामध्ये सुधारणा घडवून आणाव्या व राष्ट्राविषयी लोकांमध्ये जनजागृती करावी असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. बनसोड सर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरासाठी शुभेच्छा दिल्यात व आपल्या भारतामध्ये ६० टक्के समाज हा ग्रामीण भागामध्ये राहतो त्यामुळे जोपर्यंत ग्रामीण भाग संपूर्ण विकसित होणार नाही तोपर्यंत राष्ट्र विकसित होणार नाही आणि या ध्येयामध्ये युवकांचे योगदान हे सर्वात महत्त्वाचे आहे त्यामुळे युवकांनी स्वयंप्रेरणेने या राष्ट्र कार्यामध्ये सहभाग घेने आवश्यक आहे असे प्रतिपादन केले व विद्यार्थ्यांनी राष्ट्र कार्य करावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा अमित इंगोले यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका परिघा बेराड हिने केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ अंजू खेडकर यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. जयंत बनसोड तसेच गावकरी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोदार उत्सवाची शहरामध्ये चर्चा



**अमरावती/का.प्र.**

स्थानिय पोदार इंटरनॅशनल स्कूल कठोरा रोड अमरावतीचा बहुप्रतिक्षित 'पोदार उत्सव' हल्लीच शहरातील ज्ञानेश्वर सांस्कृतीक भवन मध्ये पार पडला. वार्षिकोत्सवामध्ये प्रमुख पाहुणे म्हणुन आमदार धामणगावं रेल्वे प्रतापजी अडसड, विभागिय आयुक्त श्वेता सिंघल, उपायुक्त अमरावती श्याम घुगे, विषग्विकाळी शिष्या बेनुच्छ, जनरल मॅनेजर पोदार एज्युकेशन नेटवर्क अमन टेमुर्डे, शिक्षण विभाग प्रशांत उंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी विनोद काळे, आरती देशमुख, प्रविण कपिले विशेषत्वाने म्हणुन उपस्थित राहिले. तीन दिवसीय पोदार वार्षिकोत्सव ९ भव्य ईव्हेन्ट्स मध्ये झाला. वर्ग पहली तसेच दुसरीच्या विद्यार्थ्यांनी 'कलर्स ऑफ इंडिया' थीमच्या अंतर्गत महाराष्ट्र दर्शन, गुजरात, काश्मीर, आसाम, बेंगाली, पंजाब, केरळ, साऊथ इत्यादी राज्यांची नृत्य प्रस्तुती देवुन त्यांच्या संस्कृतीला अधोरेखित केले. तीन दिवसीय वार्षिकोत्सवामध्ये नवव्या इव्हेन्ट मध्ये पोदार प्रेपच्या चिमुकल्यांनी कार्यक्रमामध्ये रंग आणला. या भव्य पोदार उत्सवाच्या आयोजनाच्या उद्देश्याला अभिव्यक्त करीत पोदार प्राचार्या मनिषा संगर यांनी पोदारचा करीक्युलम तसेच को-करीक्युलम प्रक्रियेच्या माध्यमाने विद्यार्थ्यांच्य सर्वांगिण विकासाच्या प्रती आपल्या कटीबध्दतेला अधोरेखित केले. सुत्रसंचालन सुमती सोनेकर, रेशमा तनवानी, सारीका गाडगे, जितेंद्र बुटे, बिदीशा पात्रा, रोशनी लोणकर, सोनाली मांजरे, विजेता वानखेडे, रूपाली वाघमारे, सपना रिचारीया व्दारा केले गेले तसेच आभार प्रदर्शन डॉ. आशिष भेटाळु, अपर्णा शेळके, भुषन पथे, डॉ. आशिष खुळे, सोनाली गवई, विशाखा सावरकर, सारीका सालपे, रोशनी दर्जी व्दारा केले.

## पोटाची खळगी भरण्यासाठी सात वर्षाच्या मुलीची तारेवर कसरत

### अमृत महोत्सव साजरा होऊनही जगण्यासाठी संघर्ष

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होऊनही आजच्या घडीला आपल्या कुटुंबाची पोटाची खळगी भरण्यासाठी सात वर्षाच्या मुलीला तारेवर कसरत करीत नाचवीत त्यांची कुटुंब जगण्यासाठी संघर्ष करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यावरून देशातील जनता आजही पारतंत्र्यात असल्याचे वाटत आहे.



शिक्षण, विकास आणि आधुनिकतेच्या स्पर्श न झालेला हा भटकी समाज रस्त्याच्या कडेला पारंपारिक डोंबारी नाच व खेळ यांचा सुरेख संगम साधत टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांसमोर कला सादर करून मिळालेल्या पैशातून उदरनिर्वाह करीत आहेत.उपजीविके साठी अनेकजण घराबाहेर पडून लागले आहेत. असेच एक भटकी जमातीतील कुटुंब आसेगाव पूर्णा बाजारपेठेतील रस्त्याच्या कडेला डोंबाऱ्यांचा खेळ दाखवून सात वर्षाची चिमुरडी दुपारी तीनच्या दरम्यान नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती.

**पाहणारेही थक्क -**जमिनीपासून सहा ते सात फुटाच्या अंतरावर बांधलेल्या जाड रस्सीवरून जेव्हा ही मुलगी डोक्यावर पितळी कलश, हातात जाड बांबूची काठी आणि त्याच क्षणी पायांनी सायकलचे चाक चालवताना पाहून बघणारे चक्क झाले आहेत. कधी परत पायाच्या अंगठ्यात पकडून दोरीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चालताना पाहून खाली पडेल की काय या भीतीने येणाऱ्या जाणाऱ्यांना हृदयाची धडधड वाढत होती.

**वंचित समाजाची कहाणी -**उद्याची चिंता न करता घाम गाळून कला दाखवत लोकांचे मनोरंजन करून त्यांच्याकडून मिळालेल्या पैशातून भाकरीचा चंद्र त्यांच्या ताटात दिसतो. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येते. शिक्षणापासून वंचित असणारा हा भटकी समाज.

याना राहण्यासाठी पक्के घरे, मुलांसाठी मोफत शिक्षण आणि सरकारी सुविधांचा अभाव, विकासाच्या दारिद्र्यात लोटलेल्या भटक्या जमाती पुढे आजही जगण्यासाठी जीव मुठीत घेऊन संघर्ष करावा लागत आहे.

## मिलिंद विद्यालय गौरखेडा (चांदई) येथे वार्षिक स्नेहसंमेलन

**खल्लार/वार्ताहर**

नजिकच्या गौरखेडा (चांदई) येथिल राहुल व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित असलेल्या मिलिंद विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन,सांस्कृतिक कार्यक्रम व हळदीकुंकू,महिलांसाठी विविध स्पर्धा व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष क्षितिज मधुकर अभ्यंकर उपस्थित होते.मंचावर संस्थेच्या संचालिका शुभांगी क्षितिज अभ्यंकर,खल्लारचे ठाणेदार रविंद्र बारड,चंडिकापुर केंद्राचे केंद्रप्रमुख अनिलकुमार वांगे, डायमंड इंग्लिश स्कुलचे संस्थापक नंदलाल डोंगरे, मुख्याध्यापक अमितकुमार वानखडे, लिलाई फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डॉ श्रीकांत बनसोड,महावितरण केंद्र, खल्लारचे उपअभियंता मंगेश बोंडे, मंगला वंजारी, अनुष्का ठाकरे, विहान अभ्यंकर, गौरखेडच्या सरपंच मिना शेंदुरकर,रामगावच्या सरपंच छाया संजय घरडे, झाशी ग्रामसंघाच्या अध्यक्ष सपना अमित वानखडे,शाळा समिती सदस्य सुधाकर धुरंदर,अरविंद खंडारे,पालक प्रतिनिधी नूरखा पठाण छाया खंडारे उपस्थित होते.याप्रसंगी मान्यवरांचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर व संचालिका प्रा शुभांगी अभ्यंकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.हळदी कुंकू कार्यक्रमानिमित्त तिळगुळ व वान वाटप करण्यात आले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, उखाणे स्पर्धा व इतर स्पर्धांचे आयोजन केल्यामुळे सर्व महिलांनी स्पर्धेमध्ये सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घेतला. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अमोल बोबडे व पूजा काळे यांनी तर आभार प्रदर्शन दिपक कावरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शाळेचे शिक्षक प्रशांत वानखडे,वासुदेव भांडे,दिपक कावरे,चित्रा राऊत,मनिषा गावंडे,पूजा काळे, अमोल बोबडे, पुरणप्रकाश लव्हाळे, दिपक रहाटे, संजय आठवले, आनंद खंडारे,गणेश अंबोरे, मुमताज बानो पठाण व सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात 'बोली काव्यवाचन संमेलन'

**अमरावती/का.प्र.**

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठी भाषेतील विविध बोलींचे संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्याच्या उद्देशाने 'विद्यार्थ्यांचे बोली काव्यवाचन संमेलन' मोठ्या उत्साहात पार पडले.



या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वऱ्हाडी, अहिराणी, कोरकू, गोंडी, कोंकणी, वारली, बंजारा, मालवणी अशा विविध बोलीभाषांमधील कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. हा उपक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यातंर्गत राबविण्यात आला. या आगळ्यावेगळ्या संमेलनाचे अध्यक्षपद श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांनी भूषविले. यासोबतच इंग्रजी विभागप्रमुख प्रा. पी.आर.एस. राव, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. श्याम तंत्रपाळे, प्रा. दीपाली गवई आणि प्रा. महेश बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मानवता ज्योत प्रज्वलित करून आणि महामानवांना अभिवादन करून झाली. यासोबतच प्राध्यापकांनी सुद्धा बोलीभाषेतील कवितेचे वाचन करून सभागृहाच्या टाळ्या मिळविल्या.

यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. कमलाकर पायस म्हणाले की, 'प्रमाण भाषेइतकेच महत्त्व आपल्या बोलीभाषांना आहे. बोलीभाषा या मुख्य भाषेचा कणा असून, त्यामध्ये मातीचा सुगंध आणि आपलेपणाची भावना असते.

विद्यार्थ्यांनी या बोली टिकवण्यासाठी आणि साहित्यातून व्यक्त होण्यासाठी असे उपक्रम राबवणे अत्यंत गरजेचे आहे. सदर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. हेमंत सावळे यांनी केले. त्यांनी आपल्या खुमासदार शैलीने कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. मेघा चिमणकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रा. एन. डी. अढाऊ, प्रा. महेश बनसोड, प्रा. दीपाली गवई आणि प्रा. हेमंत सावळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सदर कार्यक्रम हा मराठी विभागामार्फत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

## या.द.व.देशमुख कला, वाणिज्य महाविद्यालयामध्ये पालक-शिक्षक सभा

**तिवसा-**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ च्या द्वितीय सत्रामध्ये नुकतीच पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती.या सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून अतुल देशमुख, गटसमन्वयक पंचायत समिती तिवसा उपस्थित होते.

तसेच व्यासपीठावर सविता धानोरकर, मनोहर पुनसे, संतोष गाडगे आणि मुंगले हे पालक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. गणेश खेकडे, प्रा. सी.जी. सोळंके व महाविद्यालयाचे अधीक्षक महेश अवघड आणि पालक सभेचे मुख्य आयोजकप्रा. योगेश देशमुख आदि मान्यवर मंचावर उपस्थित होते. तसेच या पालक सभेकरिता वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. रवींद्र पाटील, प्रा. साकेत देशमुख, प्रा. शंतनू पानबुडे व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. गौरी गणोरकर, प्रा. वृषाली जगताप. प्रा.पूजा भोयर, प्रा. खुशबू कुथे, प्रा. राजकुमार तिडके, प्रा. भरत गोंजारे यांचे सहकार्य लाभले.

# महापालिकेत महायुतीचा 'सव्वा-सव्वा' वर्षांचा फॉर्म्युला

## श्रीचंद तेजवानी होणार पहिले सिंधी महापौर





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेत अखेर महायुतीची सत्ता स्थापन होण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी महायुतीने आपल्या उमेदवारांची घोषणा केली असून, सत्तेसाठी 'सव्वा-सव्वा' वर्षांचा विशेष फॉर्म्युला निश्चित केला आहे.

सोमवारी भाजप आणि मित्रपक्षांच्या महत्त्वाच्या बैठकीनंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. महापौर पदाकरिता श्रीचंद तेजवानी (भाजप),तर उपमहापौर पद सचिन भेंडे (युवा स्वाभिमान पार्टी) यांनी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपचे निवडणूक प्रभारी आमदार संजय कुटे आणि विदर्भ संघटन (पान २ वर)

**इतिहास रचणारः**

श्रीचंद तेजवानी यांची निवड झाल्यास ते अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासातील पहिले सिंधी महापौर ठरणार आहेत. शहरातील ६ पूज्य सिंधी पंचायतींनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ही मागणी लावून धरली होती. जवाहर स्टेडियम प्रभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तेजवानी यांना संधी देऊन भाजपने आपल्या हक्काच्या मतदाराला मोठा सन्मान दिला आहे.

# एमडी तस्करी प्रकरणातील ४ आरोपींना एमसीआर

## नागपूर डीआरआय पथकाची नवसारीत धडक कारवाई

### इतर आरोपींचा युद्ध स्तरावर शोध





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमली पदार्थाच्या तस्करी विरोधात महसूल गुप्तचर संचालनालय विभाग अर्थात डीआरआयनं रविवारी शहरात धडक कारवाई केली. या कारवाईत तब्बल ४.९९ किलो मेफेड्रोन अर्थात एमडी जप्त करण्यात आलं. गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अत्यंत गोपनीय पद्धतीनं ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणात ४ आरोपीयांना ताब्यात घेतले आहे. फैसल खान अन्सार खान (वय २२,गुलिस्ता नगर), अवैज अहमद आरिफ अहमद (वय २५, कसाबपुरा, चांदूर बाजार), मुस्तकीम खान अब्दुल ताहीर खान (वय २९, कसाबपुरा, चांदूरबाजार), शेख परवेज शेख नासिर (वय ३२, चांदणी चौक, हाथीपुरा ) असे अटक आरोपींचे नाव आहे. चारही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. जिथे त्यांना बुधवार ४ फेब्रुवारी पर्यंत एमसीआर (पान २ वर)

# शेकडो लाडक्या बहिणींची तहसील व प्रकल्प अधिकारी कार्यालयावर धडक

## -संतप्त महिलांचा अधिकाऱ्यांना घेराव



**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या तालुक्यातील चार हजार लाडक्या बहिणींना हप्ता न मिळाल्याने शेकडो लाडक्या बहिणींना घेऊन शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी तहसील व बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयावर धडक दिली. संतप्त महिलांनी घेराव करून तात्काळ प्रलंबित हप्ते देण्यात यावे, लाडकी बहीण योजनेचे पोर्टल सुरू करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन सादर केले. यावेळी लाडक्या बहिणींनी सरकार विरोधात प्रचंड नारेबाजी करत संताप व्यक्त केला.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील चार हजार लाडक्या बहिणींनी ई-केवायसी केली असताना सुद्धा नोव्हेंबर-डिसेंबर महिन्याचे हप्ते मिळाले नाही तसेच शेकडो महिलांची तांत्रिक अडचणीमुळे ई-केवायसी होऊ शकली नाही. कारण सदर ई-केवायसी मध्ये विचारल्या गेलेल्या किचकट प्रश्नांची उत्तरे चुकल्यामुळे लाडक्या बहिणी योजनेच्या लाभापासून वंचित आहे तसेच लाडकी बहीण योजनेचे पोर्टल सुद्धा शासनाने बंद केले आहे. त्यामुळे नवीन लाडक्या बहिणींना सुद्धा अर्ज करता येत नाही.शासनाने ई-केवायसी पासून वंचित (पान २ वर)

# दिवंगत लोकनेते अजित पवार यांचा अस्थिकलश दर्शनासाठी अमरावतीत

## सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची मोठी गर्दी,आ.खोडके जनसंपर्क कार्यालयात स्मृतीचे स्मरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे दर्शन घेण्यासाठी आज सोमवार दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी आमदार सुलभा संजय खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे अमरावती जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेतेमंडळी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध समाज संघटना तसेच शेकडो चाहत्यांनी मोठी गर्दी केली.यावेळी अस्थिकलशाचे विधिवत पूजन,दादांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण करत, भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने सर्वत्र शोक व्यक्त होत आहे. अजितदादांच्या अंत्यसंस्कारानंतर मुंबई स्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात विधिवत पूजन केल्या नंतर संपूर्ण राज्यभर अस्थिकलश रवाना करण्यात आला. अमरावती विभागातील पाच जिल्हे व एक वर्धा जिल्हा अशा ठिकाणी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांचा अस्थिकलश पोहोचविण्याची जबाबदारी पक्षाचे महासचिव (संघटन) आ.संजय खोडके (पान २ वर)

# एमडी ड्रग्सबाबत कारवाई करा

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश



**अमरावती/प्रतिनिधीः-** महसूल गुप्तचर संचालनालयाने पाच किलो एमडी ड्रग्स पकडून कार्यवाही केली आहे. शहराच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा आहे. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत प्रामुख्याने युवकांमध्ये जनजागृती करावी, तसेच स्थानिक पोलिस यंत्रणांनी संपर्क वाढवून एमडी ड्रग्सबाबत कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर जिल्हास्तरीय समितीची मासिक सभा पार पडली. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखेडे यांनी अंमली पदार्थाबाबत माहिती दिली. अंमली पदार्थाबाबत प्रामुख्याने किशोरवयीन मुले लक्ष्य होत असल्याने त्यांच्यामध्ये जनजागृतीसाठी व्याख्याने आयोजित करण्यात यावे. येत्या १५ दिवसात समाज कल्याणमधील सर्व वसतिगृहे आणि शाळांमध्ये ही व्याख्याने आयोजित करण्यात यावीत. आऊटरिच कार्यक्रम राबवून समाजात जनजागृती करण्यात यावी. यासाठी एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. 'नशामुक्त भारत, खुशहाल (पान २ वर)

# डफरीनच्या डॉक्टरांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

## प्रहारची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

### पल्लवी गुडधे मृत्यू प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालय येथे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे २३ जानेवारी रोजी पल्लवी भूषण गुडधे यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. यासाठी जबाबदार डॉक्टरांवर अजून पर्यंत कोणतीही कार्यवाही नाही झाली.या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आज सोमवार २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून करण्यात आली आहे. १२ जानेवारी रोजी खारतळेगांव निवासी पल्लवी भूषण गुडधे यांना जिल्हा स्त्री रुग्णालयात (पान २ वर)

# खांजमानगर येथील शेतकऱ्याची आत्महत्या



**अचलपूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील खाजमांनगर परिसरातील एका शेतकऱ्याने आर्थिक विवेंचनेतून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी समोर आली आहे. गजानन जानराव डांगरे (खाजमानगर) असे आत्महत्या करणाऱ्या शेतक-याचे नाव आहे. माहितीनुसार शेतकरी गजानन डांगरे यांनी रविवारी सकाळी आपल्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. दुपारी ते घरी नाही आले. यामुळे कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला तर शेतातील एका झाडावर ते फासावर लटकलेले दिसले. माहिती पोलिसांना देण्यात आली पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला. माहितीनुसार, गजानन डांगरे यांच्याजवळ तीन एकर शेत होते. यावर त्यांनी सोसायटी आणि बचत गटाचे कर्ज घेतले होते. हे कर्ज कसे फेडणार याची चिंता त्यांना सतावत होती. या विवंचनेतून त्यांनी हे आत्मघाती पाऊल उचलले. ते आपल्या मागे पत्नी आणि एका मुलासह आप्तपरिवार सोडून गेले आहे. त्यांच्या या निर्णयाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य रत्न नटराज पुरस्काराने सृष्टी तायडे सन्मानित



**खल्लार/प्रतिनिधीः-** येवदा येथिल सुप्रसिद्ध व बहुगुणी नृत्यकलावंत सृष्टी प्रकाश तायडे यांना नृत्यकलेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य रत्न नटराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्यातील नृत्य क्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व प्रभावी कार्य करणाऱ्या कलाकारांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो. शास्त्रीय तसेच लोकनृत्य कलेत सृष्टी तायडे यांनी केलेली अथक मेहनत, उत्कृष्ट सादरीकरण आणि कलात्मक साधना याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. नृत्यकलेबरोबरच सृष्टी तायडे या चित्रकला, रांगोळी, मेकअप, मेहंदी, क्राफ्ट, डेकोरेशन व हेअर स्टाईल या विविध कलांमध्येही पारंगत असून एक अष्टपैलू कलाकार म्हणून ओळख आहे. आजवर श्रुष्टी यांना शेकडो पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रामकृष्णहरी विश्वमानव मंदिर, दास टेकडी, मोझरी व पद्मश्री फाउंडेशन, नागपूर यांच्या (पान २ वर)

# राष्ट्रीय सॉफ्टबॉल शालेय स्पर्धेत मंजिरी गावंडेला सुवर्णपदक

## राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचा मोठा विजय



अमरावती/प्रतिनिधीः- सॉफ्टबॉल या क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी करून मंजिरी अमित गावंडे हिने नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. अंतिम सामन्यात दिल्लीच्या संघाला पराभूत करून महाराष्ट्र संघाने मोठा विजय मिळविला.

राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना १९ वर्षीय मुलींच्या सॉफ्टबॉल स्पर्धेत मंजिरी गावंडे हिने (पान २ वर)

# प्रवाशांच्या हक्कासाठी गुरुकुंज मोझरीत प्रहारचे उपोषण



**तिवसा/प्रतिनिधीः-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे आश्रम व महासमाधी, अनेक शैक्षणिक संस्था तसेच आयुर्वेदिक रुग्णालय असलेले मोझरी हे तिवसा तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी दररोज हजारो भाविक, विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार, कामगार व इतर प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. प्रवासाचे मुख्य साधन असलेल्या एस.टी. बससेवेवरच प्रवाशांचा संपूर्ण आधार आहे.

मात्र तिवसा तालुक्याचे मुख्य ठिकाण असतानाही अमरावती बस डेपो अंतर्गत येणाऱ्या मोझरी–तिवसा मार्गावरील प्रवाशांना वाहक व चालकांकडून सातत्याने हीन वागणूक दिली जात असल्याचा आरोप आहे. अधिकृत थांबे असतानाही अनेक बस मोझरी व तिवसा येथे न थांबवता बायपासने सोडल्या जात असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा प्रकार अनेक वर्षांपासून सुरू असून, (पान २ वर)

# थिलोरी ग्रामपंचायतची निष्क्रियता, सांडपाणी आठवडी बाजारात, -व्यापारी व नागरिकांना त्रास



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील थिलोरी ग्रामपंचायतच्या निष्क्रियपणामुळे आठवडी बाजारात गावातील सांडपाणी शिरत असून याचा त्रास व्यापारी व नागरिकांना होत आहे. मात्र याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष नाही. थिलोरीत दर रविवारी संध्याकाळी आठवडी बाजार भरतो. गावातील मुख्य आठवडी बाजार परिसरात भरत असलेल्या ठिकाणी गटारी तुडुंब भरल्याने सांडपाणी रस्त्यावर साचले. याचा नाहक त्रास व्यापारी व नागरिक यांना सहन करावा लागतो. मात्र ग्रामपंचायत स्वच्छतेच्या नावाखाली ग्रामपंचायतचा केवळ कागदी कारभार सुरू असल्याचा आरोप गावातील नागरिकांनी केला आहे.

प्रत्यक्षात मात्र साफसफाई कचऱ्याची उचल आणि गटारी कडे प्रामुख्याने व सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने बाजारातील व्यापारी वर्गांचा हजारो रुपयांचा माल ग्रामपंचायतीच्या हलगर्जी प्रशासनामुळे धुळीस मिळत आहे. याचा परिणाम आठवडी बाजारात आलेल्या व्यापारी वर्गांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. बाजार भरत असलेल्या ठिकाणी सर्व परिसरात दुर्गंधी पसरल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मात्र याकडे ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.

पिण्याच्या पाण्याचे नळ सोडल्यामुळे पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात होतो. नाल्यामध्ये कचरा अडकल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर आले आहे. **-मिना शशांक धर्माळे,** (पान २

# जिल्ह्यात 'कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र' अभियानाचा शुभारंभ



**अमरावती/प्रतिनिधीः-** कुष्ठरोग हा शाप नसून तो एक उपचारसाध्य आजार आहे, हा संदेश जनमानसांत रुजवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या उपस्थितीत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती आणि 'कुसुम' कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी (ता. अमरावती) येथे नुकताच हा कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुष्ठरोग निवारणाची सामुहिक शपथ घेतली.

महापात्र यांनी स्वतः अंजनगाव बारी परिसरातील वीटभट्ट्यांवर जाऊन तेथील कामगारांशी संवाद साधला. त्यांनी तपासणीसह कुष्ठरोगाची लक्षणे ओळखण्याबाबत कामगारांचे समुपदेशन केले. कुष्ठरुग्णांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे आणि त्यांच्याबद्दलची अंधश्रद्धा दूर व्हावी, हा या 'स्पर्श' अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या पंधरवड्यामध्ये जिल्हाभरात विविध उपक्रम राबवून या आजाराविषयी शास्त्रोक्त माहितीचा प्रसार केला जाणार आहे.

या आजारावरील'बहुविध औषधोपचार' सर्व शासकीय रुग्णालयांत मोफत उपलब्ध आहे. वेळेवर उपचार घेतल्यास कुष्ठरोगामुळे येणारी शारीरिक विकृती पूर्णपणे टाळता येते. कुष्ठरुग्णांना संविधानाने दिलेला समानतेचा अधिकार मिळवून देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणे हे समाजाचे कर्तव्य आहे. या कार्यक्रमाला सहायक संचालक डॉ. पूनम मोहोकार, तालुका आरोग्य अधिकारी (पान २ वर)